# व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास

**(Vyankatesh Madgulkar yanchya Nivadak Kadambaryancha Abhyas)**

**एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका**

**MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION**

**मराठी अध्ययनशाखा**

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

**गोवा विद्यापीठ**


अभ्यासक

**मडगावकर अपूर्वा बाबुराव**

हजेरी क्र. 22P0190014

ABC ID 247941067726

पी. आर 201809208

मार्गदर्शक

**विनायक लक्ष्मण बापट**

(सहायक प्राध्यापक)

मराठी अध्ययनशाखा

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा


गोवा विद्यापीठ

**शैक्षणिक वर्ष 2023 – 2024**

# VYANKATESH MADGULKAR YANCHYA NIVADAK KADAMBARYANCHA ABHYAS

**Submitted in partial fulfilment of Masters Degree**

**MA in Marathi**

## MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

by

**Madgaonkar Apurva Baburao**

Seat No: 22P0190014

ABC ID: 247941067726

PRN: 201809208

Under the supervision of

**Vinayak Bapat**

(Assistant Professor)

**Marathi Discipline**

Shenoi Goembab School of Language & Literature

**Goa University**

**2023 – 2024**

## DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report titled, "व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Languages & Literature, Goa University under the supervision of Vinayak L. Bapat and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else at the UGC regulations demand and make it available to any one as needed.

Madgaonkar

Madgaonkar Apurva Baburao

Seat no: 22P0190014

Date: 16/04/2024

Place: Goa University

## COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report **"व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास"** is a bonafide work carried out by Ms Apurva Baburao Madgaonkar under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the discipline Marathi at the Shenoi Goembab School of Languages & Literature, Goa University.

16/4/2024

**Vinayak Laxman Bapat**

Date: 16/4/2024

GOA UNIVERSITY
SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE
TALEIGAON PLATEAU

Signature of Dean of the school

School stamp

Date: 25/04/2024

Place: Goa University

# मनोगत

प्रस्तुत प्रबंधिकेत व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा कादंबरीच्या घटकांच्या आधारे व कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापनांच्या संदर्भासह अभ्यास व्हावा हा उद्देश या लेखनामध्ये आहे. या अभ्यासाला प्रारंभ करण्यापूर्वीपासून आजपर्यंत अनेकांचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले आहे. या सर्वांची मी कृतज्ञ आहे.

मी व्यंकटेश माडगूळकर यांच्या बनगरवाडी या कादंबरीचे वाचन महाविद्यालयात असताना केले होते. लेखकांनी त्या कादंबरीत जो विषय मांडला आहे तो त्यावेळी माझ्या मनाला भावला. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करण्याची उत्सुकता निर्माण बनगरवाडी वाचून झाली. त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांबद्दल अधिक जाणून घेण्याची इच्छा झाल्यामुळे मी प्रबंधिकेसाठी व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास हा विषय निवडला आहे.

प्रा. विनायक बापट, हे माझ्या या संशोधन प्रबंधिकेसाठी मार्गदर्शक म्हणून लाभले हे माझे भाग्यच. सरांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेताना त्यांच्या अभ्यासाची खोली मला जाणवली. सुरुवातील हा विषय एक आव्हान वाटत होते. परंतु सरांच्या प्रेरक मार्गदर्शनामुळे या संशोधनाबाबत आत्मविश्वास निर्माण झाला. साहित्याच्या मूल्यमापनाबाबतच्या अनेक संकल्पना स्पष्ट झाल्या. साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण अधिक व्यापक झाला. सरांचे निरपेक्ष सहकार्य व अनमोल मार्गदर्शन माझ्यासाठी एक अमूल्य ठेवा आहे. तसेच प्रा. बापट हेच मराठी विभागप्रमुख आहेत. त्यांनी वेळोवेळी संशोधन कार्यात व प्रशासकीय अडचणी सोडवताना केलेले सहकार्य अनमोल आहे. बापट सरांच्या विषयीची कृतज्ञतेचीभावना शब्दांतून व्यक्त करणे शक्य नाही.

तसेच  विषय निवडण्यात डॉ. हेमंत अय्या सरांनी मदत केल्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार. संशोधनाच्या सुरुवातीच्या काळात बापट सर रजेवर असल्याच्या कालावधीत डॉ. विनय मडगांवकर सरांनी मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांची ऋणी आहे.

औपचारिक व सर्व प्रकारच्या अनौपचारिक शिक्षणात आधार ठरलेल्या माझ्या कुटुंबीयांचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे. माझी आई सौ. अपर्णा मडगावकर व वडील श्री. बाबुराव मडगावकर यांनी

सुरूवातीपासून आजपर्यंत माझ्या शिक्षणासाठी दाखवलेली तळमळ, दिलेला आधार व केलेले श्रम या संशोधनकार्याच्या निमित्ताने मला अधोरेखित करता आले. माझा भाऊ विष्णू मडगावकर याने माझ्या संशोधनाच्या वेळी बारीक-सारीक मदत केल्याबद्दल त्याचेही आभार मानते. तसेच माझा मित्र सुशांत फडते याने मला मदतीचा हात दिला म्हणून त्याचेही आभार.

या अभ्यासासाठी मला गोवा विद्यापीठाच्या ग्रंथालयाबरोबरच केंद्रीय ग्रंथालय या ग्रंथालयाची मदत झाली. या ग्रंथालयांचे ग्रंथपाल व सर्व कर्मचारी वर्ग यांचेही आभार. तसेच या सर्व प्रवासात गोवा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रशासकीय कामे सांभाळणारी मरलीन व त्यांचे सहकारी श्री. भानुदास यांची स्नेहपूर्ण वागणूक नेहमीच स्मरणात राहणारी आहे. त्यांचेही खूप खूप आभार. तसेच या संशोधन कामात प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या सर्वांविषयी मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करते. प्रस्तुत प्रबंधिकेत जे काही उत्तम आहे ते या सर्व सहृदयांचे मार्गदर्शन, आशीर्वाद, सहकार्य व शुभेच्छांमुळेच आहे.

# व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास

## अनुक्रमणिका


| अनु क्र. | विषय | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| Declaration | | |
| Completion Certificate | | |
| मनोगत | | i-ii |
| प्रस्तावना | | 1-5 |
| १ | कादंबरी एक साहित्यप्रकार | 6-23 |
| २ | व्यंकटेश माडगूळकर व्यक्ती आणि कर्तुत्व | 24-35 |
| ३ | व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा प्रत्यक्ष अभ्यास | 36-103 |
| ४ | व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन | 104-113 |
| ५ | समारोप आणि निष्कर्ष | 114-121 |
| परिशिष्ट | | 122-124 |
| संदर्भ सूची | | 125-126 |

# प्रस्तावना

आधुनिक मराठी साहित्यामध्ये अनेक साहित्य प्रवाह निर्माण झाले आहेत. मराठी साहित्य या प्रभावाने समृद्ध केले आहे, तसेच काही परिवर्तनेही घडविली आहेत. १९२५-१९३०च्या सुमारास 'ग्रामीण' साहित्याची परंपरा सुरू झाली. 'ग्रामीणता' ही ग्रामीण साहित्यातील महत्त्वपूर्ण असा घटक आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांचा उल्लेख ग्रामीण साहित्यिककार म्हणून केला जातो. ग्रामीण म्हणत असताना लेखक आपल्या साहित्यकृतीत ग्रामीण जीवन, संस्कृती, निसर्ग, परंपरा, राहणीमान, रीती-रिवाज, समस्या इत्यादी असे अनेक घटकांचे चित्रण करीत असतो. आम्ही आमच्या आसपास जे काही घडतात ते पाहतो, त्याचा आनंद घेतो व काही क्षणातच विसरूनही जातो. परंतु ज्यावेळी एखादा लेखक आपल्या परिसरात घडत असलेल्या गोष्टींचा अनुभव घेतो, निरीक्षण करतो, त्यावेळी तो आपल्या कल्पनेच्या आधारे आपल्या साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करीत असतो. ज्यावेळी अशी साहित्यकृती वाचकांच्या हाती लागते, त्यावेळी ती साहित्यकृती वाचून वाचकांचा परिसरातील गोष्टींकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोण निर्माण होत असतो. मी महाविद्यालयात असताना व्यंकटेश माडगूळकर यांच्या बनगरवाडी या कादंबरीचे वाचन केले होते. गोवा विद्यापीठात एम. ए चे शिक्षण घेत असताना संशोधन अनिवार्य आहे. हे कळताच प्रथम मला व्यंकटेश माडगूळकर यांची आठवण झाली. लेखकाच्या लेखनाची शैली, कादंबरीतील आशय लक्षात घेऊन, तसेच त्यांनी केलेले वर्णन वाचून मला त्यांच्या इतर कादंबऱ्या वाचाव्याशा वाटत होते, पण शिक्षणाच्या व्यापाने तेव्हा ते शक्य झाले नाही. आता ही संधी मिळाली व त्यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करण्याची उत्सुकता निर्माण झाल्यामुळे मी प्रबंधिकेसाठी 'व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास' हा विषय निवडला आहे.

## संशोधन विषयक समस्या

१.व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांतून मानवी जीवन विषयक जाणिवा कशा प्रकारे आलेल्या आहेत.

२. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यातील विविध स्तरांवरील संघर्षांचा अभ्यास झालेला नाही.

३. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा घटकानुरुप खोलवर अभ्यास झालेला माझ्या दृष्टीत आलेले नाही.

४. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरी लेखनाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला पाहिजे.

## संशोधन कार्याची उपयुक्तता/ आवश्यकता

जसे काळात परिवर्तन होते तसेच मानवाच्या जगण्यातदेखील परिवर्तन होताना दिसून येते. मानव आपली संस्कृती, राहणीमान, भाषा विसरून पाश्चात्य संस्कृती स्वीकारताना दिसतात. हे चालू असताना जर भावी पिढीला ग्रामीण साहित्याबद्दल काही जाणून घ्यायचे असेल तर हे संशोधन महत्त्वाचे ठरेल. या प्रबंधिकेद्वारे ग्रामीण जीवनाबद्दल अधिक सखोलतेने जाणून घेता येईल. विशिष्ट गावातले/ प्रदेशातले समूहजीवन आणि तेथील व्यक्तींचे परस्परसंबंध याबद्दलची जाणीव होईल. तसेच एखादा ग्रामीण साहित्याचा अभ्यास करण्यास प्रवृत्त होईल.

## संशोधनाची उद्दिष्टे

१.कादंबरी हा साहित्यप्रकार समजून घेणे.

२. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा कादंबरीच्या विविध घटकांच्या आधारे अभ्यास करणे.

३. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये जाणून घेणे.

४. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांच्या आधारे मानवी जीवन विषयक जाणिवांचा शोध घेणे.

५. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यातील विविध स्तरांवरील संघर्षाची जाणीव करून घेणे.

## गृहितकांची मांडणी

१. व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या कादंबऱ्यांतून वेगवेगळया स्तरांवरील जीवन चित्रित केले आहे.

२. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांच्या आधारे मानवी जीवन विषयक जाणिवांचा प्रत्यय येतो.

३. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांच्या माध्यमातून विविध स्तरांवरील संघर्षाचा प्रत्यय येतो.

४. व्यंकटेश माडगूळकर ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेले लेखक आहेत.

५. व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या कादंबऱ्यात ग्रामीण बोली भाषेचा वापर केला आहे.

६. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन होते.

## संशोधन पद्धती

'व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास' करीत असताना वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल. तसेच कादंबरी हा साहित्यप्रकार अभ्यास करताना ऐतिहासिक पद्धतीचा वापर होईल.

## अ. वर्णनात्मक पद्धती

व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास वर्णनात्मक पद्धतीने होणार आहे. सदर प्रबंधिकेत विविध घटकांचा, मुद्यांचा या पद्धतीने अभ्यास केला जाणार आहे. प्रबंधिकेत सगळया प्रकरणांसाठी या पद्धतीचा वापर करणार आहे.

## ब. ऐतिहासिक पद्धती

व्यंकटेश माडगूळकरांबद्दल जाणून घेण्यासाठी इतिहास महत्त्वाचा आहे. त्यामुळे ऐतिहासिक पद्धतीचा वापर करणार आहे. मराठी कादंबरीची वाटचाल, त्याचबरोबर व्यंकटेश माडगूळकर यांचे वाङ्मयीन कर्तृत्व यासाठी या पद्धतीचा उपयोग होणार आहे.

## प्रबंधिकेची मांडणी

प्रकरण १. कादंबरी एक साहित्यप्रकार

प्रकरण २. व्यंकटेश माडगूळकर व्यक्ती आणि कर्तुत्व

प्रकरण ३. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा प्रत्यक्ष अभ्यास

प्रकरण ४. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन

प्रकरण ५. समारोप आणि निष्कर्ष

## संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

व्यंकटेश माडगूळकर यांच्या साहित्यातील वैविध्य लक्षात घेऊन मी माझ्या अभ्यासासाठी व्यंकटेश माडगूळकर यांची निवड केली आहे. व्यंकटेश माडगूळकर हे मराठीतले एक महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. त्यांच्या समकालीन कादंबरीकारांचा विचार केला तर इतर अनेक श्रेष्ठ दर्जाचे कादंबरीकार आपल्याला मराठीमध्ये दिसून येतात परंतु व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यात असलेली ग्रामीण पार्श्वभूमी, त्याच्यातील वैविध्यपूर्ण भाषा, त्यातील निसर्गाचे होणारे दर्शन ही सगळी वैशिष्ट्ये आहेत. त्यांचा अधिक सखोलपणाने अभ्यास करण्यासाठी मी व्यंकटेश माडगूळकर हे लेखक निवडलेले आहेत. व्यंकटेश माडगूळकर हे कथाकार म्हणून ओळखले जातात. नव-कथेमध्ये महत्त्वाचे नव-कथाकार म्हणून व्यंकटेश माडगूळकर यांचा उल्लेख केला जातो. परंतु त्यांच्या कादंबऱ्यातून त्यांचे तत्कालीन जीवनाची मोठी पार्श्वभूमी आपल्याला दिसून येते. तत्कालीन समस्यांचे वेगवेगळ्या पातळ्यांवरचे चित्रण दिसून येते. व्यंकटेश माडगूळकर यांचे वाङ्मयीन क्षेत्र फार मोठे आहे. त्यात कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्रात्मक, प्रवासवर्णन, ललित, अनुवादित, रेखाचित्र संग्रह, चित्रपटकथा असा फार मोठा विस्तार आहे. तर या साहित्यप्रकारांपैकी मी त्यांचा कादंबरी हा साहित्यप्रकार निवडलेला आहे. व्यंकटेश माडगूळकर यांनी एकूण आठ कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. 'सत्तांतर', 'पुढचं पाऊल', 'करुणाष्टक', 'चित्रकथा', 'कोवळे दिवस', 'बनगरवाडी', 'छोटा जवान', 'वावटळ' अशा एकूण आठ कादंबऱ्यांचा समावेश आहे. यापैकी मी त्यांच्या पाच निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास करणार आहे.

## समारोप

'व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास' या विषयांतर्गत माडगूळकर यांच्या निवडक पाच कादंबऱ्यांचा अभ्यास करणार आहे. या प्रबंधिकेचा अभ्यास व शोध घेण्यासाठी एकूण पाच प्रकरणांची रचना करण्यात आली आहे. पहिल्या प्रकरणात कादंबरी या साहित्यप्रकाराचा

आढावा घेण्यात आला आहे. दुसऱ्या प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर व्यक्ती आणि कर्तुत्व याबद्दल मांडणी करण्यात येणार आहे. तिसऱ्या प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यात येणार आहे. चौथ्या प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन करण्यात येणार आहे. शेवटच्या प्रकरणात समारोप आणि निष्कर्ष मांडण्यात येणार आहे.

# प्रकरण १

# कादंबरी एक साहित्यप्रकार

## प्रास्ताविक

'कादंबरी' हा सर्वात लोकप्रिय असा साहित्यप्रकार आहे. कविता, कथा, नाटक या साहित्यप्रकाराचा विचार केला तर कादंबरी आधुनिक काळात उदयाला आलेला साहित्यप्रकार आहे. इंग्रजांनी सुरू केलेल्या इंग्रजी शाळांमुळे मराठी विद्यार्थ्यांचा इंग्रजी वाङ्मयाशी संबंध आला. इंग्रजी कादंबरीचा जन्म पुष्कळ टीकाकार १८ व्या शतकात जेव्हा फील्डिंग ह्या लेखकाने आपले 'टॉम जोन्स' या नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले तेव्हाच अर्वाचीन कादंबरीचा जन्म झाला असे मानतात. पण काही टीकाकार एकट्या फील्डिंगला कादंबरीच्या जन्मदातेपणाचा मान न देता, त्याच्या समकालीन रिचर्डसन, स्टर्न, स्मॉलेट इत्यादींना मिळून देतात. कादंबरी हा वाङ्मयप्रकार इंग्रजी साहित्याच्या प्रभावातून मराठीत 'कांदबरी' या नावाने रूढ झालेला दिसून येतो. इ.स.च्या सहाव्या शतकामध्ये संस्कृतमध्ये बाणभट्टांनी 'कादंबरी' या नावाने काल्पनिक कथाकाव्य लिहिले आहे. 'कादंबरी' हे त्या कादंबरीचे नाव होते. त्याच्यातील नायिकेचे नावही कादंबरीच होते. तिचे स्वरूप मोठे पुस्तक, एकच कथा अशा पद्धतीचे असल्याने अशा स्वरूपाच्या लेखनाला मराठीत कादंबरी म्हणण्यास सुरूवात झाली.

मराठी कादंबरीच्या इतिहासाकडे पाहिले तर असे लक्षात येते की १८५७ मध्ये मराठी कादंबरीची सुरुवात झाली आहे. १८५७ साली बाबा पद्मनजींनी लिहिलेल्या 'यमुनापर्यटन' या कादंबरीपासून कादंबरीची सुरुवात म्हणून ओळखले जाते. या कादंबरीत विधवांच्या स्थितीचे चित्र रेखाटण्यात आले आहे. विधवा-विवाहाचा कायदा १८५६ साली पास झाला होता. त्यानंतर हळबे, रिसबूड, गुंजीकर, आपटे इत्यादी लेखकांनी कादंबरी परंपरेला सकस केलेले दिसते. मराठी कादंबरीचा विचार करताना मराठीतील पहिली कादंबरी म्हणून ज्या कादंबरीचा उल्लेख केला जातो ती 'यात्रिक क्रमण' (१८४१) ही जॉन बनियन यांच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' चा अनुवाद हरी केशवजी यांनी केला आहे. याचाच अर्थ मराठीतील पहिली कादंबरी भाषांतरित आहे. मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून 'यमुनापर्यटन' या कादंबरीचा उल्लेख केला जातो. काही टीकाकारांनी मतभेद व्यक्त केलेला

आहे. बापट प्र. वा., व गोडबोले ना. वा., यांच्या 'मराठी कादंबरी-तंत्र आणि विकास', पृ. २०० या पुस्तकात बापट-गोडबोले यांचे मत आहे की "कादंबरीचे व्यवच्छेदकविशेष असे घटक 'यमुनापर्यटनांत' सापडत नाहीत. कादंबरीचा आकारही साधारण मोठ्या गोष्टीएवढा आहे, म्हणून या कृतीस रामोजी गणोजी संप्रदायांतच घालणे अधिक योग्य आहे."[१]

कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, अशा विविध साहित्यप्रकारातून मराठी साहित्य समृद्ध झाले आहेत. कादंबरी हा साहित्यप्रकार इतर प्रकारांपेक्षा बराच वेगळा प्रकार आहे. कादंबरीत सर्व साहित्यप्रकारांचा समावेश होतो. कादंबरीच्या स्वरुपावर कादंबरीचे प्रकार ठरविले जातात. तसेच ऐतिहासिक, सामाजिक, व पौराणिक इत्यादी कादंबरीचे प्रकार कालखंडावरून ठरविले जातात.

प्रस्तुत पहिल्या प्रकरणात कादंबरी या साहित्यप्रकाराचे स्वरूप, कादंबरीची व्याख्या, कादंबरीचे घटक, कादंबरीचे प्रकार, मराठी कादंबरीचा विकास आणि वाटचाल या गोष्टींचा आढावा घेण्याचे योजले आहे.

## १.१ कादंबरी या साहित्यप्रकाराचे स्वरूप:

'कादंबरी' हा आधुनिक कालखंडातील सर्वाधिक लोकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. कालानुसार कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या संकल्पना बदलत गेलेल्या दिसतात. तसे पाहायला गेले तर कोणत्याच ललित वाङ्मयप्रकाराची व्याख्या करणे शक्य नाही. असे म्हणू शकतो की ज्याला साहित्याची जाण आहे म्हणजेच समीक्षक आणि वाङ्मयाचे जाणकार त्या विशिष्ट साहित्यप्रकाराची लक्षणे किंवा वैशिष्ट्ये सांगत असतात. कादंबरीच्या अनेक व्याख्या अभ्यासकांनी केलेल्या आहेत.

'नावल' किंवा 'नॉव्हेल' असे इंग्रजीत कादंबरीला म्हणतात. मराठीमध्ये या नामाभिधानावरुन कादंबरी हा वाङ्मयप्रकार रूढ झाला. वास्तविक पाहता इंग्रजांमुळेच मराठीमध्ये कादंबरी हा वाङ्मयप्रकार आला असे म्हणण्यात काही चूक नाही. कारण आरंभीच्या काळात फक्त इंग्रजी कादंबरीचे भाषांतर वा अनुवाद मराठीमध्ये करीत होते. मराठीत अगदी बाराव्या, तेराव्या शतकापासून लीळाचरित्रासारखे दर्जाचे गद्य मराठी भाषेतच लिहिले होते. ह्या गद्याकडे कादंबरी म्हणून पाहणे शक्य झाले असते पण तसे

न होता इंग्रजांच्या आगमनानंतर मराठी साहित्यात ‘कादंबरी’ हा वाङ्मयप्रकार विकसित झालेला दिसून येतो.

ह्या वाङ्मयप्रकाराचा विचार केला तर असे समजते की ह्याचा आवाका खूप मोठा असून त्यात कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण निर्मिती, भाषाशैली इत्यादी घटकांनी तयार झालेला हा वाङ्मयप्रकार आहे. कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करत असताना कादंबरीचे घटक यांचा विचार करावा लागतो. त्याचबरोबर कादंबरीची विविध व्याख्या जाणून घेणे आवश्यक ठरते.

## १.१.१ कादंबरीची व्याख्या

कादंबरी या वाङ्मयप्रकाराची व्याख्या करून त्या व्याख्येत कादंबरीला बांधणे म्हणजे अवघड काम आहे. तरी देखील काही अभ्यासकांनी कादंबरी ह्या वाङ्मयप्रकाराला व्याख्येत बांधण्याचा प्रयत्न केला आहे. कादंबरीची व्याख्या करत असताना वेगवेगळया अंगाने कादंबरीवर भर देण्यात येतो. मानवी जीवनाचे प्रतिबिंब रेखाटणाऱ्या कादंबरीचे स्वरूप स्पष्ट नसून ते गुंतागुंतीचे असते. त्यामुळे तिला व्याख्येत बांधणे कठीण कार्य ठरते.

**कॅथरीन लीव्हर:** उषा हस्तक, यांच्या ‘साहित्य: अध्यापन आणि प्रकार’ पृ. २५२. या पुस्तकात कॅथरीन लीव्हर यांनी कादंबरीचीजी व्याख्या केली आहे ती दिली आहे. ते म्हणतात, “कादंबरी म्हणजे कथनात्म लिखित गद्याचा बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल असा लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंगवून टाकणारा रचनाबंध होय.”[२] कॅथरीन लीव्हर यांनी केलेली कादंबरीची व्याख्या पटण्यासारखी आहे कारण कादंबरी ही गद्यात्मक स्वरुपाची असून त्यात कथा असते. तसेच लेखक स्वतः कादंबरीची नव्याने निर्मिती करत असून आपल्या कल्पनेच्या माध्यमातून निर्माण केलेल्या वास्तवात लेखक वाचकांना गूंतवून ठेवत असतो.

**अर्नेस्ट बेकर:** मदन कुलकर्णी यांच्या ‘मराठी प्रादेशिक कादंबरी: तंत्र आणि स्वरूप’, पृ. ५. या पुस्तकात अर्नेस्ट बेकर यांनी कादंबरीची केलेली व्याख्या दिली आहे . ते म्हणतात, “ज्यात मानवी जीवनाचे स्पष्टीकरण केले गेले असेल असा गद्यात लिहिलेला कल्पित वृतांत म्हणजे कादंबरी.”[३]

कादंबरीत मानवी जीवनाचे स्पष्टीकरण केले जाते पण मानवी जीवनाचे चित्रण व्हावे हा एकमेव हेतू ठेवून लेखक कादंबरीचे लेखन करीत नसतो. अर्नेस्ट बेकर यांनी केलेली व्याख्या मला पूर्णतः पटत नाही.

**प्र. वा. बापट व ना. वा. गोडबोले:** बापट व गोडबोले यांनी 'मराठी कादंबरी-तंत्र आणि विकास', पृ. ३३ या पुस्तकात केलेली व्याख्या दिली आहे. ते म्हणतात, "सत्यसृष्टीच्या आधारानें काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करुन, काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रें व काही अंशी तद्वलंबित जीवित-घटना यांचे गोष्टरूपानें वर्णन करून, व कलानंदाची प्राप्ति करवून जीवितांतील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्यवाङ्मयविभाग म्हणजे कादंबरी."[४] बापट आणि गोडबोले यांनी केलेली व्याख्या बरोबर आहे असे जाणवते कारण काही वेळा लेखक कादंबरीत सत्य घटनेच्या आधाराने आपल्या कल्पनेचा वापर करून काल्पनिक पात्रांच्या माध्यमातून कादंबरी रंगवत असतो. प्र. वा. बापट व ना. वा. गोडबोले यांनी काल्पनिक प्रतिसृष्टीला महत्त्व दिले आहे.

**कुसुमावती देशपांडे:** कुसुमावती देशपांडे यांनी 'मराठी कादंबरी' पृ. १६ या पुस्तकात कादंबरीची केलेली व्याख्या दिली आहे. त्या म्हणतात "पार्थिव संसाराविषयी अस्था ही कादंबरीची वृत्ती. जीवनाचे कानेकोपरे चौकशपणे धुंडाळणे, तत्त्वदर्शित्त्वाचा किंवा अद्भुताचा मार्ग धरुन मुलतः मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टीकोण. जीवनविषयक अनुभव वा कल्पना या कादंबरीचा मुळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री. ही वृत्ती, हा दृष्टीकोण, हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एका विस्तृत, आकर्षक कथानकाच्याद्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पद्धती."[५] कुसुमावती देशपांडे यांनी कादंबरीच्या व्याख्येला एक वेगळा आयाम दिलेले दिसून येते. त्यांनी कादंबरीची वृत्ती, दृष्टिकोन, अनुभव, व कल्पना यांना ध्यानी ठेवून कादंबरीची व्याख्या केली आहे. त्या असे म्हणतात की ह्या चार घटकांच्या आधारे जिवंत व्यक्तिचित्रे व आकर्षक अशा कथानकाच्याद्वारे व्यक्त होणाऱ्या साहित्यप्रकाराला कादंबरी असे म्हणता येते.

**भालचंद्र नेमाडे:** भालचंद्र नेमाडे, यांनी 'टीकास्वयंवर' पृ. १९८ या पुस्तकात कादंबरीची केलेली व्याख्या दिली आहे. ते म्हणतात, "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली आशयसूत्राचे अनेक पदर असलेली त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी अनेक पात्रे प्रसंग- अपुर्णतेपेक्षा संपुर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते. कादंबरीत त्या सर्व गोष्टींमुळे एखादी मोठी

कृती साकल्याने मांडता येते. सामाजिक आशय विशाल असावा लागतो एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासह मांडलेला असतो. एखाद्या पोटसमुहाचे, पोटसंस्कृतीचे तपशीलाचे दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात पात्रे सलग उभी राहतात."[६] नेमाड्यांनी लांबलचक अशी व्याख्या करून कादंबरीच्या अनेक वैशिष्ट्यांचा समावेश केलेला आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे अनेक असे आशय आपल्याला कादंबरीत पाहावयास मिळते. अनेक आशय असल्याने विविध पात्रे, घटना प्रसंग यांचा वापर करून लेखक आपली कादंबरी पूर्ण करीत असतो. विविध पात्रे, घटना प्रसंगामुळे लेखक सहज कादंबरीची मांडणी करू शकतो. कादंबरीत संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतोच. अशा विविध वैशिष्ट्यांमुळे भालचंद्र नेमाडे यांनी केलेली कादंबरीची व्याख्या महत्त्वाची ठरते.

एकंदरीत कादंबरीच्या विश्लेषणाच्या संदर्भात या वरील पाचही व्याख्या महत्त्वाच्या आहेत. या व्याख्यांचा विचार करून व्यंकटेश माडगूळकर यांच्या अभ्यासासाठी घेतलेल्या कादंबऱ्यांचा विचार केला असता, कादंबरी समजून घेण्यासाठी वरील सर्व व्याख्या महत्त्वाच्या आहेत. आणखी अनेक जणांनी कादंबरीची व्याख्या केलेल्या आहेत परंतु ह्या महत्त्वाच्या व्याख्या या ठिकाणी घेतलेल्या आहेत. यावरून एकूण कादंबरीचे स्वरूप काय असते ते आपल्या लक्षात येईल. या व्याख्यांच्या अनुषंगाने ज्यावेळी आपण व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करू लागतो तेव्हा त्यांच्या कादंबऱ्यांचे स्वरूपही आपल्या लक्षात येते. त्यांच्या लेखनात समाज समूह, संस्कृती, लोकजीवन, समस्या जाणवतात. तसेच त्यांनी आपल्या कादंबरीत जे विषय मांडलेले आहेत त्यातले काही त्यांनी स्वतः अनुभवलेले आहे तर काही समाजात जे घडते आहे त्याला कल्पनेच्या माध्यमातून रंगवून त्याचे प्रतिबिंब म्हणून त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून व्यक्त केले आहे.

## १.२ कादंबरीचे घटक

खालील कादंबरीचे महत्त्वाचे घटक आहेत.

### १.२.१ कथानक

कादंबरी या साहित्यप्रकाराचा अभ्यास करत असताना कथानक हा महत्त्वाचा घटक लक्षात घेण्यासारखा आहे. कादंबरीत कथानकाला मोठे स्थान आहे. कादंबरीत महत्त्वाचे असे कथानक

असतेच. कथानक म्हणजे कादंबरीमध्ये जे विविध प्रसंग आणि घटना येतात त्यांच्या माध्यमातून एक चित्र उभे राहते. कथानकाच्या माध्यमातून कादंबरीकार वाचकाला काही तरी सांगत असतो. जे काही कादंबरीकार आपल्या कादंबरीत मांडत असतो त्याचे बीज आधीच त्याच्या मनात पडलेले असते. जे काही विषय कादंबरीकार आपल्या कादंबरीत मांडत जातो तसेतसे हळूहळू कादंबरीचे कथानक आकार घेऊ लागते. वाचक वाचत असताना त्या कथानकात समरसून जातो अशा तऱ्हेने कथानकाची रचना केलेली असते.

### १.२.२ व्यक्तिरेखा

कादंबरीतील ‘व्यक्तिरेखा’ या घटकाला देखील कादंबरीच्या कथानक या घटकासारखा महत्त्व असते. व्यक्तिरेखा हा घटक मानवी जीवनाचे प्रतिरूप म्हणून येतात. असे असून देखील व्यक्तिरेखा वास्तवातील व्यक्तींची जशाच्या तशी प्रतिबिंब नसतात, तर लेखक आपल्या प्रतिभेच्या माध्यमातून कादंबरीतील व्यक्तिरेखा चित्रित करण्याचा प्रयत्न करीत असतो. वाचक कादंबरी वाचत असताना ती व्यक्तिरेखा किंवा ज्या मानवी मनाचे लेखकाने चित्रण केलेले आहे ते जणू आपल्याच अवतीभोवती वावरत असल्याची जाणीव करून त्यात समरसून जातात. लेखक आपल्या शैलीच्या माध्यमातून व्यक्तिरेखा अशी रंगवत असतात की वाचक वाचत असताना ती व्यक्तिरेखा वाचकांच्या डोळयांसमोर उभी राहते.

### १.२.३ वातावरण निर्मिती

कादंबरी वाङ्मयात वातावरण निर्मितीला महत्त्वाचे स्थान आहे. वातावरण निर्मितीमुळे पात्रे, कथानक, घटना प्रसंग यांना जीवंतपणा प्राप्त होतो. कादंबरीचा कालखंड, कादंबरीचा प्रकार लक्षात घेऊन लेखक त्याप्रमाणे वातावरण आपल्या कादंबरीत निर्माण करीत असतो. कादंबरी वाचकाला अशा विश्वात घेऊन जाते की त्या विश्वाचा प्रत्यय, अनुभव येण्यासाठी वातावरण निर्मिती हा घटक महत्त्वाचा ठरतो. कादंबरीतील घटना प्रसंग, संघर्ष, कथानक लक्षात घेऊन योग्य असे वातावरण निर्माण करणे गरजेचे असते आणि हे सर्व वातावरण निर्मितीमुळे होऊ शकते.

### १.२.४ निवेदन पद्धती

निवेदन हा कादंबरीचा महत्त्वाचा असा घटक आहे. कादंबरीचा समग्रपट वाचकांपुढे उलगडण्यासाठी निवेदनाला अतिशय महत्त्व आहे. निवेदन तंत्राचा लेखक आपल्या कादंबरीत क्रमाक्रमाने किंवा पायरीपायरीने वापर करत असतो. कादंबरीत व्यक्त होणारे सगळे अनुभव निवेदनातून सूचित होतात. प्रथम पुरुषी निवेदन, तृतीय पुरुषी निवेदन अशा निवेदन पद्धतीचा वापर कादंबरीत लेखक करीत असतो. प्रथम पुरुषी निवेदन म्हणजे एक पात्र स्वतःहून सर्व प्रसंग, घटना सांगत असतो तर तृतीय पुरुषी निवेदन म्हणजे लेखक त्रयस्थाची भूमिका स्वीकारुन प्रसंग वर्णन करत असतो. कादंबरीच्या कथानकातील प्रसंग, घटना, पात्रांमधले संभाषण अशा गोष्टींचा समावेश निवेदनात होतो.

### १.२.५ भाषाशैली

कादंबरीत पात्रांच्या मुखी असलेले संवाद, निवेदन या घटकांमुळे कादंबरीची भाषा तयार होते. बोली तसेच प्रमाण भाषेचा वापर कादंबरीत केला जातो. लेखक आपल्या कादंबरी लेखनात साधी, सोपी तसेच अलंकारिक भाषेचा वापर करतात. पात्रांचा दर्जा पाहून लेखक त्या पद्धतीची भाषा त्यांच्या मुखी देतो. कादंबरीत व्यक्तीनुरूप भाषा बदलत असते. ग्राम, नगर, महानगर, धर्म, जात, प्रांत, प्रदेश, राहणीमान या अनुषंगाने भाषा बदलत असते. “भाषा ही अर्थवाही व सूचक पाहिजे. तिला थोडक्यात मोठा आशय व्यक्त करता आला पाहिजे. पात्रे व प्रसंग डोळयांसमोर उभे करण्याचे तीत सामर्थ्य पाहिजे.”[७] अनेक कादंबऱ्या भाषेमुळे प्रभावी ठरतात. उदाहरणार्थ: व्यंकटेश माडगूळकर यांच्या ‘बनगरवाडी’ या कादंबरीचा विचार केला तर लेखकांनी साधी, सोपी, पात्रांच्या मुखी साजेल अशा भाषेचा वापर केलेला आहे. लेखकांनी अशा पद्धतीची भाषा वापरून व्यक्तिरेखा, घटना प्रसंग चित्रीत केलेले आहेत की वाचताच क्षणी ते चित्र, प्रसंग हुबेहूब वाचकांच्या डोळयांसमोर उभे राहतात.

## १.३ कादंबरीचे प्रकार

कादंबरी संदर्भात जाणून घेत असताना कादंबरीचे प्रकार जाणून घेणे तेवढेच महत्त्वाचे आहे. कादंबऱ्यांच्या विषयात व स्वरुपात काळाच्या प्रवाहात बदल होत गेला व कादंबऱ्यांच्या प्रकारात नाविन्यता येत गेली. कादंबऱ्यांचे अनेक प्रकार उदयास आले. घटनाप्रधान, व्यक्तिप्रधान, उद्देशप्रधान असे वर्गीकरण कादंबरीच्या प्रमुख घटकाच्या आधारावर केले आहेत. अद्भुतरम्य व वास्तववादी असे

दोन प्रकार कथानकातील आशयाच्या सत्यासत्यतेकडे लक्ष देऊन मांडता येतात. ऐतिहासिक, राजकीय, व सामाजिक असे वर्गीकरण कालखंडाचा विचार केल्यास केले जाते. ग्रामीण व प्रादेशिक असे दोन प्रकार प्रदेशनिष्ठ स्वरूपाचे आहेत. नाटकीय व विश्लेषणात्मक असे दोन प्रकार शैलीच्या आधारावर करता येते. भावनाप्रधान, विचारप्रधान, व मनोविश्लेषणात्मक असे तीन वर्गीकरण अंतरंगावर आधारित करता येते. भालचंद्र नेमाडे यांनी आपल्या 'टीकास्वयंवर' या पुस्तकात मराठी कादंबरीच्या तीन मूळ प्रवृत्ती सांगितल्या आहेत. त्यात 'यमुनापर्यटनप्रवृत्ती', 'मुक्तामालाप्रवृत्ती', व 'मोचनगडप्रवृत्ती' यांचा समावेश होतो.

## १.३.१ ऐतिहासिक कादंबरी

मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी रा. भि. गुंजीकर यांची 'मोचनगड' १८६७ साली लिहिली गेली. १८६७ ते १९२० या काळात अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. त्यानंतर ऐतिहासिक कादंबरीचे लेखन थांबून १९६० नंतर परत ऐतिहासिक कादंबऱ्यांना बहर आला. १८६७ ते १९२० या काळात रा. भि. गुंजीकर, ह. ना. आपटे, चिं. वि. वैद्य, नाथमाधव अशा अनेक लेखकांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. ऐतिहासिक कादंबरीच्या नव्या युगाचा प्रारंभ रणजित देसाई यांच्या 'स्वामी' (१९६२) या कादंबरीपासून झाला. त्यानंतर ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून विश्वास पाटील यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी 'पानिपत', 'महानायक', 'संभाजी' अशा काही कादंबऱ्यांचे लेखन केले. इतिहासाच्या आधारावर ऐतिहासिक कादंबऱ्यांचे लेखन केले जाते. जुने ग्रंथ, कागदपत्रे, यांच्या आधारे लेखकांनी आपल्या ऐतिहासिक कादंबरीत पात्रे, घटना, स्थले, यांचा वापर केलेला असतो. इतिहास म्हणजे एका अर्थी घडलेल्या गोष्टी असतात आणि त्या गोष्टींची कालक्रमानुसार नोंद करावी लागते. जे पूर्वी घडलेले आहे ते इतिहासकाराला टिपून ठेवावे लागते. "ऐतिहासिक कादंबरी ही भूतकालीन घटनांची कथा असते आणि या भूतकालीन घटनांच्या विवेचनासाठी कल्पनाशक्ती वापरलेली असते."[८] ऐतिहासिक कादंबरीचा विचार करत असताना कादंबरीतील पात्रे, घटना प्रसंग जशाच्या तशी त्याच क्रमावर घेत असून कादंबरीकार काल्पनिक पात्रे निर्माण करुन व्यक्तिमत्त्वांना जीवन, शोभा देण्याचे कार्य करीत असतो. ऐतिहासिक कादंबरीचे स्वरूप ठरविण्यासाठी कादंबरी कोणत्या उद्देशाने लिहिली जाते यावर अवलंबून असते.

## १.३.२ पौराणिक कादंबरी

'ययाति' ही कादंबरी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि. स. खांडेकर यांची असून ही कादंबरी पौराणिक कादंबरीचे उदाहरण आहे. पौराणिक कादंबरीत जी व्यक्तिरेखा, कथा, प्रसंग, काल, असते ते प्राचीन ग्रंथ, पुराणे, रामायण, महाभारत इत्यादीतून घेतले जाते. परंतु पुराव्याची गरज भासत नाही. काही मोजक्या गोष्टी सोडल्या तर इतर बाबतीत पाहिजे तसे थोड्याप्रमाणात बदल केला तरी चालतो. पौराणिक व्यक्तिरेखा, कथा यावर पौराणिक कादंबरी आधारित असून त्यांना पौराणिक कादंबरी म्हणून ओळखले जाते. भूतकाळ हा या कादंबरीचा विषय असल्याने कादंबरीतील वातावरणही त्या काळातले चित्रित झालेले असते. काहीवेळा कल्पनेनेही पौराणिक वातावरण तयार करून कथानक रचले जाते. 'मृत्युंजय', 'राधेय', 'महापुरुष' इत्यादी कादंबऱ्यांचा पौराणिक कादंबऱ्या म्हणून उल्लेख केला जातो. या कादंबऱ्या महाभारतातील कर्णाच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत.

## १.३.३ चरित्रात्मक कादंबरी

चरित्रात्मक कादंबरीचा पाया म्हणत असताना लक्षात येते ते म्हणजे विशिष्ट समाजात जगणारी व्यक्ती आणि तिचे चरित्र. चरित्रात्मक कादंबरीत व्यक्तीचा इतिहास असतो. चरित्रात्मक कादंबरीत असलेल्या नायकाच्या जीवनात प्रत्यक्ष घडलेले प्रसंग, घटना व त्या नायकाला भेटलेल्या व्यक्तींना महत्त्व असतो. समाज जीवनातील काही लोकांना या कादंबरीत महत्त्वाचे स्थान असतेच. भीमराव कुलकर्णी यांच्या 'हरिभाऊ' या कादंबरीपासून चरित्रात्मक कादंबरीचा आरंभ झाला. जीवनस्वप्न', 'आनंदी गोपाळ', 'यज्ञ', 'साहेब', 'दोन खंडांतली दुर्दम्य', 'उत्तर योगी', 'पुत्र मानवाचा', 'युगप्रवर्तक', ह्या काही चरित्रात्मक कादंबऱ्यांची उदाहरणे आहेत. या कादंबऱ्यांतून आचार्य अत्रे, आनंदीबाई जोशी, योगी अरविंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, शरदचंद्र, डॉ. आंबेडकर, सावरकर अशांची जीवनचरित्रे आलेली आहे.

## १.३.४ आत्मचरित्रात्मक कादंबरी

'आत्मचरित्र' व 'कादंबरी' या दोहोंची काही वैशिष्ट्ये एकत्र, मिश्रित होऊन तयार झालेल्या वाङ्मयप्रकाराला 'आत्मचरित्रात्मक कादंबरी' असे म्हटले जाते. या प्रकारच्या कादंबरीत लेखक स्वतःच स्वतःच्या जीवनाविषयी लिहित असतो. आत्मचरित्रातील घटना, पात्रे ही वास्तवातील असतात पण

कादंबरीतील पात्रे, घटना, प्रसंग हे काल्पनिक असतात. वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ अशा दोन्ही दृष्टिकोनातून आत्मचरित्रात्मक कादंबरीतील व्यक्तिरेखांचे दर्शन घडत असते. 'झोंबी' 'दैवलीला', 'करुणाष्टक', 'माझी कोरीव लेणी', 'कुण्या एकाची भ्रमणगाथा' इत्यादी आत्मचरित्रात्मक कादंबरीचे उदाहरण आहे.

## १.३.५ सामाजिक कादंबरी

कादंबरीचा इतिहास पाहिला की असे दिसून येते, की सामाजिक कादंबरीचे लेखनही मोठ्या प्रमाणात झालेले आहे. खरतर 'यमुनापर्यटन' या सामाजिक कादंबरीनेच मराठी कादंबरीची सुरूवात झाली आहे. सामाजिक कादंबरीत लेखक आपल्या अवतीभोवती जे काही घडते त्याचे प्रतिबिंब मांडत असतो. ज्यावेळी आपण सामाजिक कादंबरी वाचण्यासाठी निवडतो त्यावेळी वाचत असताना त्यातील काही संघर्ष, घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा आपल्याच परिचयाची आहे अशी जाणीव होते. विशिष्ट वास्तव, समाज याचे चित्रण यात केले जाते. जेव्हा सामाजिक कादंबरी लेखक लिहावयास घेतो त्यावेळी सहाजिकच एका समाजाचे प्रतिबिंब आपल्या कल्पनेच्या माध्यमातून करीत असतो. विशिष्ट समाज म्हणत असताना त्या समाजातील लोकांचा व्यवसाय, राहणीमान, नाते-संबंध, विविध स्वभावाची माणसे, त्यांची मानसिकता, संस्कृती इत्यादी अशा भिन्न गोष्टींचा विचार केला जातो. ह. ना. आपटे, व्यंकटेश माडगूळकर, श्री. ना. पेंडसे, वि. स. खांडेकर, गो. नी. दांडेकर, आनंद यादव इत्यादी साहित्यिकांनी सामाजिक कादंबरीचे लेखन केलेले आहे. जसे काळात जगण्यात परिवर्तन होते तसेच सामाजिक कादंबरीच्या विषयात परिवर्तन झाल्याचे दिसून येते. 'ब्राह्मणकन्या', 'चक्र' ह्या समाजजीवनाचे चित्रण करणाऱ्या सामाजिक कादंबऱ्या आहेत.

## १.३.६ प्रादेशिक कादंबरी

जर एखाद्या कादंबरीत एका विशिष्ट प्रदेशाबद्दल मांडणी केलेली असेल तर त्याला प्रादेशिक कादंबरी म्हणण्यात येते. प्रादेशिक कादंबरीत एकंदरीत एखाद्या प्रदेशातील राहणीमान, त्यांची संस्कृती, भाषा, व्यवहार, जीवनशैली, खानपान, विचार या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन कादंबरीची रचना केली जाते. ग्रामीण आणि प्रादेशिक सारखेच दिसले तरी त्यात फरक जाणवतो ग्रामीण कादंबरीत एका विशिष्ट गावातील चित्रण तिच्या वैशिष्ट्यांसह चित्रित होते पण ज्यावेळी प्रादेशिक कादंबरीचा उल्लेख होतो तेव्हा त्या कादंबरीत एका विशिष्ट प्रदेशाचे चित्रण आणि त्याचे वैशिष्ट्य लेखक त्यात काही बदल करून

आपल्या कल्पनेच्या माध्यमातून कादंबरीत मांडत असतो. भावीण, टारफुला, फकिरा, माणूस इत्यादी कादंबऱ्याचा प्रादेशिक कादंबरीत समावेश होतो.

### १.३.७ ग्रामीण कादंबरी

ज्या कादंबरीतून ग्राम जीवनातील व्यक्तींची वृत्ती-प्रवृत्ती, ग्रामीण भागातील घटना, प्रसंग, समस्या यांचे वर्णन, चित्रण, किंवा मांडणी केली जाते त्या कादंबरीला ग्रामीण कादंबरी असे संबोधले जाते. आपल्या देशातील अनेक लोक खेड्यात राहतात. अशा खेडेगावातील रूढी-परंपरा, सण-उत्सव, जीवनपद्धती, संस्कृती, त्यागावातील लोकांच्या अनेक समस्या, खानपान याचा समावेश ग्रामीण कादंबरीत होत असतो. 'तहान', 'गोतावळा' ह्या काही ग्रामीण कादंबऱ्या आहेत.

### १.३.८ राजकीय कादंबरी

ज्या कादंबरीची पार्श्वभूमीवर राजकीय स्वरूपाची असते त्या कादंबरीला राजकीय कादंबरी संबोधले जाते. या कादंबरीत विषय व आशय राजकीय पार्श्वभूमीचा असतो. ही कादंबरी राजकीय जीवन, राजकीय घटना-प्रसंग, राजकारण यावर आधारित असते. या कादंबरीतील व्यक्तिरेखा भिन्न-भिन्न वर्गाची प्रतिनिधी स्वरूप असतात. अरूण साधू लिखित 'मुंबई दिनांक', 'सिंहासन', व 'तडजोड' याच स्वरुपाची कादंबऱ्या आहेत.

वर सांगितल्याप्रमाणे ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, आत्मचरित्रात्मक, सामजिक, प्रादेशिक, ग्रामीण, राजकीय इत्यादी महत्त्वाच्या प्रकारांचा आपण परिचय करून घेतला. त्याचबरोबर महानगरीय, दलित, समस्या प्रधान, मनोविश्लेषणात्मक किंवा संज्ञाप्रवाही, नव कादंबरी, मानसशास्त्रीय कादंबरी, मालिका कादंबरी, महाकादंबरी इत्यादी कादंबरीचे प्रकार देखील महत्त्वाचे आहेत.

## १.४ मराठी कादंबरीचा विकास आणि वाटचाल

कादंबरी या साहित्यप्रकारामध्ये कालपरत्वे झालेल्या विकासाचा आढावा थोडक्यात साहित्यप्रवाहाच्या वाटचालीच्या आधारे ह्या प्रकरणात घेतला जाणार आहे. 'कादंबरी' या वाङ्मयप्रकाराला लोकप्रियता लाभली असली तरी तिचा विकास प्रथमतः पाश्चात्य देशात झाल्याचे दिसून येतो.

काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांनी सुमारे इ. स. १८७२ साली ‘नावल व नाटक’ या विषयी निबंध लिहून कादंबरीविषयी आपले विचार स्पष्ट केल्याचे आढळते. काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांनी इंग्रजी ‘नॉव्हेल’ या शब्दाला मराठीत ‘नावल’ हा पर्यायी शब्द वापरलेला दिसून येतो. यासंदर्भात काशीनाथ बाळकृष्ण मराठे म्हणतात, “नावल म्हणजे चमत्कारिक गोष्ट ज्यात आश्चर्यकारक गोष्टी फार व जो वाचला असता अव्वलपासून अखेरपर्यंत वाचणरास जागोजाग नवल वाटावे, अशा अर्थसाम्यांवरून मराठीतही सदरहू ग्रंथाचे तेच नाव राखले असता चिंता नाही.”[९] एकंदरीत असे वाटते की कादंबरीच्या स्वरूपासंबंधी कल्पना देण्याचा प्रयत्न मराठे यांनी केला. प्रामुख्याने ‘मुक्तामाला’, ‘रत्नप्रभा’, ‘मंजुघोषा’ आणि काही इतर अद्भुतरम्य कादंबऱ्या होत्या, या कादंबऱ्यांना आधारभूत मानून त्यांनी कादंबरी संदर्भात विवेचन केले आहे. रंजनवादी स्वरुपाची कादंबरी सुरुवातीच्या कालखंडात होती. या कालखंडातील वैशिष्ट्ये म्हणजे रहस्यमयता, अद्भुतता, असंभाव्य पातळीवरील घटनांची मोठी रेलचेल होय.

‘यमुनापर्यटन’ ह्या कादंबरीने जरी कादंबरी वाङ्मयप्रकाराला जन्म दिला असला तरी त्या कादंबरीचा हेतू ख्रिश्चन धर्माचा प्रचार करण्याचा होता. कादंबरी हा शब्द कुठून आला असावा हे जाणून घेण्यासाठी पुढील व्याख्या महत्त्वाची आहे. “प्राचीन मराठी साहित्यात छपाईच्या अभावामुळे गद्याची परंपरा नाही. म्हणून कादंबरी हा वाङ्मयप्रकारही नाही. परंतु आपण असे म्हणू शकतो, मराठीमध्ये कादंबरीच्या जन्मासाठी इंग्रजी वाङ्मयाचा हातभार लागलेला आहे. इंग्रजी साहित्याच्या परिशिलनातून मराठी कादंबरी हा साहित्यप्रकार जन्माला आला हे सत्य आहे. याचाच अर्थ आज मराठीत कादंबरी स्वरूपात रुजलेला वाङ्मयप्रकार अमराठी आहे. युरोपातून आलेल्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनी तो महाराष्ट्रात परिचित करून दिला.”[१०] बाणभट्टानी संस्कृतमध्ये लिहिलेल्या ‘कादंबरी’ या खंडकाव्यामधून मराठीमध्ये कादंबरी हा शब्द रूढ झाल्याचा दिसून येतो.

त्यानंतर १८६७ ते १९२० या काळात अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या असून ऐतिहासिक कादंबरीचा एक प्रवाह रा. भि. गुंजीकर यांच्या ‘मोचनगड’ (१८६७) या कादंबरीच्या रूपाने खुला झाला. शिवकालाच्या पार्श्वभूमीवर आधारित असलेली ही कादंबरी आहे. त्यानंतर ना. वि. बापट यांनी ‘संभाजी’, पानिपतची मोहीम’, इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. हरि नारायण आपटे यांच्या लेखनाचा कालखंड विशेष करून १८८५ ते १९२० हा मानला जातो. या कालखंडातील ह. ना. आपटे हे महत्त्वाचे

कादंबरीकार आहेत. सामाजिक आणि ऐतिहासिक अशा दोन्ही कादंबरीच्या प्रकाराचे लेखन करून त्यांनी आपल्या लेखनातून वेगळा ठसा उमटवला. त्यांच्या कादंबऱ्यांचा मूळ हेतू समाजाला चांगली दिशा दाखविणे, उद्बोधन करणे हाच होता. आपल्या आजुबाजूच्या वास्तवाचे, परिसराचे वर्णन त्यांनी साहित्यात केले आहे. त्याचबरोबर त्यांच्या लेखनावर रानडे, आगरकर, चिपळूणकर इत्यादीच्या विचारांचा प्रभावही पडलेला दिसून येतो. त्यानंतर 'मधली स्थिती' (१८८५) ही हरिभाऊंची पहिली सामाजिक कादंबरी प्रसिद्ध झाली. 'गणपतराव' (१९९९) ही त्यांची दुसरी कादंबरी आहे. 'पण लक्षात कोण घेतो? ' ही त्यांची महत्त्वाची कादंबरी आहे. पुढे हरि नारायण आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांनी नवे वळण दिले. शिवकालीन कादंबऱ्यांतून उदाहरणार्थ: 'सूर्योदय', 'सूर्य ग्रहण', 'गड आला पण सिंह गेला' लोक मानसाचे चित्रण त्यांनी उमटले. हरिभाऊंची 'वज्राघात' ही शेवटची ऐतिहासिक कादंबरी आहे. याच कालखंडात नाथ माधव, ना. ह. आपटे, ना. वि. कुळकर्णी, वि. वा. हडप, वि. सी. गुर्जर, सहकारी कृष्ण, काशीबाई कानिटकर इत्यादी लेखक होते. काशीबाई कानिटकर ह्या स्त्री लेखिका असून त्यांच्या 'पालखीचा गोंडा', 'रंगराव' ह्या कादंबऱ्या गाजल्या.

१९२० ते १९४० या कालखंडाचा विचार करत असताना असे समजते की या कालखंडातील कादंबरी लेखनावर सामाजिक घडामोडींचा प्रभाव पडलेला आहे. या कालखंडात पहिले महायुद्ध संपले (१९१९) तसेच टिळक युगाचा अंत होऊन गांधी युगाची सुरूवात झाली. या कालखंडात फडके-खांडेकर-माडखोलकर यांचे कादंबरी लेखन प्रभावी ठरले. परंतु 'सुशीलेचा देव' (१९३०) व 'इंदू काळे व सरला भोळे' (१९३५) या दोन कादंबऱ्यातून वामन मल्हार जोशी यांनी तत्कालीन जीवनाचे वेगळेच दर्शन घडविले असून फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्यापेक्षा काहीशा वेगळ्या कादंबरीची मांडणी मल्हारांनी केली. त्याचबरोबर इतर लेखक आणि त्यांच्या साहित्यकृतीचा येथे समावेश महत्त्वाचा ठरतो. डॉ. केतकर यांची 'गोंडवनातील प्रियवंदा' (१९२६), 'परागंदा' (१९२६), 'आशावादी' (१९२७), 'गावसासू' (१९३०), 'ब्रह्मणकन्या' (१९३०), 'विचक्षणा' (१९३६) इत्यादी त्यांच्या कादंबऱ्यांना प्रसिद्धी मिळाली. प्रा. ना. सी. फडके यांची स्वतंत्रपणे पहिली कादंबरी आली ती 'अल्ला हो अकबर' १९१७ या साली. या कादंबरीत फडके यांनी प्रेमप्रकरण आणि कट कारस्थानांवर भर दिला आहे. त्यांच्या काही कादंबऱ्यातून कधी उद्बोधन, कधी मनोरंजकता, तर कधी परंपरागत धर्मकल्पनांपेक्षा खरा धर्म निराळा आहे असे सुचवितात उदाहरणार्थ: 'जादूगार', 'अटकेपार', व 'दौलत' या कादंबऱ्यातून

वरील मुद्दे प्रत्ययास येतात. त्याचप्रमाणे त्यांच्या ‘प्रतिज्ञा’, ‘प्रवासी’, ‘उन्माद’, ‘समरभूमी’, इत्यादी कादंबऱ्यातून राजकीय विचारसरणीचा प्रत्यय येतो. तरीसुद्धा उधळ व वरवरचे असे त्यांचे लेखन दिसते. वि. स. खांडेकर यांनी देखील याच कालखंडात लेखन केलेले आढळते. त्यांच्या लेखनाचा कुतुहलविषय पांढरपेशा मध्यमवर्गीय समाज हाच होता. जवळपास १०-१२ कादंबऱ्यातून म्हणजेच ‘हृदयाची हाक ते क्रौचवध’ ह्या कादंबऱ्यातून मध्यमवर्गीय चित्रण केलेले आहे. ग. त्र्य. माडखोलकर यांनी राजकीय वळणाची कादंबरी लिहिली. १९३३ साली त्यांनी ‘मुक्तात्मा’ नावाची पहिली कादंबरी लिहिली. ‘कान्ता’, ‘नागकन्या’, ‘चंदनवाडी’ असे अनेक कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी केले. मामा वरेरकर यांची :चिमणी’, ‘विधवा कुमारी’, ‘फाटकी वाकळ’ इत्यादी कादंबऱ्या सापडतात. तसेच वि. वि. बोकील, मो. ग. रांगणेकर, दिवाकर कृष्ण, गं. भा. निरंतर, गोपीनाथ तळवळकर, श्रीधर देशपांडे इत्यादी लेखकांनी लेखन या कालखंडात केले परंतु यापैकी गं. भा. निरंतर, गोपीनाथ तळवळकर, श्रीधर देशपांडे यांनी लेखन केले पण ते फार यशस्वी झालेले नाही असे दिसून येते. साने गुरुजींची ‘शामची आई’ ही कादंबरी याच कालखंडातील आहे. तसेच लेखन करून लोकप्रिय झालेल्या काशीबाई कानिटकर याच काळातील असून त्यांनी ‘रंगराव’, ‘पालखीचा गोंडा’ अशा कादंबऱ्या लिहिल्या. जानकीबाई देसाई, शांताबाई नाशिककर, कमलाबाई बंबेवाले, गीता साने, इत्यादी स्त्री लेखिका आहेत. तसेच भाषांतरित अनुवादित कादंबऱ्यांचे लेखनही झालेले आहेत.

१९४० ते १९६० या कालखंडाचा विचार केला तर १९४० ते १९५० या कालखंडात प्रामुख्याने दोन कादंबरीकारांची नावे पुढे येतात उदाहरणार्थ: विश्राम बेडेकर व बा. सी. मर्ढेकर. विश्राम बेडेकर यांची ‘रणांगण’ १९३९ साली प्रसिद्ध झाली. मर्ढेकरांची लक्षणीय कादंबरी म्हणून ‘रात्रीचा दिवस’ या कादंबरीचा उल्लेख केला जातो. त्याचबरोबर त्यांनी ‘तांबडी माती’, ‘पाणी’ अशा कादंबऱ्या लिहिल्या. या कालखंडात देखील फडक्यांचे लेखन चालू होते. त्यांनी ‘उन्माद’, ‘शाकुंतल’, ‘अखेरचे बंड’, ‘माझा धर्म’, ‘अंजली’ इत्यादी कादंबऱ्या या काळात लिहिली असून आपले लेखन चालू ठेवले. बोकीलांनी या काळात कादंबरी लेखन केले आहे. ‘पाणकळा’ ही र. वा. दिघे यांची कादंबरी १९४० साली आली. नंतर वि. द. चिंदरकर यांनी ‘महापूर’ व ग. ल. ठोकळ यांनी ‘गावगुंड’ ह्या कादंबऱ्या लिहिल्या. १९५० मध्ये ‘हसू आणि आसू’ नावाची कादंबरी फडक्यांनी लिहिली. खांडेकरांनी ‘अश्रू’ या कालखंडात लिहिली. ‘ययाति’ या कादंबरीसाठी खांडेकरांना ‘ज्ञानपीठ’ पुरस्कार मिळाला. स्वातंत्रोत्तर

काळात तत्कालीन स्री जीवनातील प्रश्नांचे, समस्यांचे चित्रण करणाऱ्या विभावरी शिरूरकर यांनी १९५० साली 'बळी' ही कादंबरी लिहिली. बा. भ. बोरकर यांची 'भावीण' ह्याच काळातील कादंबरी आहे. पुढे प्रादेशिक लेखन करणारे कादंबरीकारही लेखन करु लागले. 'एल्गार', 'हद्‌पार', 'गारंबीचा बापू' इत्यादी कादंबऱ्यातून श्री. ना. पेंडसे यांनी हर्णेच्या परिसराचे चित्रण केले आहे. मराठी कादंबरीच्या वाटचालीला पेंडसेंनी एक दिशा दिली. त्यानंतर गो. नि. दांडेकरांनी विशिष्ट भूमिका ठेवून आपले लेखन केले. त्यांच्या 'प्रत्यंतर', 'पडघवली' या कादंबरीत त्यांनी अनेक कारणांमुळे ग्रामीण लोक शहराकडे वळल्यावर खेडी ओस पडत जाते, ग्राम कशाप्रकारे नष्ट होतात याचे चित्रण केले आहे. तसेच त्यांनी ह्यातूनच शितू, 'माचीवरला बुधा', 'कुणा एकाची भ्रमणगाथा', 'जगन्नाथ पंडित', 'पूर्णा मायेची लेकरे', 'पद्मा', 'आम्ही भगीरथाचे पुत्र' इत्यादी कादंबऱ्यांचे लेखन केले. त्याचबरोबर व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी' ह्या कादंबरीद्वारे असेच एक वेगळे वळण दिसून येते. या कादंबरीचे वैशिष्ट्ये म्हणजे या कादंबरीच्या भाषेतून माणसांचे भावविश्व लेखक उभे करतात. पुढे उद्धव शेळके यांची 'धग' आणि अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. तसेच वि. वा बोकील, मो. ग. रांगणेकर, दत्त रघुनाथ कवठेकर, याच कालखंडातील आहेत.

१९६० नंतर कादंबरी एक वेगळा वळण घेताना दिसून येते. लैंगिक भावनांची वर्णने, अश्लीलता कादंबरीत चित्रित होऊ लागले. उदाहरणार्थ: 'वासूनाका' (भाऊ पाध्ये), 'उभयान्वयी अव्यय' (चंद्रकांत खोत), 'श्यामा' (चंद्रकांत काकोडकर), 'बाईविना बुवा' (उद्धव शेळके), 'रात्र काळी घागर काळी' (खानोलकर), 'काळेशार पाणी' (ह.मो मराठे) इत्यादी अशी अनेक नावे सांगता येतील. भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' (१९६३) ही कादंबरी याच कालखंडातील आहे. या कालखंडात ग्रामीण कादंबरींना चालना मिळाली. परंतु व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' (१९५५) ही कादंबरी त्या अगोदर ग्रामीण वास्तवाचे चित्रण करण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची ठरते. त्यानंतर उद्धव शेळके यांच्या 'धग', 'डाळिंबाचे दाणे', 'बाईविना बुवा' या तीन कादंबऱ्यांपैकी 'धग' ही महत्त्वाची कादंबरी आहे. शंकर पाटील यांच्या 'टारफुला' या कादंबरीने ग्रामीण कादंबरीकार म्हणून मान्यता मिळवून दिली. हमीद दलवाई यांनी १९६५ साली 'इंधन' ही कादंबरी लिहिली. बोराडे यांना १९७१ साली प्रसिद्ध झालेल्या 'पाचोळा' या कादंबरीने लौकिक प्राप्त करून दिला. आनंद यादव म्हणजे ग्रामीण साहित्यातील एक महत्त्वाचे नाव आहे. 'गोतावळा' ही त्यांची महत्त्वाची अशी कादंबरी असून त्या कादंबरीने मराठी ग्रामीण

कादंबरीत महत्त्वाचे स्थान प्राप्त केले. ‘झोंबी’, ‘घरभिंती’, ‘नांगरणी’ या तीन आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचा प्रत्यय येतो. मराठवाड्यातील निजामी राजवटीतील एका खेड्याचा जीवनपट ना. धों. महानोरांच्या १९७३ साली प्रकाशित झालेल्या ‘गांधारी’ ने मांडला. ‘जरंग’ ही बाबा भांड यांची कादंबरी आहे. तसेच दि. बा. मोकाशी (‘देव चालले’ १९६१), रंगनाथ देशपांडे (‘वेडी बाभळ’ १९६६), लक्ष्मीकांत तांबोळी (‘दूर गेलेले घर’ १९७०), जयवंत दळवी (‘धर्मानंद’ १९८०) यांच्या कादंबऱ्याही लक्षणीय आहे. ग्रामीण कादंबरी १९८० ते १९९० या कालखंडातील एका वेगळ्या वळणावर पोहोचलेली दिसते. १९८२ साली व्यंकटेश माडगूळकर यांनी ‘करुणाष्टक’ ही कादंबरी लिहिली. त्याचप्रमाणे गो. नि. दांडेकर, श्री. ना. पेंडसे, आनंद यादव, रा. रं. बोराडे, महादेव मोरे, व. बा. बोधे, नागनाथ कोत्तापल्ले, रंगनाथ पठारे, राजन गवस, आनंद पाटील, रवींद्र शोभणे, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे, गणेश आवडे, कृष्णात खोत, स. द. यादव, बा. ग. केंदरकर, सदानंद देशमुख, दिनकर चौधरी, चि. त्र्यं. खानोलकर इत्यादी अशा अनेक लेखकांनी या काळात लेखन केले आहे. सदानंद देशमुख हे या काळातील एक महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार आहेत. त्यांच्या ‘तहान’ (१९९८) आणि ‘बारोमास’ (२००२) या महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. त्यांनी जागतिकीकरणामुळे उध्वस्त झालेल्या खेड्यांचे चित्रण यात केले आहे. या कालखंडातील ‘राघववेळ’ ही कादंबरी दलित जीवनाचे चित्रण करणारी आहे. स्त्री लेखिकांनी १९९० नंतरच्या काळात मराठी कादंबरी लेखनाचा प्रवाह अधिक समृद्ध केलेला दिसतो. सानिया यांची ‘स्थलांतर’, शांता गोखले यांची ‘रिटा वेलिणकर’, मेघना पेठे यांची ‘नातिचरामी’, आशा बगे यांची ‘भूमी’, आणि कविता महाजन यांची ‘ब्र’ या कादंबऱ्याचा उल्लेख करावा लागतो. तसेच संजय जोशी हे महानगरीय संवेदना मांडणारे कादंबरीकार आहेत. अधिक गंभीरपणे या काळातील लेखक कादंबरी लेखनाकडे वळल्याचे दिसून येते.

## १.५ समारोप

प्रस्तुत प्रकरणात अनेक कादंबऱ्यांचा आढावा घेऊन कादंबरीचे स्वरूप मांडलेले आहे. कादंबरी हा आधुनिक ललित गद्यात्मक साहित्यप्रकार असल्याचे जाणवते. मराठीत अगदी बाराव्या, तेराव्या शतकापासून लीळाचरित्रासारखे  दर्जाचे गद्य मराठी भाषेतच लिहिले होते. त्याचबरोबर कादंबरीचे स्वरूप जाणून घेण्यासाठी अनेक अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचा विचार, कादंबरीचे घटक, कादंबरीचे प्रकार यांचा समावेश यात केला आहे. अनेक प्रसंग, पात्रे, उपकथानके यावर कादंबरी आधारित असते.

'यमुनापर्यटन' या सामाजिक कादंबरीनेच मराठी कादंबरी वाङ्मयप्रकाराला सुरूवात केली आहे. मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी रा. भि. गुंजीकर यांची 'मोचनगड' १८६७ साली लिहिली गेली. इतिहासाला कल्पकतेची जोड देऊन ऐतिहासिक कादंबरी लेखन केले जाते. ग्रामीण कादंबरीत ग्राम जीवनातील अनेक समस्या, रूढी-परंपरा, राहणीमान अशा विविध मुद्यांचा विचार केला जातो. ग्रामीणालाच नव्हे तर एकूणच मराठी कादंबरी वाङ्मयप्रकाराला समृद्ध करणारे कादंबरीकार म्हणून रंगनाथ पठारे यांचा उल्लेख करावा लागतो. व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' (१९५५) ही कादंबरी ग्रामीण वास्तवाचे चित्रण करण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची ठरते. चरित्रात्मक कादंबरीचा पाया म्हणत असताना लक्षात येते ते म्हणजे विशिष्ट समाजात जगणारी व्यक्ती आणि तिचे चरित्र.  जीवनस्वप्न', 'आनंदी गोपाळ', 'यज्ञ', 'साहेब', 'दोन खंडांतली दुर्दम्य', 'उत्तर योगी', 'पुत्र मानवाचा', 'युगप्रवर्तक', ह्या काही चरित्रात्मक कादंबरीची उदाहरणे आहेत. आत्मचरित्रात्मक कादंबरीत लेखक स्वतःच स्वतःच्या जीवनाविषयी लिहित असतो. त्याचबरोबर मराठी कादंबरीचा विकास आणि वाटचाल म्हणत असताना कादंबरी या साहित्यप्रकारामध्ये कालपरत्वे झालेल्या विकासाचा आढावा थोडक्यात साहित्यप्रवाहाच्या वाटचालीच्या आधारे ह्या प्रकरणात घेतला आहे. इ. स. १८८५ ते १९२० हा हरिभाऊ आपटे यांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. आपट्यांनी सामाजिक तसेच ऐतिहासिक कादंबऱ्यांचे लेखन करून मराठी कादंबरी वाङ्मयप्रकार समृद्ध केला आहे. प्रारंभ ते स्वातंत्र्योत्तर काळ यादरम्यान सामाजिक, ऐतिहासिक, ग्रामीण, दलित, महानगरीय इत्यादी अशा अनेक प्रवाहाच्या कादंबऱ्यांचे लेखन झालेले आहेत.

## १.६ निष्कर्ष

१. कादंबरी, व्यक्तिरेखा, भाषाशैली, वातावरण अशा घटकातून कादंबरीचे स्वरूप ठरलेले असतात.

२. केशवजींची 'यात्रिक क्रमण' (१८४१) ही मराठीतील पाहिली कादंबरी असून, ती भाषांतरित कादंबरी आहे. पण मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान बाबा पद्मनजींच्या 'यमुनापर्यटन' या कादंबरीस जातो.

३. कादंबरीच्या आरंभापासून ते आतापर्यंत मराठी साहित्यात ऐतिहासिक, सामाजिक, दलित, ग्रामीण, स्त्रीवादी इत्यादी असे अनेक साहित्य प्रवाह निर्माण झालेले आहेत.

४. 'यमुनापर्यटन'सारख्या सामाजिक कादंबरीपासून सुरू झालेला कादंबरी वाङ्मयाचा प्रवास पुढे अद्भुतरम्य कादंबऱ्यांना मिळाला. अद्भुतरम्य कादंबरीने १८८५च्या सुमारास सामाजिक-ऐतिहासिक असे वेगळे वळण घेतले आहे.

५. स्वातंत्र्योत्तर काळातील कादंबरीकार मर्ढेकर व बेडेकर यांच्या लेखनातून कादंबरी वाङ्मयाला एक नवीन रुप मिळाले. 'रात्रीचा दिवस' व 'रणांगण' या कादंबऱ्यांच्या रूपाने कादंबरी लेखनात नाविन्यता आली.

## संदर्भ

१. बापट, प्र. वा., गोडबोले, ना. वा. "मराठी कादंबरी-तंत्र आणि विकास." व्हीनस प्रकाशन पुणे, १९५७, पृ. २००.

२. हस्तक, उषा. "साहित्य: अध्यापन आणि प्रकार." मौज प्रकाशन मुंबई, १९८७, पृ. २५२.

३. कुलकर्णी, मदन. "मराठी प्रादेशिक कादंबरी: तंत्र आणि स्वरूप." श्री मंगेश प्रकाशन नागपूर, १९९४, पृ. ५.

४. बापट, प्र. वा., गोडबोले, ना. वा. "मराठी कादंबरी-तंत्र आणि विकास." व्हीनस प्रकाशन पुणे, १९५७, पृ. ३३.

५. देशपांडे, कुसुमावती. "मराठी कादंबरी." पहिले शतक मुंबई मराठी साहित्य संघ, १९७५, पृ. १६.

६. नेमाडे, भालचंद्र. "टीकास्वयंवर." साकेत प्रकाशन औरंगाबाद, १९९०, पृ. १९८.

७. संत, जान्हवी. "कादंबरी एक वाङ्मय-प्रकार." मोघे प्रकाशन कोल्हापूर, १९७१, पृ. ९०.

८. शहा, विभा. "मराठी ऐतिहासिक कादंबरी: एक अभ्यास." मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९८, पृ.

९. कुलकर्णी, भिमराव. "मराठी कादंबरीची वाटचाल." ग्रंथागार प्रकाशन पुणे, १९७२, पृ. १४६.

१०. हस्तक, उषा. "कादंबरी आणि मराठी कादंबरी." साहित्य सेवा प्रकाशन औरंगाबाद, १९९३, पृ. १३५.

# प्रकरण २

# व्यंकटेश माडगूळकर व्यक्ती आणि कर्तुत्व

## प्रास्ताविक

सदर प्रबंधिकेत व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास करायचे ठरविले आहे. त्याअगोदर व्यंकटेश माडगूळकर यांचा जीवन परिचय, साहित्यिक जडण-घडण, व वाङ्मयीन कर्तुत्व समजून घेणे आवश्यक आहे. व्यंकटेश दिगंबर माडगूळकर हे मराठीतील एक श्रेष्ठ साहित्यिक आहेत. मराठी साहित्यात त्यांनी स्वतः चा एक वेगळा ठसा उमटवलेला पाहावयास मिळतो. व्यंकटेश माडगूळकर हे अनेक कलांमध्ये गती असणारे होते. त्यांचा परिचय शेतकरी माडगूळकर, चित्रकार माडगूळकर, शिकारी माडगूळकर, निसर्गप्रेमी माडगूळकर म्हणून केला जातो.

गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व व्यंकटेश माडगूळकर हे १९४५ नंतर मराठी लघुकथेला नवे वळण लावणारे महत्त्वाचे कथाकार आहेत. व्यंकटेश माडगूळकर हे कथाकार म्हणून परिचयाचे असले तरी त्यांनी मराठी कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन इत्यादी साहित्य लेखन केले आहे. कोणत्याही लेखकाच्या साहित्यकृतीवर लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवलेला दिसतो. रामोशी, धनगर, कुणबी, मुलाणी, महार, सुतार इत्यादी सर्व जमातीच्या लोकांचा सहवास लहानपणी व्यंकटेश माडगूळकर यांना लाभला होता. त्यामुळे त्यांच्या साहित्यात धनगर, दलित, लोककला, बोलीभाषा यांचा समावेश झालेला दिसून येतो. व्यंकटेश माडगूळकर यांनी चित्रपट कथा लिहिल्या, रेखाचित्रे काढली, निसर्गात राहून मिळालेले अनुभव साहित्यकृतीच्या माध्यमातून त्यांनी मांडलेले आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या ‘बनगरवाडी’, ‘सत्तांतर’, ‘करुणाष्टक’ इत्यादी साहित्यकृतीत त्यांनी स्वतः रेखाटलेली चित्रे पाहायला मिळतात. १९४६ साली व्यंकटेश माडगूळकर यांनी साहित्य लेखनास सुरूवात केली. त्यांची ‘काळ्या तोंडाची’ ही पहिली कथा १९४६ मध्ये प्रसिद्ध झाली आहे. ‘माणदेशी माणसं’ हा त्यांचा कथासंग्रह १९४९ मध्ये प्रसिद्ध झाला व मराठीतील एक श्रेष्ठ ग्रामीण कथाकार म्हणून त्यांना मान्यता प्राप्त झाली. कादंबरी क्षेत्रातही त्यांनी कथेप्रमाणे महत्त्वाची कामगिरी

बजावली आहे. त्यांनी लेखनासाठी एकच एक असा विषय न ठेवता विविधांगी विषय त्यांच्या साहित्यातून प्रकट होतात.

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर यांचा जीवन परिचय, व्यंकटेश माडगूळकर यांची साहित्यिक जडण-घडण, व व्यंकटेश माडगूळकर यांचे वाङ्मयीन कर्तुत्व इत्यादी गोष्टींचा आढावा घेण्याचे योजले आहे.

## २.१ व्यंकटेश माडगूळकर यांचा जीवन परिचय

श्रेष्ठ मराठी कथाकार व कादंबरीकार या नावाने ओळखले जाणारे व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म ५ एप्रिल १९२७ रोजी सांगली जिल्ह्यातील 'माडगूळ' येथे झाला. व्यंकटेश माडगूळकरांच्या आईचे नाव बनुताई. माडगूळकरांना इतर चार भाऊ आणि दोन बहिणी होत्या. 'माडगूळ' या गावातच व्यंकटेश माडगूळकर लहानाचे मोठे झाले. माडगूळमधील त्यांचे घर १९४८ साली महात्मा गांधींच्या खुनानंतर झालेल्या दंगलीत जाळले गेले. लहानपणी कुणबी, मुलाणी, महार, रामोशी, सुतार इत्यादी अशा विविध जातीच्या मुलांचा समावेश त्यांच्या सवंगड्यात असायचा. माडगूळकर हाताचे पंजे टाकून मासे कसे पकडायचे हे त्यांच्याबरोबर राहून शिकले. त्यांचे शिक्षण मॅट्रिक पर्यंतही झालेले नाही. माडगूळ, आटपाडी, किन्हई, विभूतवाडी अशा गावात माडगूळकर यांनी ७वी पर्यंत आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांना चित्रकलेची आवड होती. चित्रकलेचे शिक्षण त्यांनी 'कुंडल' येथे घेतले. कोल्हापुर येथील 'दळवी आर्ट इन्स्टिट्यूट' मध्ये त्यांनी एक वर्ष काढले. विविध प्रकारची पुस्तके वाचून त्यांनी स्वतः साहित्याचा व्यासंग केला. व्यंकटेश माडगूळकर हे ग. दि. माडगूळकर यांचे धाकटे बंधू. सुरुवातीचा काही काळ त्यांनी पत्रकारी केल्यानंतर १९५० च्या सुमारास ते मुंबईत आले आणि मराठी सिनेमा सृष्टीसाठी त्यांनी पटकथा लेखन करण्यास सुरुवात केली. त्याअगोदर त्यांचा 'माणदेशी माणसं' (१९४९) हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता.

शिकारी माडगूळकर, निसर्गप्रेमी माडगूळकर, शेतकरी माडगूळकर व चित्रकार माडगूळकर म्हणून त्यांची कीर्ती आहे. ज्यावेळी चौथीची परिक्षा उत्तीर्ण होऊन माडगूळकर तालुक्यातील हायस्कूलमध्ये गेले तेव्हा त्यांना त्या शाळेत चांगले चित्रकलेचे शिक्षक भेटले. त्यांना चित्रकलेची आवड होती पण त्यांची आवड त्यांना आजुबाजूचे वातावरण पोषक नसल्याने पूर्ण करता आली नाही.

माडगूळकर यांनी एक एकर शेती विकत घेतली होती. त्याचे वर्णन त्यांनी ‘श्रमाचं फळं’ या लेखात केले आहे. त्यांनी त्या शेतात खूप कष्ट केले. पुढे शेतातच एक छोटेसे घर बांधले. आजुबाजूला फुले-झाडे लावले. शेती करुन शेतात पिकलेला माल बाजारात विकायचे.

आकाशवाणीवर दीर्घ काळ (१९५५-८५) त्यांनी नोकरी केली. महाराष्ट्र राज्य पुरस्कार त्यांच्या अनेक पुस्तकांना मिळाले. ‘गावाकडच्या गोष्टी’, ‘बनगरवाडी’, ‘उंबरठा’, ‘जांभळाचे दिवस’, ‘घरदार’ यांचा समावेश त्यात होतो. ‘सत्तांतर’ या कादंबरीला साहित्य अकादमीचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. तसेच ‘देवा सटवा महार’ या कथेला पारितोषिक मिळाले. त्याचप्रमाणे आंबेजोगाई येथे १९८३ साली भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले. तेथे त्यांचा गौरव करण्यात आला. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने डि.लीट ही पदवी त्यांना प्रधान केली. त्यांच्या ‘करुणाष्टक’ या कादंबरीस कै. न. चिं. केळकर पुरस्काराने सन्मानित केले आहे. १८ मे २०१२ रोजी पुण्यातील मेहता प्रकाशनकडून व्यंकटेश माडगूळकर यांच्या ४१ पुस्तकांचे नव्याने प्रकाशन झाले आहे. व्यंकटेश माडगूळकर हे एक उत्तम चित्रकार होते. त्यांची स्वतःचीच रेखाचित्रे त्यांच्या स्वतःच्या काही पुस्तकांना आहेत. १९४६ पासून व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या लेखनाला सुरूवात केली. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, चित्रपट कथा इत्यादी असे अनेक साहित्यप्रकार त्यांनी हाताळले. ‘माणदेशी माणसं’, ‘वावटळ’, ‘बनगरवाडी’, ‘करुणाष्टक’, ‘कोवळे दिवस’, ‘काळी आई’, ‘रानमेवा’, ‘गावाकडच्या गोष्टी’, ‘पांढऱ्यावर काळे’, व ‘चित्रे आणि चरित्रे’ इत्यादी साहित्यकृतीतून प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे व्यंकटेश माडगूळकर यांच्या जीवनचरित्रातील काही दुवे चित्रित झाले आहेत. ‘माझा शिकारीचा छंद’ याबद्दल व्यंकटेश माडगूळकर यांनी ‘चित्रे आणि चरित्रे’ या पुस्तकात लिहिले आहे. अनेक जमातीच्या लोकांची त्यांना संगत मिळाली. व्यंकटेश माडगूळकर यांनी शिक्षणाबरोबर विविध पक्षी-प्राण्यांची शिकार केली. रानडुक्कर, चितळ, ससे, पारवे, लांडोर, हरण, इत्यादी तसेच खेकडे, मासे पकडायला त्यांनी सवंगड्यांकडून शिकले. ते स्वतः मासे, खेकडे पकडू लागले. कुणबी, मुलाणी, महार, मांग, रामोशी, सुतार इत्यादी लोकांची भाषा, त्यांची जगण्याची पद्धती, त्यांनी जवळून न्याहाळल्याकारणाने त्यांच्या साहित्यातून तेच जीवन त्यांनी प्रकट केले आहे.

महाराष्ट्र राज्याचे अनेक पुरस्कार त्यांना लाभले. ‘देवा सटवा महार’ या व्यंकटेश माडगूळकर यांच्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षी लिहिलेल्या कथेला व गंगाधर गाडगीळ यांच्या एका कथेला विभागून पहिले पारितोषिक मिळाले होते. त्यांचे ‘सती’ हे नाटक कोरियातील नव्या महोत्सवात निवडले गेले होते.

## २.२ व्यंकटेश माडगूळकर यांची साहित्यिक जडण-घडण

व्यंकटेश माडगूळकर यांनी १९४६ साली लेखनास सुरुवात केली. ग. मा. कामत या नावाचे व्यक्ती मुंबईत ‘सत्यकथा’ या मासिकाचे सहायक संपादक म्हणून काम करत होते. ज्यावेळी व्यंकटेश माडगूळकर १९४८ साली मुंबईत राहायला गेले त्यावेळी त्यांच्याबरोबर त्यांच्या खोलीत राहू लागले. ‘माणदेशी माणसं’ हे शब्दचित्रे त्यांनी तेथेच त्या खोलीत लिहिले. ‘सत्यकथा’ या साप्ताहिकाच्या माध्यमातून एक एक अशा प्रकारे ते प्रसिद्ध झाले. ज्यावेळी त्यांच्या वडिलांची बदली ‘किन्हई’ या गावात झाली तेव्हा तेथे ते भाड्याने राहत होते. त्या खोलीच्या माळ्यावर पेटीत त्यांना खूप पुस्तके मिळाली. त्यात हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या, चमत्कारिक गोष्ट, पंचतंत्र अशा विविध प्रकारची पुस्तके होती. अशा वेगवेगळ्या पुस्तकांचे वाचन करून त्यांना आनंद मिळाला आणि त्यांनी साहित्य लेखनाला सुरूवात केली.

‘प्रवास एका लेखकाचा’ या पुस्तकातून स्वतः माडगूळकरांनी लेखक म्हणून स्वतःची जडण-घडण कशी झाली यासंदर्भात मांडणी केलेली आहे. त्यांची अशी इच्छा होती की जीवनाशी संबंधित असलेल्या गोष्टी आपल्या लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करणे. त्यांनी आपल्या ‘माणदेशी माणसं’ या साहित्यकृतीद्वारे माणदेश या परिसरातील लोकांचे जीवन, आचार-विचार, त्यांचा संघर्ष, इत्यादी गोष्टी आणि त्यासंदर्भात आलेले भान त्या शब्दचित्राच्यामाध्यमातून व्यक्त केले आहे. ज्यावेळी ‘निंबवडे’ या गावात त्यांची प्रार्थमिक शिक्षक म्हणून नेमणूक झाली तेव्हा त्यांच्या घरच्यांना शिक्षक झाले म्हणून आशा वाटली. पण त्यांचे मन त्यात रमत नसल्याने त्यांना त्यावेळी दुसरे काहीतरी करावयाची इच्छा होती. ज्यावेळी हे आजूबाजूच्या लोकांच्या कानी पडले तेव्हा लोक त्यांना “वाया गेलेले पोर” असे म्हणत. त्यांनी गडकरी आणि केशवसुत यांचे काव्य वाचून काढली पण ते काव्य त्यांना कितपत समजले हा भाग वेगळाच. माडगूळकरांच्या आवडीने ते त्यांना बंद पाडता दिले नाही. त्यातूनच त्यांनी कविता

लिहावयास सुरुवात केली आणि त्यांच्या कविता मासिकातून प्रसिद्ध देखील झाल्या होत्या. ज्यावेळी त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला त्या काळात मात्र ते वाचनापासून दूर झाले कारण तेथे त्यांना काहीच वाचावयास मिळत नसे.

कविता लिहिण्यापूर्वी त्यांचा 'माणदेशी माणसं' (१९४९) हा कथासंग्रहाला प्रसिद्धी मिळाली होती. मराठी साहित्याला अनोखे वाटावे यापद्धतीने माडगूळकरांनी त्याची मांडणी केली होती. व्यक्तिरेखांच्या माध्यमातून अस्सल आणि जिवंत असे ग्रामीण माणसांचे दर्शन त्यांच्या त्या कथासंग्रहाने घडविले आहे. कल्पनारम्य, अद्भुतरम्य, स्वप्नरंजन अशा साहित्यप्रकारापासून त्यांच्या ह्या कथासंग्रहाने वास्तववादी ग्रामीण साहित्यकृतीचा आरंभ केला. पुढे त्यांनी अनेक कथासंग्रह लिहिले. त्यापैकी गावाकडच्या गोष्टी (१९५१), हस्ताचा पाऊस (१९५३), सीताराम एकनाथ (१९५१), काळी आई (१९५४), जांभळाचे दिवस (१९५७) इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. विविध भाषेत उदाहरणार्थ: जर्मन, रशियन, डॅनिश, जपानी इत्यादी भाषेत त्यांच्या कथांचे अनुवाद झाले आहे.

ग्रामीण कथेप्रमाणेच त्यांनी ग्रामीण कादंबऱ्या लिहून मराठी वाङ्मयात स्वतःचा वेगळा असा ठसा उमटवला. त्यांच्या पुढचं पाऊल (१९५०), बनगरवाडी (१९५५), वावटळ (१९८५), कोवळे दिवस (१९७९), करूणाष्टक (१९८२), आणि सत्तांतर (१९८२) ह्या कादंबऱ्या विशेष लक्षात घेणेजोगे आहेत. बनगरवाडी ह्या कादंबरीचे अनुवाद डॅनिश आणि इंग्रजी या भाषेत झाले आहेत. त्यांच्या करूणाष्टक, वावटळ आणि कोवळे दिवस ह्या कादंबऱ्यांना आत्मचरित्रपर कादंबऱ्या म्हणून ओळखले जाते. वावटळ या कादंबरीचे इंग्रजीत 'विंड्स ऑफ फायर' या नावाने भाषांतर झाले आहे. १९४२च्या स्वातंत्र्यलढ्यात व्यंकटेश माडगूळकरांनी सहभाग घेतला होता. त्याचा परिणाम 'कोवळे दिवस' या कादंबरीत पाहावयास मिळतो कारण त्या कादंबरीत त्यांनी एका कोवळया स्वातंत्र्यसैनिकाचे अनुभव चित्रित केले आहे. तसेच वावटळ आणि करूणाष्टक या कादंबरीत त्यांनी स्वतः घेतलेले अनुभव चित्रित केलेले असून या कादंबऱ्यांना आत्मचरित्रपर कादंबऱ्या म्हणून संबोधले जाते. त्यांच्याच एका कथेवरून त्यांनी 'पुढचं पाऊल' ही कादंबरी लिहिली. यात एका दलित मुलाचे चित्रण केले आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांनी नाटकेही लिहिली आहेत पण त्यापैकी उल्लेखनीय अशी नाटके पति गेले गं काठेवाडी, सती, तू वेडा कुंभार आहेत. त्यांची बिनबियांचे झाड आणि कुनाचा कुनाला मेळ न्हाई

ही गाजलेली लोकनाट्य आहे. ललित गद्य स्वरुपाची पुस्तके त्यांनी लिहिली. त्यात पांढऱ्यावर काळे (१९७१), रानमेवा (१९७८), नागझिरा (१९७९), पांढरी मेंढरे हिरवी कुरणे (१९७९), चित्रे आणि चरित्रे (१९८३) इत्यादींचा समावेश होतो.

व्यंकटेश माडगूळकर हे प्रतिभावंत असे एक लेखक आहेत. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, स्फुट, ललित, प्रवासवर्णन, चित्रपट कथा इत्यादी असे अनेक साहित्यप्रकार हाताळले आहेत. तसेच आकाशवाणीवर ते नोकरीला होते, चित्रपटातील लहान भूमिका, रेखाटने असे विविध पैलू त्यांच्या कलात्मक आणि साहित्यिक अभिव्यक्तीत आहेत. व्यंकटेश माडगूळकर यांनी इंग्रजीतील वेगवेगळ्या विषयांवर ग्रंथाचे वाचन केले होते. त्यात कथा, कादंबऱ्या, आधुनिक ग्रंथ तसेच विविध देशादेशातील परिकथा, इतिहास, समाज शास्त्रावरचे ग्रंथ, पत्रव्यवहार, शिकारीची पुस्तके, चित्रकार आणि चित्रांची पुस्तके अशा विविध प्रकारच्या साहित्याचे त्यांनी वाचन अभ्यासक म्हणून न करता त्याचा प्रभाव त्यांच्या साहित्य लेखनात प्रत्ययास येतो.

## २.३ व्यंकटेश माडगूळकर यांचे वाङ्मयीन कर्तुत्व

१९५० नंतरच्या काळातील ग्रामीण कथांचा शिलेदार म्हणून व्यंकटेश माडगूळकर यांचा उल्लेख केला जातो. मुख्यतः कथाकार म्हणून व्यंकटेश माडगूळकर यांना ओळखले जाते. माडगूळकरांनी त्यांच्या काळातील ग्रामजीवनाचे जिवंत व अस्सल चित्र रेखाटले आहे व याचे कारण म्हणजे त्यांची कथा ही 'माणदेश' या एका विशिष्ट प्रदेशातील कथांमधून प्रकट झाली आहे. त्यांच्या कथेतून गाव, व्यक्तिरेखा साक्षात उभे राहतात. त्यांच्या साहित्यात कृषी व्यवस्थेतील सुतार, न्हावी, पाटील, कुणबी, माळी, लोहार इत्यादी तसेच गावकुसाबाहेर राहणाऱ्या भटक्या-विमुक्त अशा माणसांचेही चित्रण त्यांच्या कथेतून प्रत्ययास येते. त्यांच्या कथा, कादंबऱ्यांतून त्यांनी ग्रामीण वास्तवाचे चित्रण केले आहे. त्यामुळे माडगूळकरांच्या कथेने ग्रामीण कथेच्या विकासात मोलाचा हातभार लावलेला दिसून येतो. व्यंकटेश माडगूळकरांनी कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्रपर लेखन, पटकथा लेखन, ललित लेखन, माध्यमांतर असे अनेक साहित्यप्रकार हाताळले आहेत. अत्यंत दर्जेदार व सकस अशा पद्धतीने त्यांनी लेखन केले आहे.

### २.३.१ कथा

व्यंकटेश माडगूळकर यांनी उत्कृष्ट शैली, साधी, सोपी वाटणाऱ्या पण वाचकांच्या मनाला भिडणाऱ्या लेखनातून वाचकांच्या मनावर एक वेगळा ठसा उमटवला आहे. 'काळया तोंडाची' ही पहिली कथा व्यंकटेश माडगूळकरांनी लिहिली. पुढे त्यांनी दोनशे पंचवीस अधिक कथा लिहिल्या आणि एकूण एकोणीस कथासंग्रहातून त्या कथा प्रसिद्ध झाल्या. नाट्य व चित्रपट कथा देखील काही त्यांच्या निवडक कथावरून तयार झाल्या आहेत. त्यांचे अनेक भाषेत अनुवाद झाले आहेत. काही त्यांचे कथासंग्रह महाविद्यालयीन अभ्यासक्रमात नेमले गेले आहे. उदाहरणार्थ: 'काळी आई', 'माणदेशी माणसं' इत्यादी. त्यांच्या काही कथासंग्रहाला राज्य सरकारची पारितोषिके प्राप्त झाली आहेत. त्यात 'गावाकडच्या गोष्टी', 'उंबरठा', 'जांभळाचे दिवस', 'घरदार' इत्यादी कथासंग्रहांचा समावेश होतो. उंबरठा, ओझं, कांगारूचे चांगभलं, काळी आई, घरदार, जांभळाचे दिवस, गावाकडच्या गोष्टी, बाजार, डोहातील सावल्या, रानमेवा, माणदेशी माणसं, वारी, वाळूचा किल्ला, वाघाच्या मागावर, हस्ताचा पाऊस, सीताराम एकनाथ, इत्यादी हे सोळा कथासंग्रह त्यांचे प्रसिद्ध आहेत. तसेच तीन निवडक कथांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. 'व्यंकटेश माडगूळकर यांची कथा' हा संग्रह अरविंद गोखले यांनी संपादित केला आहे. 'व्यंकटेश माडगूळकरांच्या दहा कथा' हा संग्रह सं. ग. मालशे यांनी संपादित केला असून गो. म. पवार यांनी 'ओझं' या कथासंग्रहाचे संपादन केले आहे. त्यांचे लेखन वाचक वर्गाच्या मनात भिडणारे असे आहे. व्यंकटेश माडगूळकरांनी मराठीला एक वेगळी दिशा दिलेली आहे हे आपण मानले पाहिजे.

### २.३.२ कादंबरी

व्यंकटेश माडगूळकरांनी अनेक कादंबऱ्या लिहून मराठी वाङ्मयात महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांनी अनेक कादंबऱ्या लिहिल्या परंतु त्यांनी लिहिलेल्या पैकी पुढचं पाऊल, बनगरवाडी, वावटळ, कोवळे दिवस, करूणाष्टक, सत्तांतर इत्यादी कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत.

#### २.३.२.१ पुढचं पाऊल

'पुढचं पाऊल' ही त्यांची कादंबरी १९५० मध्ये प्रकाशित झाली आहे. यात 'मोगरीबाई' नावाच्या स्त्रीच्या नादी दलित कलावंत किसन या नावाचा व्यक्ती लागल्यामुळे दलित तमाशा कलावंतांची आणि त्याच्या कुटुंबीयांची झालेली दुर्दशा व त्या परिस्थितीला कशाप्रकारे मात करून

किसन जीवनाची नवीन सुरुवात करतो याचे चित्रण यात आले आहे. माडगूळकरांनी ग्रामीण लोकजीवनात निर्माण होणाऱ्या समस्या त्याचबरोबर तमाशा कलावंतांच्या जीवनाचे सुंदर चित्र या कादंबरीत उभे केले आहे.

### २.३.२.२ बनगरवाडी

१९५५ साली व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' ही कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. या कादंबरीचा ग्रामीण कादंबरी म्हणून उल्लेख केला जातो. यात 'बनगरवाडी' नावाच्या एका लहान अशा गावातील लोकांचे चित्रण आले आहे. धनगरांची वस्ती केंद्रस्थानी ठेवून लेखन झाले आहे. अशा वस्तीत राजाराम विठ्ठल सौंदणीकर या नावाच्या एका शिक्षकाची नेमणूक होते. तेथे कामावर रुजू झाल्यानंतर तो कशाप्रकारे त्या लोकांमध्ये समरस होऊन, तेथील लोकांना कसा उपयोगी पडतो, त्या लोकांची भाषा, सण- उत्सव, राहणीमान, संस्कृती, याचे अत्यंत सकस असे चित्रण यात आले आहे. या कादंबरीचे इंग्रजी, हिंदी, डॅनिश, जर्मन अशा अनेक भाषांमध्ये अनुवाद झाला आहेत. तसेच या कादंबरीवर अमोल पालेकर यांनी चित्रपट निर्माण केला आहे.

### २.३.२.३ वावटळ

या कादंबरीचा विषय म्हणजे गांधी वधानंतर महाराष्ट्रातील ग्रामीण भागात झालेल्या जाळपोळ, दंगली, मारामारी इत्यादीमुळे ब्राह्मण समाजाला सामोरे जावे लागलेल्या परिस्थितीची कहाणी. एका विशिष्ट सामाजिक घटनेची नोंद म्हणून 'वावटळ' या कादंबरीकडे पाहिले पाहिजे. ही कथा शंकर नावाच्या ब्राह्मण पात्राच्या तोंडून वाचकांपर्यंत पोहोचते. शंकरच्या आयुष्यात आलेल्या एका प्रकारच्या वादळाचे चित्रण यात आले आहे. इंग्रजी व रशियन या भाषेत या कादंबरीचे भाषांतर झाले आहे.

### २.३.२.४ करूणाष्टक

या कादंबरीत व्यंकटेश माडगूळकरांनी आई-वडिल व भावंडांचे चित्रण केले आहे. या कादंबरीत एका कुटुंबाची कहाणी चित्रित केली आहे. या कादंबरीत माडगूळकरांनी आठ मुले असलेल्या आईचे चित्रण चित्रित केलेले पाहावयास मिळते.

### २.३.२.५ सत्तांतर

या कादंबरीत वानरांमध्ये होणाऱ्या संघर्षाचे चित्रण आहे. यात मुडा नावाच्या वानराची टोळी असते. मुड्याला मारून मोगा कशाप्रकारे त्याची टोळी आपल्या ताब्यात घेतो याचे चित्रण ‘सत्तांतर’ या कादंबरीत लेखकांनी केले आहे. ही कादंबरी प्रतिकात्मक आहे. कादंबरीच्या आरंभापासून ते शेवटपर्यंत वानरांच्या टोळयामधील संघर्ष पाहायला मिळतो. ‘साहित्य अकादमीचा’ पुरस्कार या कादंबरीला प्राप्त झाला आहे.

### २.३.३ नाटक

व्यंकटेश माडगूळकरांनी अनेक नाटकेही लिहिली आहेत. त्यांनी आपल्या नाटकातून ग्रामीण जीवनातील स्वरूप बदलल्याने त्याचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम, ग्रामीण समूह आणि व्यक्ती यांचे असलेले परस्पर संबंध, ग्रामीण वास्तवाचे चित्रणाबरोबरच त्यांनी लोककथांची मदत घेऊन मोजकेच नाट्यलेखन केले. माडगूळकरांनी नाटक व लोकनाट्य हे दोन प्रकार हाताळले आहे. ‘कुणाचा कुणाला मेळ नाही’, व ‘बिनबियांचे झाड’ ही दोन लोकनाट्य त्यांनी १९५५ ते १९६० या कालखंडात लिहिली. त्यानंतर त्यांनी ‘जाणार कुठे?’ हे नाटक १९६० साली लिहिले. तसेच ‘सती’ या नावाचे नाटक लिहिले आणि या नाटकाचा १९६७ साली दिल्ली या ठिकाणी पहिला प्रयोग झाला. अमेरिकन नाटककार टेनिस विल्यम यांच्या ‘रोझटॅटू’ या नाटकाचे रुपांतर व्यंकटेश माडगूळकरांनी ‘गौराई’ या नावाने केले. ‘पती गेले ग काठेवाडी’ नावाच्या नाटकाचे लेखन त्यांनी केले. अनेक इंग्रजी नाटकांचे रूपांतर त्यांनी मराठीत केलेले आहेत. नाटक या क्षेत्रात व्यंकटेश माडगूळकर जास्त रमले नाहीत.

### २.३.४ आत्मचरित्रपर लेखन

१९९४ साली ‘प्रवास एका लेखकाचा’ हे व्यंकटेश माडगूळकरांचे आत्मचरित्रात्मक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. या पुस्तकात त्यांनी आपले सुख-दु:ख संदर्भात व्यक्त केले आहे. यात एकूण १२ लेखांचा समावेश आहे. लेखक घर बांधतो, खोली: लिहिण्या-वाचण्याची, माणदेशी माणसं, चरित्र: एका कादंबरीचं, वावटळ, एक कथासंग्रह: बाजार, दफ्तर: एका लेखकाचे, श्रमाचं फळ, धायरीच्या खारी, भृगु सांगतात, की-, ५७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन: अध्यक्षीय भाषण, संकल्प: एक एकर पिकाचा अशा लेखांचा समावेश झाला आहे.

## २.३.५ पटकथा लेखन

माडगूळकरांनी चित्रपट क्षेत्रात देखील काम केले आहे. त्यांनी अनेक चित्रपटांच्या कथा लिहिल्या. ‘जोहार मायबाप’, ‘जशाच तसं’, ‘वंशाचा दिवा’, ‘पुढचं पाऊल’ इत्यादी चित्रपटांसाठी त्यांनी कथा लिहिल्या. ‘आई उदे ग अंबाबाई’ या चित्रपटाची कथा व पटकथा माडगूळकरांनी लिहिली आहे. अनेक चित्रपटांच्या कथा, पटकथा व संवाद त्यांनी लिहिले. उदाहरणार्थ: ‘धाकटी जाऊ’, ‘मानिनी’, ‘सांगते ऐका’, ‘संत नामदेव’, ‘वैजयंता’ इत्यादींना त्यांनी कथा, पटकथा व संवाद लिहिले.

## २.३.६ ललित लेखन

व्यंकटेश माडगूळकरांचे ललित लेखन ‘पांढऱ्यावर काळे’, ‘नागझिरा’, ‘चित्रे आणि चरित्रे’, ‘रानमेवा’, ‘वाटा’, ‘जंगलातील दिवस’ इत्यादी पुस्तकातून संग्रहित झालेले आहेत. या ललित गद्यात एकच एक असा विषय नाही. अनेक विषय माडगूळकरांनी मांडलेले आहेत. आदिम जगण्याचा वेध निसर्गाच्या सानिध्यात राहून त्यांनी घेतला आहे. मानववंश, निसर्ग, प्राणिजीवन आणि समाजजीवन इत्यादी महत्त्वाचे मुद्दे समजून देणारे त्यांनी लेखन केले आहे.

## २.४ समारोप

प्रस्तुत प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर यांचा जीवन परिचय, व्यंकटेश माडगूळकर यांची साहित्यिक जडण-घडण, व्यंकटेश माडगूळकर यांचे वाङ्मयीन कर्तुत्व या संदर्भात मांडणी केलेली आहे. ५ एप्रिल १९२७ रोजी जन्माला आलेले श्रेष्ठ मराठी कथाकार व कादंबरीकार यांचा जन्म ‘माडगूळ’ येथे झाला आहे. शिकारी, निसर्गप्रेमी, शेतकरी, चित्रकार माडगूळकर म्हणून व्यंकटेश माडगूळकर यांचा उल्लेख केला जातो. ‘श्रमाचं फळं’ या लेखात व्यंकटेश माडगूळकर यांनी आपण स्वतः विकत घेतलेल्या शेतीचे वर्णन केले आहे. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, चित्रपट कथा इत्यादी असे अनेक प्रकारचे लेखन व्यंकटेश माडगूळकर यांनी केले आहे. व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या अनेक साहित्यकृतीच्या माध्यमातून जीवनचरित्रातील काही दुवे चित्रित केले आहेत. व्यंकटेश माडगूळकर यांची लेखक म्हणून जडण-घडण कशी झाली हे त्यांच्या ‘प्रवास एका लेखकाचा’ या पुस्तकात पाहावयास मिळते. ‘माणदेश’ या परिसरातील लोकांबद्दल ‘माणदेशी माणसं’ या साहित्यकृतीतून व्यक्त केलेले दिसून येते. व्यंकटेश माडगूळकर यांनी अत्यंत साधी, सोपी अशा प्रकारची भाषा वापरलेली

आहे. वाचकांच्या मनात रूजणाऱ्या लेखन शैलीतून त्यांनी लेखन काम केले आहे. व्यंकटेश माडगूळकर यांनी मराठी ग्रामीण कादंबऱ्या लिहून मराठी वाङ्मयात आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. व्यंकटेश माडगूळकर यांनी काही नाटके लिहिली आहेत पण त्यापैकी मोजकीच नाटके उल्लेखनीय अशी आहेत. उदाहरणार्थ: सती, पति गेले गं काठेवाडी, तू वेडा कुंभार इत्यादी. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र सरकारची पारितोषिकं लाभली आहेत.  उदाहरणार्थ: 'बनगरवाडी', 'घरदार', 'गावाकडच्या गोष्टी', 'उंबरठा', 'जांभळाचे दिवस' इत्यादी. 'सत्तांतर' या कादंबरीला 'साहित्य अकादमीचा' पुरस्कार प्राप्त झाला आहे. व्यंकटेश माडगूळकर यांची पुढचे पाऊल' कादंबरी ही एका दलित मुलाचे चित्रण करणारी कादंबरी असून ही कादंबरी त्यांच्याच एका कथेवरून लिहिलेली आहे. 'बनगरवाडी' ह्या कादंबरीचे हिंदी, जर्मन, डॅनिश व इंग्रजी या भाषेत अनुवाद झाले आहे. व्यंकटेश माडगूळकर यांनी आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. अत्यंत सकस व दर्जेदार पद्धतीचे लेखन त्यांनी केले आहे. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात व्यंकटेश माडगूळकरांनी भाग घेतला होता. त्याचा परिणाम 'कोवळे दिवस' या कादंबरीत प्रत्ययास येतो. दलित कलावंत स्त्रीच्या नादी लागल्यामुळे दलित कलावंतांची आणि त्यांच्या कुटुंबियांच्या दुर्दशाचे चित्रण पुढचं पाऊल या कादंबरीत केले आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्या ४१ पुस्तकांचे मेहता पब्लिशिंग हाऊस कडून नव्याने प्रकाशन झाले आहे. व्यंकटेश माडगूळकर यांना मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आले आहे.

## २.५ निष्कर्ष

१. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, चित्रपट कथा, आत्मचरित्रपर लेखन इत्यादी असे अनेक साहित्यप्रकाराचे लेखन व्यंकटेश माडगूळकर यांनी केले आहेत. त्यांच्या अनेक पुस्तकांना पुरस्कार देखील प्राप्त झाले आहेत.

२. करुणाष्टक, वावटळ, व कोवळे दिवस या व्यंकटेश माडगूळकरांच्या आत्मचरित्रपर कादंबऱ्या आहेत. पुढचं पाऊल व बनगरवाडी गावगाड्याशी जवळीकता साधणाऱ्या कादंबऱ्या आहेत. सत्तांतर ही प्रतिकात्मक कादंबरी आहे.

३. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात व्यंकटेश माडगूळकरांनी भाग घेतला होता. 'कोवळे दिवस' या कादंबरीत त्याचा परिणाम दिसून येतो. तसेच लेखकाचे बालपण व स्वातंत्र्य चळवळीतील लेखकाच्या भूमिगत कार्याची माहिती देणारी ही कादंबरी आहे.

४. व्यंकटेश माडगूळकर यांनी ग्रामीण लोकांचे जीवन, राहणीमान, त्यांची भाषा जवळून पाहिल्याने त्यांच्या साहित्यातून तेच चित्रित झालेले आहे. बनगरवाडी या कादंबरीत माणदेशात राहणाऱ्या धनगरांची जीवनपद्धती चित्रित केलेली आहे.

## २.६ संदर्भ

१. सं. हातकणंगलेकर, म. द. "व्यंकटेश माडगूळकर माणदेशी माणूस आणि कलावंत." शब्द प्रकाशन, २०००.

२. तारळेकर, मीरा. "भारतीय साहित्याचे निर्माते व्यंकटेश माडगूळकर." साहित्य अकादेमी नवी दिल्ली, २०१३.

३. https://www.tmv.edu.in

# प्रकरण ३

# व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा प्रत्यक्ष अभ्यास

## प्रास्ताविक

व्यंकटेश माडगूळकरांचे साहित्य क्षेत्र फार व्यापक आहे. कथालेखनाबरोबर व्यंकटेश माडगूळकर यांनी दर्जेदार स्वरूपाचे कादंबरी लेखनही केलेले आहे. मराठी वाङ्मयविश्वात त्यांच्या अनेक कादंबऱ्यांनी महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. त्यांनी 'बनगरवाडी', 'कोवळे दिवस', 'पुढचं पाऊल', 'वावटळ', 'सत्तांतर', 'करुणाष्टक', 'छोटा जवान' व 'चित्रकथी' अशा कादंबऱ्यांचे लेखन केले आहे. त्यांच्या 'बनगरवाडी' ह्या कादंबरीने मराठी साहित्यविश्वात मोलाची कामगिरी बजावली आहे. 'वावटळ', 'कोवळे दिवस', 'करुणाष्टक', 'चित्रकथी' या त्यांच्या जिवनाभोवतीच्या घटनांना स्पर्श करून जाणाऱ्या कादंबऱ्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांचे एकच एक विषय नसून विविधांगी विषय त्यांच्या कादंबऱ्यातून प्रत्ययास येतात.

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक पाच कादंबऱ्यांचा अभ्यास होणार आहे. त्यात त्यांच्या 'बनगरवाडी', 'करुणाष्टक', 'सत्तांतर', 'वावटळ' व 'पुढचं पाऊल' कादंबऱ्यांचा समावेश झालेला आहे. वरील पाच कादंबऱ्यांचा अभ्यास कादंबरीच्या घटकांवर होणार आहे. त्यात कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण व भाषा इत्यादीचा विचार करण्याचे ठरविले आहे. व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मानवी जीवन विषयक जाणिवा स्पष्ट करण्याचे ठरविले आहे.

## ३.१ 'बनगरवाडी' कादंबरी

१९५५ साली व्यंकटेश माडगूळकर यांची बनगरवाडी ही कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळातील वातावरण बनगरवाडी या कादंबरीत पाहावयास मिळते जरी ही कादंबरी स्वातंत्र्याच्या काळात प्रसिद्ध झाली आहे.

### ३.१.१ बनगरवाडी कादंबरीचे कथानक

शाळामास्तराने या कादंबरीचे निवेदन केले आहे. बनगरवाडीत राजाराम विठ्ठल सौंदणीकर नावाच्या एका शिक्षकाची नेमणूक झालेली असते. गावात असलेली शाळा बंद पडलेली असते. बनगरवाडीत पुष्कळशी वस्ती धनगरांची असते. रंगाने काळेभोर असलेले हे धनगर नेहमी उघडेच वावरत असतात. बाहेरच्या जगाबद्दल त्या लोकांना विशेष ज्ञान नव्हते व ते नव्हते याची जाणीवही त्यांना नव्हती. कारण भल्या सकाळी उठून मेंढऱ्यांना चरायला नेणे, मेंढरे चरत असताना पूर्ण दिवस त्यांच्या मागे हिंडणे, मेंढऱ्यांच्या लेंड्यांचा ढीग खतासाठी तयार करणे, संध्याकाळी मेंढरे जुळवणे हा एक अर्ध्याएक तासाचा कार्यक्रम ते करत असायचे. हा कार्यक्रम झाल्यानंतर भाकरी खायचे व झोपी जायचे असा त्या लोकांचा दिनक्रम होता. या गावात असलेली बहुतांशी धनगरांची मुले ही मेंढऱ्यांमागे जाणारी असतात. ह्याच कारणामुळे बनगरवाडीतील शाळा बंद पडलेली असते. कादंबरीच्या सुरुवातीलाच मास्तराला भेटलेला दादू बालट्या मास्तराला निराश करतो. सौंदणीकर बालट्याला आपण मास्तर असल्याचे सांगतो. तेव्हा बालट्याला मास्तरांनी सांगितलेल्या गोष्टीवर विश्वास बसत नाही व उलट तो मास्तराला विचारतो "इथे काय करायचा मास्तर? शाळा चालते कुठे इथे? वाडीत पोरे नाही असे बोलून निघून जातो. बालट्याने असे बोलण्याचे कारण म्हणजे त्या लोकांना शाळेचे व शिक्षणाचे महत्त्व नव्हते. लहान तशीच वृद्ध माणसे शेरडांमागे, मेंढरांमागे जायची. त्यांचा असा समज होता की जर मुले मेंढ्यांमागे गेली नाही तर पोटासाठी खाणार काय?. हे सगळे ऐकून नायकाला खूप वाईट वाटते. नवीन नोकरी, नवीन गावात येत असताना त्यांनी अनेक स्वप्ने पाहिलेली असतात. चांगले नाव कमवावे, मुलांना चांगले शिक्षण द्यावे बालट्या भेटल्यानंतर त्यांच्या इच्छा आकांक्षांचा चक्काचूर होतात. काही वेळाने जेव्हा म्हातारा कारभारी नायकाला भेटतो त्यावेळी तो नायकाला विचारतो "इथे का बसला रे बाळा?" नायक त्यावेळी आपण मास्तर असल्याचे त्याला सांगतो. पूर्ण कादंबरीत कारभारी नायकाला मदत करीत असताना

दिसून येतो. कारभारी नायकाच्या पाठीवरून हात फिरवतो व म्हणतो की तू आपल्यातलास आहे तेव्हा नायकाला आणखी धीर येतो व खूप आनंद होतो. जेव्हा कारभारी आपल्या गावकऱ्यांपुढे शाळेचा विषय काढतो. आपल्या गावात एक नवीन मास्तर आल्याचे सांगतो त्यावेळी मात्र अनेक गावातील लोकांना ते मान्य होत नव्हते. "कुठं आहेत आपल्या गावात पोरं" असे म्हणून विषय टाळत होते. कारभाऱ्याला मात्र शिक्षणाचे महत्त्व पटल्याने तो त्यांना समजावतो. थोडे धनगर आपल्या मुलांना शाळेत पाठवण्यास तयार होतात. मास्तराला खूप आनंद होतो. दुसऱ्या दिवसापासून शाळा सुरू करण्याचे ठरल्यावर नायक कारभाऱ्याची रजा घेऊन झोपायला जातो.

शेवटी शाळा सुरू होते. मुलांना शाळेची गोडी नव्हती. त्यांच्या पालकांना देखील आपल्या मुलांना शाळेत पाठवायचे नसते. त्यांना आपल्या मुलांना शाळेत पाठवण्यापेक्षा रानात मेंढऱ्यांमागे पाठवणेच महत्त्वाचे वाटत असते. काही मुले शाळेत यायची पण काही ना काही कारणे सांगून परत घरी जायची. याचे कारण म्हणजे ती दिवसभर गावात हिंडत होती. त्यांना एका ठिकाणी बसण्याची सवय नव्हती. मास्तराने त्यांच्यावर जरा सुद्धा ओरडले तर ती रडून घरी जायची व आपल्या आयांना सांगायची. आया मास्तरांकडे येऊन रागवायची. याचे काही मास्तराला वाईट वाटत नसे. मास्तर सकारात्मक विचार करणारा होता. पाहता पाहता आठ दहा मुले नियमितपणे शाळेत येऊ लागली. मास्तर मुलांना 'ग, म, भ, न'चे धडे गिरवायला देऊ लागले. मुलांना स्वच्छतेबद्दल काहीच माहिती नव्हती. त्यांना साध्या साध्या गोष्टींची जाण नव्हती. तोंड न धुता तशीच मुले शाळेत यायची. पाटी पाण्याने न पुसता थुंकीने पुसायची. नायकाने अशा या मुलांना सुधारण्याचे खूप प्रयत्न केला. शाळेत सता नावाचा एक हुशार विद्यार्थी होता. अभ्यासाची त्याला आवड होती. सता हा बिरा बनगराचा मुलगा असतो. त्याला सातवी पास करायची होती. त्यामुळे नायक जास्त लक्ष त्याच्याकडे देऊ लागतात. आयबू मुलाणी, आनंदा रामोशी व रामा बनगर काहीच उद्योग न करता शाळेत येऊन वेळ घालवत असे. वेळ घालवणे हाच त्यांचा प्रधान हेतू होता. आयबू केव्हा केव्हा बकरी कापण्याचे काम करायचा. त्या बदल्यात त्याला कालवण व भाकरी मिळायची. त्या गावात स्वतः चे असे घर त्याचे नव्हते. झोपायला जिकडे त्याला जागा मिळेल तिकडे तो झोपायचा. आयबूला कोणी नव्हते तो असाच फिरता-फिरता या गावात पोहोचलेला असतो. कादंबरी पुढे जात असताना अनेक प्रसंग नायकांनी यात मांडलेले आहे. रामा बनगर कादंबरीच्या नायकाकडे व्यवहारात नसलेला एक राणी छाप रूपया तालुक्यात चालत असेल तर चालवून द्या असे सांगून देतो.

नायक आपल्या गावाकडून येताना तो रूपया मोडून आणतो. नायकाला गावातील लोक बरीच कामे सांगू लागतात. त्यांना असे वाटत होते की नायक चांगले शिकलेले आहेत. सगळया समस्यांना मात करण्याचा काही ना काही उपाय त्याच्याकडे आहे. नायक त्या गावात आता फक्त मास्तर म्हणून न राहता त्या गावातील लोकांचे काम करू लागले होते. पत्र लिहिणे, अर्ज लिहिणे, तालुक्याला जाऊन पत्र पोस्ट करणे एवढेच नव्हे तर नवरा बायकोची भांडणे, मेंढरू चोरी झाल्याची तक्रार असे विविध समस्या घेऊन लोक नायकाकडे येऊ लागले होते. पावसाळयाचे दिवस असते व लोकांची पेरणीसाठी गडबड सुरू होते. शेकू नायकाकडे एका बैलाची सोय करून द्यावी असे सांगून त्यांच्या मागे लागतो. नायकाला ते शक्य नव्हते. नंतर सर्वांना अशी बातमी मिळाली की शेकूच्या बायकोने बैलाबरोबर स्वतः रेटून पेरणी केली. ही घटना ऐकल्यावर सगळे आश्चर्यचकित होतात. यावरून असा बोध होतो की पोटाचा प्रश्न जेव्हा उपस्थित होतो तेव्हा या गावातील पुरुषच काम न करता स्त्रिया सुद्धा कामासाठी धडपडत असतात. मेहनतीच्या बाबतीत पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. रामा बनगराने नायकाला दिलेले तीनशे चाळीस रूपये गावाहून येताना मोडून आणतो. पैशांची जोखीम मोठी असते त्यामुळे नायक ते पैसे दशम्यांच्या पिशवीत ठेवतो. संध्याकाळी ज्यावेळी नायक मोडून आणलेले पैसे परत करण्यासाठी दशम्याशी पिशवी शोधतो त्यावेळी मात्र त्याला ती पिशवी सापडत नाही. नायक अतिशय घाबरघुबरा होतो. अनेक प्रश्न त्याच्या मनात निर्माण होतात. अशातच कारभाऱ्याची नात म्हणजेच अंजी नायकाकडे येते. एक खण व जुनी चोळी नायकाकडे देऊन, शनिवारी तालुक्याहून येताना ती चोळी शिवून आणण्यास सांगते. ही गोष्ट तिने कारभाऱ्याला लपवलेली असते. नायकाला देखील कारभाऱ्याला न सांगण्याचे सुचवून बाहेर पडते. कारण अंजीने रोजगार करुन पैसे स्वतःसाठी साठवले होते व नवीन चोळी ती कारभाऱ्यापासून चोरून शिवत होती.

पैसे चोरीला गेले आहे हे रामाला सांगायचे असे नायक ठरवतो. पण त्याआधी कारभाऱ्याचा सल्ला घ्यावा म्हणून नायक आयबूला कारभाऱ्याला बोलवायला पाठवतो. परंतु कारभारी नायकाकडे येत नाही. तेव्हा नायक स्वतः कारभाऱ्याकडे जातो. तेव्हा देखील नायकाशी बोलण्याचे कारभारी नाकारतो. तेव्हा अंजी नायकाला सांगते की दादू बालट्याने कारभाऱ्याला काहीतरी सांगितले आहे म्हणून ते बोलत नाही. आधी दु:खी असलेला नायक हे ऐकून अधिक अस्वस्थ होतो. आपल्या खोलीत येऊन सगळे आयबूला सांगतो. तेव्हा आयबू नायकाला म्हणतो की दादू बालट्या तुझ्यावर जळतो. तेव्हा

नायकाचा मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. आधीच नायकाला पैसे सापडत नव्हते त्यात हे एक नवीन संकट उभे झाले. तेवढ्यात आनंदा रामोशी नायकाच्या खोलीत प्रवेश करतो व पैसे नेल्याचे सांगतो. ज्यावेळी आनंदाने पैसे परत केले त्यावेळी मात्र नायकाच्या डोक्यावरचा भार कमी झाला. आनंदाने सगळी हकीकत सांगितल्यावर असे समजले की आनंदाने पैसे चोरण्यासाठी ती पिशवी नेली नव्हती तर त्या पिशवीत असलेले दशम्यासाठी नेली होती. जेव्हा त्या पिशवीत त्याने पैसे पाहिले तेव्हा मात्र त्याला लालच येते. त्याचे मन त्याला खाऊ लागते म्हणून ते पैसे घेऊन तो परत येतो. पैसे परत केल्यामुळे नायकाला खूप चांगले वाटते पण ह्या मूर्ख माणसाच्या वागण्याने नायकाला किती यातना सोसाव्या लागल्या. त्यामुळे त्याला आनंदाचा खूप राग येतो. आनंदाला तो आपल्या खोलीतून बाहेर काढतो. त्यानंतर लगेच ते पैसे नायक रामाला देऊन सांगतो की हे पैसे घरात न ठेवता त्या पैशांचे काहीतरी कर. रामा त्या पैशाने मेंढरे घेतो. एके दिवशी नायक आंघोळीसाठी विहिरीकडे जात असताना कारभारी त्याच्या मागोमाग जातो व दोन पायऱ्या सोडून बसतो. ज्यावेळी कारभाऱ्याने नायकाशी संवाद साधला त्यावेळी नायकाला समजले की अंजीला चोळी आणून दिल्याचे कारभाऱ्याला कळले. हे सगळे कारभाऱ्याला सांगणारा दादू बालट्या असतो. अंजीने हे कारभाऱ्यापासून लपवले होते याचाच बालट्याने फायदा घेतला व वेगवेगळे विचार कारभाऱ्याच्या मनात निर्माण केले. यामुळे कारभारी नायकाकडे बोलत नव्हता. शेवटी कारभाऱ्यानेच नायकाकडे बोलणे सुरू केले. नायक कारभाऱ्याशी बोलतो पण त्याला बालट्याचा राग आलेला असतो. कारण नायकाचा मनात वाईट विचार नसताना देखील बालट्याने त्याच्यावर आरोप केलेला असतो. खोलीवर येऊन नायक आयबूला सगळी हकीकत सांगतो. नायकावर केलेला आरोप ऐकून आयबूच्या तोंडून शिवी बाहेर पडते. अंजीवरुन गावात बालट्या आपली बदनामी करील व मारहाण करील असे सतत नायकाला वाटत होते. कारण सुरुवातीलाच दादू बालट्याने पूर्वी असलेल्या मास्तराने गावात काही खवडव केल्याने त्याला गावातल्या लोकांनी बेदम मारले असे सांगितले होते. हाच विचार नायकाला सतवथ राहतो.

त्यानंतर तीन-चार दिवसांनी मध्यरात्री अचानक चावडीजवळ चाललेला गलबला ऐकून नायकाला जाग येते. खोलीतून बाहेर जाण्यासाठी नायक आयबूला उठवतो. दोघेही बाहेर जाऊन पाहता तर बरीच लोकं जमलेली त्यांना दिसतात. धुळीत जमिनीवर दादू बालट्या पडलेला दिसतो. बालट्याला कोणी तरी चोप दिलेला असतो. त्याचे कपडे फाटलेले असतात. लोक बालट्याला तेथून बाजूला घेऊन

जातात. त्याच्या तोंडावर पाणी शिंपडतात, वारा घालतात. असे मदतीला येणारे लोक जास्त प्रमाणात गावात पाहावयास मिळतात. बालट्याला बोलता सुद्धा येत नव्हते. काही लोकांना असे वाटायचे की हा भानामतीचा प्रकार असावा. नायक गावातील लोकांना समजावून सांगत होता की असे काही नसते. बालट्या शुद्धीवर आल्यावर लोक त्याला विचारत होते की कोणावर संशय आहे का? तेव्हा रामा म्हणतो त्याच्या अनेक भानगडी आहेत. कोणी तरी डाव साधून त्याला मारले असेल. बरेच दिवस जातात तरीही बालट्या अंथरुणावर पडलेला असतो. गावातील काही लोक म्हणतात की बालट्याला भुताने पछाडले असेल. या प्रसंगावरून असे समजते की या लोकांचा अंधश्रद्धेवर विश्वास होता.

एके रात्री नायक आपल्या खोलीत बसल्या असतानाच नायकाला वाटते की गावात एक पक्की इमारत असावी. नायक गावात तालीम बांधण्याचे ठरवितो. तालमीचा फायदा त्या गावातील मुलांना, गावकऱ्यांनाच होणार होता. रामोशीला गावातील लोकांना बोलवायला पाठवतात. सगळे लोक एकत्र जमा होतात. ज्यावेळी नायक प्रस्ताव सगळयांसमोर मांडतो तेव्हा त्या लोकांमध्ये कुजबुज सुरू होते. नेहमी प्रमाणे नव्या गोष्टीला ते नकार देतात. कारभारी लोकांना समजावून सांगतो. तरी ते लोक अनेक प्रश्न उपस्थित करतात. नायकाने तालीम बांधण्याने होणारे फायदे सांगितल्यावर ते लोक राजी होतात. ह्या सगळ्या राटावाटीनंतर तालीम बांधण्याच्या कामास सुरुवात होते. नायक लोकांना सांगतो की बांधकामासाठी पैसे द्यावे लागेल पण ज्यांना पैसे देणे शक्य नाही त्यांनी आपल्या शेतातील झाड किंवा बैलगाडी कामासाठी म्हणून देऊ शकतात. तालीमच्या उद्घाटनासाठी राजाला बोलवायचे ठरते. तालीम बांधण्यासाठी जाग्याची सोय होते. लोक नायकाबरोबर झाडे गोळा करू लागली, नंतर ते तोडून बैलगाडीत तालीमच्या जागेवर आणू लागली. लाकडे सुताराला देऊन त्यापासून दार, खिडक्या वगैरे तयार करण्यात येते. ही सगळी कामे करत असताना आणि करून घेत असताना नायक अगदी उत्साहाने असतो. बांधकाम चालू असताना नायक अनेक चढ- उताराला सामोरे जाताना दिसतात. काही लोक पोखारलेली वगैरे लाकडे देतात तेव्हा नायक वैतागताना दिसून येतो. खरे म्हणजे नायक हा सगळा उद्योग गावातील लोकांसाठीच करीत होता तरी देखील काही लोक झाड देण्यासाठी नाकारत होते. नायकाने मात्र ठामपणे बांधकामाचा निश्चय घेतल्याने तो कामाच्या मागे लागतो. सदैव नायकाबरोबर असणारे म्हणजे आयबू, आनंदा रामोशी, कारभारी व रामा बनगर. काही लोकांना असे वाटत होते की नायक आपल्या फायद्यासाठी तालीम बांधतो. पण नायक ह्या गोष्टी दुर्लक्ष करून आपल्या कामाकडेच लक्ष देत

असतो. तालीम बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे हुजुरांनी उद्घाटनासाठी येण्याची कृपा करावी असे सरकारला लिहून कळवतो. यासंदर्भात सरकारकडून उत्तर येते की २० एप्रिलला सरकारी स्वारी येऊन उद्घाटन करतील. तालुक्याहून अधिकाऱ्याची फेरी सुरू होते. वाडीपर्यंतचे सगळे रस्ते सुधारण्यात येते. शेवटी ज्या दिवसाची नायक आतुरतेने वाट पाहात होता तो दिवस उजाडला. गावातील लोक रात्री गॅसबत्या लावून काम पूर्ण करीत होते. एकवीस बैलांच्या रथातून राजे सरकारांना आणायचे ठरते. सरकार आठ- सव्वाआठच्या दरम्यान येतात. शिंगे वाजवली जातात. सगळयांची धावपळ सुरु होते. त्या गावातील लोकांचा असा रिवाज असतो की सरकार गावात येताच त्यांना नारळ व रुपया घेऊन त्यांच्यासमोर जायचे. हे काम पाटीलाने करायचे असते. पण ही जबाबदारी नायक कारभाऱ्याशी सोपवितो. कारण त्या गावातील वृद्ध माणूस कारभारीच असतो व तालीम बांधण्याच्या दरम्यान नायकाबरोबर त्यांनी खूप श्रम घेतलेले असते. सरकाराचे स्वागत गावातील सुवासिनी आरत्या घेऊन करतात. राजाच्या हस्ते तालीमचे बंद दार उघडले जाते. राजा नायकाचे कौतुक करतात. नायकाचे, राजाचे भाषण होऊन औपचारिक कार्यक्रम समाप्त होतो. पण नायकाचा आनंद मात्र तसाच असतो. गावात तालीम बांधण्याचे नायकाचे स्वप्न पूर्ण झाले होते. तालीमाचे बांधकाम चालू असताना उंचावरून पडलेल्या आयबूचा मोडलेला हात जगन्या रामोशी चोळून नीट करतो.

ह्या छोट्याशा बनगरवडीत अनेक घटना घडतात. एके दिवशी कारभाऱ्याची तब्येत बिघडते. त्याला असे स्वप्न पडले की आता तो हे जग सोडून जाणार. त्यामुळे तो सगळयांची शेवटची भेट घेतो. कारभारी अंजीला शेकूच्या हवाली करतो. अनेक उपाय कारभाऱ्याच्या आजारासाठी केले जातात. पण दुसऱ्या दिवशी सकाळी कारभारी सर्वांना सोडून जातो. त्यामुळे संपूर्ण वाडी सूनी होते. नायक उदास होतो कारण सुरूवातीपासून नायकाला मदत करणारा हा कारभारीच असतो.

बनगरवाडीत मावल्या आईची जत्रा भरते. वाळीत टाकलेल्या बाळा बनगराला पुजारी प्रसादाचा गुलाल लावत नाही कारण म्हणजे ज्यावेळी तालमीच्या बांधकामासाठी झाडे गोळा करतात त्यावेळी बाळा बनगर आपले एक झाड देण्यासाठी तयार होत नाही. तो गावातली लोकांना सरळ सांगतो की माझी खुशी नाही, मला गाव नको आणि तालीम सुद्धा नको. झाडावर कुऱ्हाड घालायच्या अगोदर आपल्या नरड्यावर घाला आणि मग खुशाल न्या असे म्हणतो. पण ज्यावेळी पुजारी त्याला गुलाल

लावत नाही त्यावेळी मात्र तो मोठ्याने ओरडून म्हणतो की "माज्या पांडरीपुढं मी पदर पसरतो, माजी चुकी माफ करा. मला तुमच्यात घ्या. मला गुलाल लावा. तुमी माझं झाड घ्या, घर घ्या, माजा जीव सुदीक घ्या; पर मला असं लांब ढकलू नका!"[१] त्या वाडीत राहून अनेक त्रास त्यानी सहन केलेले असते. गावकऱ्यांशी तो माफी मागतो. म्हातारा काकुबा त्याला गुलाल लावायला सांगतात. बाळाला गुलाल लावला जातो व वाडीत घेतले जाते. सगळे मावल्याईच चांगभलं म्हणून ओरडतात. धुळा बनगरावर देवीचा अवसर येतो. गावातील लोक त्या देवीला गावात पाऊस येईल का म्हणून विचारतात. देवीपुढे बकरे कापले जातात. देवीच्या नावाने 'चांगभलं'चा घोष होतो व जत्रा समाप्त होते. धुरा बनगराच्या अंगात आलेल्या देवीने पाऊस येणार म्हणून सांगितले होते पण तरीसुद्धा त्यावर्षी बनगरवाडीत पाऊस पडत नाही. नक्षत्रांमागून नक्षत्रे गेली तरी पाऊस पडत नाही. विहिरींचे पाणी आटले, चक्रीवादळे होऊ लागतात, वाडीचा हेळ आटला, पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी मारामार होते, सकाळ-दुपार लोक पाण्यासाठी हेळावर गर्दी करू लागले, पाण्यासाठी भांडण होऊ लागली. शाळा, तालीम ओस पडते. संपूर्ण बनगरवाडीच दुष्काळाच्या तावडीत सापडते. मेंढरे निरनिराळे रोग होऊन मरण पावतात. काही धनगर आपले बैल विकण्यासाठी जातात पण त्यांना तसा भाव मिळत नाही. बिरा धनगऱ्याच्या सगळ्या मेंढऱ्यांना रोग झाल्याने त्याची सगळी मेंढरे मरण पावतात. आनंदाने गाव सोडून जाण्याचे ठरविले असते. त्याअगोदर तो नायकाकडे येऊन त्याने व आयबूने मिळून बालट्याला मारले असे सांगतो व मारण्याचे कारण म्हणजे तुम्हाला खूप त्रास देऊ लागला म्हणून मरले असे सांगतो व निघून जातो. वाडीतले मेंढकेही रामोशांच्या नंतर गाव सोडून जाऊ लागतात. म्हातारा काकुबा मात्र आपला गाव सोडून रामाबरोबर जात नाही. त्याला त्याच गावात राहायचे असते. त्याची देखबाल करण्यासाठी रामा आपल्या बायकोला तिथे ठेवून जातो. हळू-हळू करून सगळी मंडळी गाव सोडून जाऊ लागतात. वाडी उजाड होते. संध्याकाळी येणारा मेंढ्यांचा आवाज ऐकू येईनासा होतो. वाडी निर्जीव वाटू लागते. शाळा, तालीम तिथेच राहते. झाडे, घरे, जिथल्या तिथे राहते व मंडळी निघून जाते. जोरदार वारा घोंघावत राहतो. त्या वाऱ्यामुळे उडून आलेली धूळ घरांच्या दारांवर, भिंतींवर बसते. धनगरांनी स्वच्छ सारवलेली अंगणे धुळीने, केरकचऱ्याने भरून जातात. धीट झालेला लांडगा गावातून फिरू लागतो. सरकारला कादंबरीचा नायक सगळी हकीकत कळवतो. त्या वाडीत नायक व आयबू कसे तरी दिवस काढत असतात. काकुबा अधूनमधून नायकाकडे येऊन बसू लागतात. नायकाला वरून असा आदेश येतो की ती शाळा बंद करुन

तालुक्याच्या प्रार्थमिक शाळेत रुजू व्हावे. आयबू नायकाचे सामान आवरतो. शाळेला कुलूप लागते तसेच तालीमला कुलूप लागते. नायक व आयबू काकुबाकडे जाऊन त्याचा निरोप घेऊन वाडीबाहेर पडतात. आयबू नायकाच्या घरी त्याचे सामान ठेवून परत कुठे आसरा घेईल, काय करील हा प्रश्न पडलेला असतो. उजाड बनगरवाडी मागे राहते व ते दोघेही चालत राहतात.

## ३.१.२ बनगरवाडी कादंबरीतील व्यक्तिरेखा

कादंबरीतील कथानकाला जेवढे महत्त्व आहे, तेवढेच कादंबरीतील व्यक्तिरेखांना आहे. व्यक्तीच्या कृतीतूनच कथानकाला गती मिळत असते. कथानक जेव्हा लेखकाच्या मनात साकार होते, तेव्हा व्यक्तींसहच ते साकार होत असते. कादंबरीत असलेली व्यक्तिरेखा ही कादंबरीकाराची निर्मिती असते. एक विशिष्ट असा हेतू ठेवून कादंबरीकार निर्मिती करीत असतो. त्यामुळे कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा असली तरी त्यांना त्या हेतूनुसार वेगवेगळे महत्त्व दिले जाते.

व्यंकटेश माडगूळकरांनी प्रभावी व्यक्तिरेखा या बनगरवाडीत उभ्या केल्या आहेत. धनगरांच्या जीवनावर 'बनगरवाडी' ही कादंबरी आधारित आहे. या कादंबरीत वाडीत आलेले शाळामास्तर म्हणजेच राजाराम विठ्ठल सौंदणीकर याला भेटलेले व्यक्ती व त्या गावात त्याला आलेल्या अनुभवांचे चित्रण रेखाटले आहे. हा शाळामास्तर तेथील जीवनाशी एकरूप होत असतो. तेथील लोकांबद्दल जाणून घेतो. आपल्याला शक्य आहे तेवढी सर्व प्रकारची मदत तो त्यांना करतो. हा शाळामास्तर व गावात विशेष मान असणारा व मास्तरला पहिल्या दिवसापासून मदत करणारा कारभारी हा ह्या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. आयबू, आनंदा रामोशी, बाळा बनगर, शेकू, शेकूची बायको, रामा बनगर, काकुबा, जगन्या, अंजी अशा विविध व्यक्तिरेखा व्यंकटेश माडगूळकर यांनी या कादंबरीत चित्रित केल्या आहेत. या गावातील समूहजीवनाचे चित्रण या विविध व्यक्तिरेखांमधून चित्रित होते.

### १. मास्तर

राजाराम विठ्ठल सौंदणीकर हे शाळामास्तर अर्थात नायकाचे नाव आहे. विभूतवाडीच्या विठ्ठल धोंडिबा सौंदणीकर या बारनिशी कारकुनाचा तो मुलगा असतो. त्यांची नेमणूक शिक्षक म्हणून पहिल्यांदा बनगरवाडी या ठिकाणी होते. राजाराम सौंदणीकर यांच्या रूपाने बनगरवाडीत एक ध्येयवादी शिक्षक रुजू होतात. हा त्यांचा पहिलाच अनुभव असतो. नायक मनात अनेक स्वप्ने, इच्छा, आकांशा घेऊन

बनगरवाडीत आलेला असतो. तो खूप कष्टाळू असतो. भल्या सकाळी उठून तो नोकरीच्या गावी जाण्यासाठी पायीच निघतो. त्याचे जीवन लहानशा गावातच गेल्यामुळे गावाबद्दल, तेथील लोकांबद्दल थोडीफार माहिती त्याला असते. आजुबाजूला नांगरून पडलेले जमिनीचे तुकडे पाहताच गाव आल्याचे त्याच्या लक्षात येते.

नायक खूप भावनाप्रधान असतो. ज्यावेळी भालाईत त्याच्याशी तुच्छतेने बोलतो तेव्हा नायकाच्या मनावर त्याच्या बोलण्याचा परिणाम लगेच होतो. तो निराश होतो. अनेक प्रश्न त्याच्या डोक्यात निर्माण होतात. त्या गावात एकाकीपणाची भावना त्याच्यात जागृत होते. कारभारी त्याच्याशी प्रेमाने बोलणारा असतो. त्याला 'बाळा' म्हणून हाक मारतो. त्याला शाळेत घेऊन जातो तेव्हा मात्र त्याला धीर येतो. आपलेही कोणीतरी आहे, आपण अगदीच एकाकी नाही असे त्याला वाटू लागते.

बनगरवाडीमध्ये अधिक वस्ती धनगरांचीच होती. दिवसभर त्यांची मुले मेंढरांच्या मागे जात होती. वाडीत शाळा सुरू करायची, गावातील लोकांचे प्रेम मिळवायचे, त्यांचा विश्वास संपादन करायचा अशी अनेक स्वप्ने पाहून तो त्यागावी आलेला असतो. कारभाऱ्याच्या मदतीने तो हळूहळू मुले शाळेत जमा करतो. गावातील लोकांना शाळेचे महत्त्व पटवून देतो. सोबतीला असलेल्या आयबूला आपल्याकडे असलेल्या भाकरीतील भाकरी खायला देतो. आपले घोंगडे तो झोपल्यावर त्याच्या अंगावर घालतो. बनगरवाडीत मास्तर म्हणून राहत असताना त्या गावातील लोकांची निरनिराळी कामे तो करीत असतो. उदाहरणार्थ: पत्र लिहिणे, अर्ज लिहिणे, गावातील लोकांच्या तक्रारींचे आपल्यापरीने निवारण करण्याचा प्रयत्न करणे, मनीऑर्डर करणे, तालुक्याहून येताना रूपये मोडून आणणे इत्यादी. नायकाला घराची ओढ असते. तो शनिवारी सकाळची शाळा झाल्यावर खूप वाट चालून विभूतवाडीला जाई.

नायक सरळमार्गी, प्रामाणिक असतो. रामाचे मोडून आणलेले पैसे जेव्हा चोरीला गेले तेव्हा आपल्यावर चोरीचा आळ येईल व कमवलेले नाव, प्रतिष्ठा धुळीला मिळेल या विचाराने तो कासावीस होतो. स्वतः कर्ज काढून ते पैसे भरायची देखील तो तयारी करतो. मास्तर जसा सरळमार्गी, प्रामाणिक आहे तसाच तो स्वाभिमानी असतो. ज्यावेळी कारभारी कारणाशिवाय त्यांच्याशी अबोला धरतो तेव्हा त्याला या गोष्टीचे वाईट वाटते पण तरीसुद्धा तो कारभाऱ्याशी बोलायला जात नाही. नायक प्रयत्नवादी

व स्वभावाने धडपडणारा असतो. त्याला गावासाठी काहीतरी चांगले करण्याची तळमळ असते. या त्याच्या तळमळीमुळे व घेतलेल्या परिश्रमाने गावात तालीम बांधून होते. लोकांकडून कधीकधी तो चातुर्याने कामे करून घ्यायचा. त्यांनी लोकांना तालीमच्या उद्घाटनाला आपण राजाला बोलवू हे सांगितल्यावर आपल्या लहानशा गावात राजा येईल या उत्साहाने लोक काम करू लागतात. तो वाडीतील लोकांच्या सुख- दुःखाशी समरस झालेला असतो. बैल मागण्यापासून ते खाजगी भानगडीपर्यंत अशा विविध कामानिमित्त लोक त्याच्याकडे येतात. जरी सुरुवातीच्या काळात त्याच्या अंगात थोडा भित्रेपणा असला, तरी नंतर मात्र तो धाडसीने वागू लागला होता. वांगी गावचे लोक जेव्हा रामोशाच्या वस्तीत येऊन मारहाण करतात तेव्हा धाडसीपणे त्या लोकांच्या सामोरे जाऊन, विचारपूस करून भानगड मिटवण्याचा प्रयत्न करतो. बनगरवाडी सारख्या ह्या छोट्याशा गावाला नवे वळण लावणारी, आदर्शाचा स्वीकार करून जीवन जगणारी ‘व्यक्तिरेखा’ राजाराम विठ्ठल सौंदणीकर अर्थात मास्तराच्या रुपाने या कादंबरीत उभी केली आहे. संपूर्ण कादंबरीचा तोल या व्यक्तिरेखेने सांभाळलेला आहे.

## २. कारभारी

बनगरवाडीतील वयाने वृद्ध व समजूतदार अशी ही व्यक्तीरेखा आहे. कारभाऱ्याचाच सर्वप्रथम बनगरवाडीत आलेल्या शिक्षकाला आधार मिळतो. गावाच्या भल्यासाठी योग्य निर्णय घेण्याची कुवत त्याच्याकडे असते. त्यामूळे गावातील सर्व लोक त्याच्या शब्दाला मान देतात. स्वभावाने प्रेमळ, विचारी दुसऱ्यांना मदत करणारा असतो. ज्यावेळी सौंदणीकर पहिल्यांदाच त्या वाडीत आले होते तेव्हा त्याला घर मिळवून देणे, नातीला त्याच्यासाठी पाणी आणायला सांगणे, गावातील मुले शाळेत येतील असे सांगून धीर देणे, नायकासाठी संध्याकाळी शेरडाचे दूध आणून देणे अशी अनेक कामे नायकाच्या मदतीसाठी त्यांनी केलेली असते. ज्यावेळी नायक गावात तालीम बांधण्याचा निर्णय घेतो तेव्हा नेहमीप्रमाणे ते लोक नव्या गोष्टीचा विरोध करतात. तेव्हा कारभारीच त्यांना समजावून सांगतो. वाडीच्या कारभाऱ्याचे पद त्याला त्याच्या या समजूतदारपणामुळेच मिळालेले असते. तालीमचे बांधकाम चालू असताना आलेल्या अनेक अडचणींनी वैतागलेल्या नायकाला तोच समजावून सांगतो की “इमारत बांधायची म्हणजे अडचणी येणार, त्रास होणारच. तू जर हे अर्धवट सोडलेस तर इमारत पूर्ण होणार नाही. जे काम आता हातात घेतलेय ते पूर्ण करू.” पण फक्त नायकाला समजावून तो थांबत नाही तर तो आपण

स्वतः शक्य होईल तेवढी मदत करीत असतो. आपला मृत्यू दुसऱ्या दिवशी होणार हेही कारभाऱ्याला स्वप्नात दाखवून दिले होते. त्यामुळे दिवसभर गावात फिरून तो गावकऱ्यांचा निरोप घेतो. आपल्या नातीची जबाबदारी शेकूवर संपवतो. तो निरवानिरवीच्या सर्व गोष्टी त्यांच्यासमोर बोलतो. कारभाऱ्याला पडलेले स्वप्न खरे होते. वाडी पूर्णपणे सुनी होते. नायकाच्या मनात परत एकाकीपणाची भावना निर्माण होते.

## ३. दादू बालट्या

आपल्या अवतीभोवतीच्या परिसरात आपल्याला वेगवेगळया स्वभावाची, प्रकारची, वृत्ती-प्रवृत्तीची माणसे भेटत असतात. बनगरवाडी या कादंबरीत आपल्याला दादू बालट्या या पात्राच्या रुपाने एक दुष्ट प्रवृत्तीचा माणूस पाहावयास मिळतो. टिवल्याबावल्या करुन तो जगत असतो. त्याचा हाच उद्योग असतो. तालुक्याच्या अधिकाऱ्यांशी ओळख असल्यामुळे व थोडेफार वाचता-लिहिता येत असल्याने वाडीत ताठाने वावरत असतो. ह्याच कारणांमुळे गावावर त्याचे वजन असते. नायक वाडीत यायच्या अगोदर वाडीतील लोक बऱ्याच वेळा बालट्याला सल्ला विचारत होते. सुरुवातीलाच नायकाला वाडीत तो भेटतो. बालट्याचा चेहरा मोठा व लांबोडका असतो व गालाची हाडे वर आलेली असतात. मिशांतले केस काळेकरडे झाले असून धुरकटल्यासारखे दिसत होते. डोक्याला तांबड्या रंगाचा पटका व अंगात गोल सदरा, कमरेला धोतर असा त्यानी वेष परिधान केलेला असतो. हातात भाला घेऊन गाव हिंडत असतो. त्याला चिलीम ओढायची व परत परत थुंकायची सवय असते. गावात कोणी नवीन व्यक्ती आलेले त्याला आवडत नसे कारण गावकऱ्यांवर नवीन माणसाचा प्रभाव पडला तर गावकरी आपल्याला काही विचारणार नाही, आपल्याकडून सल्ला घेणार नाही असे त्याला वाटायचे. त्यात मास्तराचे वाडीतील लोकांशी नाते चांगले आहे हे लक्षात येताच मास्तराचे व अंजीचे अनैतिक संबंध आहे असे तो कारभाऱ्याला सांगतो. असे सांगायचे दुसरे कारण म्हणजे ज्यावेळी बालट्या नायकाच्या खोलीवर येऊन त्याला घाबरवतो, आधीच्या मास्तराला कशाप्रकारे आपण मारले, अशा विविध गोष्टी सांगत असतो. तेव्हा नायक तोंडावर काही भाव न आणता ते ऐकत राहतो. त्यामुळे बालट्या त्याचा काटा काढायची संधी शोधत असतो व ती त्याला मिळते. बालट्याने सांगितलेली गोष्ट सरळ स्वभावाचा कारभारी खरी मानून अंजीला चोप देतो व मास्तरशी अबोला धरतो. काही दिवसांनी कारभाऱ्याला खरे काय ते कळते व तो नायकाशी बोलू लागतो. ही गोष्ट आनंदा रामोशी व आयबूला

कळताच ते दोघेही बालट्याला बेदम मारतात. मार खाऊन सुद्धा त्याच्या स्वभावात बदल झाला नाही. दुष्काळामुळे गाव सोडून जाताना तो नायकाला म्हणतो "मी चाललो. परंतु परत येईल आणि तुला बघून घेईन". मास्तराचा आलेला राग मात्र अखेरपर्यंत बालट्याच्या मनातून जात नाही. त्याला असे वाटते की मास्तरांनीच त्याचे हात- पाय तोडले आहे. बालट्याची झालेली स्थिती पाहून गावात कोणालाही वाईट वाटत नाही. पूर्ण कादंबरीत दादू बालट्या ही 'खल व्यक्तिरेखा' म्हणून व्यक्त होते.

## ४. आनंदा रामोशी

बनगरवाडीत जशी धनगरांची वस्ती होती तशीच रामोशांचीही वस्ती होती. आनंदा त्याच वस्तीतला असतो. आनंदा उंचीने बुटका व अंगाने बारीक होता. वयाने तो पस्तीस- चाळीसच्या वयाचा होता. त्याची दाढी वाढलेलीच असे. अंगात नुसता कोट, खाली आखूड चड्डी, डोक्यावर गांधी टोपी अशा वेषात तो नेहमी असे. ह्या वस्तीतील रामोशी काही कामधंदा करीत नसत पण तरीसुद्धा त्यांचे पोट भरत असे. आयबू मुलाणी व रामा बनगराबरोबर आनंदा रामोशी रोज सकाळी शाळेत येऊन भिंतीला टेकून उगीच बसत असे. त्यांना असे रिकामे बसलेले पाहून नायकाला प्रश्न पाडतो. नंतर असे समजते की वेळ घालवणे हाच त्यांचा प्रधान हेतू असतो. पोटाची पंचाईत उभी राहिली की आनंदा रामोशी खांद्यावर एक घोंडगे घेऊन रानातून फिरत राही. कुठे कांदे, वांगी, बाजरी, ज्वारी आहे हे सगळे ध्यानी ठेवून, रात्री वेगवेगळया रानातून थोडे-थोडे चोरून आणी. खाण्यापुरतीच तो चोरी करुन घेऊन यायचा. त्याने लहान चोऱ्या हाच जीवनाचा धंदा निश्चित केला होता. आठ-पंधरा दिवसांनी मालकांकडे जाऊन तो चोरी केल्याबद्दल सांगायचा. मालकांना म्हणायचा "चोरी कबूल केली की चोरीचा डाग जातो. समोरहून खायला द्या म्हटल्यावर कोणी देत नाही. राघूकावळे, किडामुंगी जेव्हा धान्य खातात तेव्हा ते काय विचारतात तुम्हाला? जसे तुम्ही त्यांना काहीच करत नाही तसे मला सुद्धा करू नका. पाखराने खाल्ले असे समजा आणि विसरून चला." बारीक- मोठी चोरी करणारा आनंदा तसा प्रामाणिक असतो. एके दिवशी आनंदा मास्तरांच्या खोलीत भाकरी मागण्यासाठी येतो पण तेव्हा मास्तर झोपलेले असतात. झोपलेले असताना त्यांना जागे कसे म्हणून करू? त्याला मस्तराची झोप मोडायची नसते याच विचारात असताना त्याला मास्तराची दशम्याची पिशवी दिसते. ती पिशवी घेऊन आनंदा जातो. त्या पिशवीतच मास्तरांनी रामाचे मोडून आणलेले पैसे ठेवलेले असते. त्यातले २-३ रूपये खर्च करून बाकीचे सर्व रूपये काही दिवसानंतर आनंदा परत घेऊन येतो. पैसे परत करत असताना तो मास्तरला प्रामाणिकपणे

सगळी हकीकत सांगतो. पुढे तो असेही सांगतो की "रूपये दिसल्यावर त्याची वासना झाली. आठ दिवस ते ठेवले व नंतर मनाला टोचणी लागून राहिली त्यामुळे पैसे परत आणून दिले." यावरून तो जरी चोऱ्या करणारा असला तरी तो प्रमाणिक असल्याचे दिसून येतो. वाडीत दुष्काळ आल्याने वाडी सोडून जाताना, आपण व आयबूने मिळून बालट्याला मारल्याचे आनंदा नायकाला सांगतो. त्याला मारण्याचे कारण म्हणजे तो नेहमी मास्तरला त्रास द्यायचा. मास्तराला शाळेत मुले मिळवून देण्यासाठी आनंदा मदत करीत होता. आनंदाने वांगीच्या माणसांना दिलेला शब्द खरा केला होता. वांगीची विधवा बाई जगन्या रामोशीनी पळविली होती. त्या लोकांना आनंदाने सांगितले होते की "त्याला व बाईला पकडून तुमच्या पुढे आठ दिवसांच्या आत उभे करतो." आनंदाने तिला व जगन्याला पाठलाग करून पकडले व त्यांच्या स्वाधीन केले होते. यावरून असे समजते की जरी चोरी करणे हा त्याचा धंदा असला तरी गावात कोणी वाईट काम केलेले त्याला आवडत नसे.

## ५. आयबू मुलाणी

बनगरवाडीच्या जवळच असलेल्या एखतपूर नावाच्या गावाचा आयबू हा निराधार असलेला माणूस आहे. गावोगाव भटकता भटकता तो बनगरवाडीत आलेला असतो. त्याचा चेहरा फुगीर गालांचा व तांबड्या नाकाचा असतो. त्याचे अंग व कपडेसुद्धा मळके असतात. त्यानी परिधान केलेला कुडता अनेक ठिकाणी फाटलेला असतो. मुसलमानी चोळणा असा त्याचा वेष असतो. मास्तराबरोबर तो त्याच्या खोलीवर राहत असतो. गावकऱ्यांनीही त्याला त्या वाडीतील ठेवून घेतला कारण तेथे मुलाणी नव्हता. बकरे कापण्याचे काम तो बनगरवाडीत राहून करू लागला. त्या बदल्यात लोक त्याला दोन वेळा जेवू घालू लागले. त्याला अंथरूण-पांघरूणाचीही गरज भासत नव्हती. चावडी, मोकळे मैदान अशा कुठेही ठिकाणी तो झोपायचा. काहीच नाही तर नायकाची खोली होतीच. मास्तराबरोबर राहून तो मास्तराच्या अनेक कामात हात-बोट लावत होता. तालमीच्या बांधकामावेळी त्याने अनेक कामे केलेली असतात. शेवटच्या टप्प्याला तो वरून खाली कोसळतो. तालमीच्या उद्घाटनाला आलेल्या राजाला त्याला बघता आले नाही याचे त्याला खूप वाईट वाटले. मास्तरावर प्रेम करणारा असतो. बालट्याने मास्तराला विनाकारण त्रास दिल्याकारणाने त्याने व आनंद रामोशी यांनी मिळून त्याला पिटले. वाळीत टाकण्यात आलेल्या बाळा बनगराचा मुलगा आयबूला जेव्हा बकरा कापण्यासाठी बोलवायला येतो तेव्हा तो सरळ सांगतो की "तुझे घर गावाने वाळीत टाकले आहे मी येणार नाही. तुझ्या शेरपायलीची

मला गरज नाही. जा तू." यावरून असे लक्षात येते की आयबू वाडीच्या सुख- दुःखाशी, जीवनाशी समरस झालेला असतो. गावात दुष्काळ पडल्यावर नायक माघारी जायला निघतो तेव्हा आयबू मास्तराबरोबर आपणही गाव सोडून जातो.

## ६. काकुबा बनगर

काकुबा हा रामा बनगरचा बाप असतो. तो साठ- सत्तर वय असलेला म्हातारा असतो. इतर धनगरांप्रमाणे त्याला देखील चिलीम ओढायची सवय असते. काकुबा आठ वर्षांचा होता तेव्हापासून मेंढरांमागे जात होते. मेंढरांच्या कळपातच त्यांचे पूर्ण आयुष्य गेले होते. साठ- सत्तर या वयात ते तेच करीत होते. त्यामुळे आपल्या मेंढरांना ओळखण्यात ते तरबेज होते. एकदा एका धनगराने नव्याने मेंढरे करण्यासाठी काकुबाकडून त्यांची चार मेंढरे नेली. काही दिवसांनी तो जेव्हा परत काकुबाला भेटतो तेव्हा सांगतो की "तुमची सगळी मेंढरे मरण पावली व त्यांची पिलेही नाहीत." काकुबाला त्याने सांगितलेल्या गोष्टीवर विश्वास बसत नाही. काकुबा त्या धनगराच्या वाड्यात जातो व आपल्या मेंढरांची पिल्ले बरोबर ओळखून, त्या धनगराला सांगतो की ही दोन पोरं त्याच्या मेंढीची आहे. खोटे बोलणाऱ्या धनगरानेही ही गोष्ट कबूल केली. काकुबाला झोप घेण्यासाठी आडवे होण्याची गरज भासत नव्हती. ते बसल्या-बसल्याच झोपत असे. झोपेत असतानासुद्धा एखादा लांडगा आसपास वावरत असला तर त्यांना त्याचा वास यायचा व ते इतर मेंढक्यांना सावध करीत असे. गावात दुष्काळ पाडतो तेव्हा सगळे लोक गाव सोडून जाऊ लागतात. काकुबा मात्र त्याच गावात राहतो कारण तो आपल्या गावाशी एकरूप झालेला असतो.

## ७. शेकुबा व त्याची बायको

शेकुबा हा या वाडीतील एक धनगर. गावात दोन-तीन एकरांच्या तुकड्यात तो शेती करीत असतो. त्याचे तोंड वाळलेले असते व पायातील ओबडधोबड नखे चालून-चालून खरखरीत झालेली असते. त्याची बायको मात्र वाडीतील सर्व धनगरणींपेक्षा उंच, ताकदवान, व धिप्पाड असते. शेतीकामात ती शेकुबाला मदत करीत असते. एकदा पेरणीच्या वेळी शेकुबाचा एक बैल मरतो. एक बैल घेऊन पेरणे शक्य नसते. दुसरा मिळाला नाही तर वर्षभर उपाशी मरण्याची पाळी त्यांच्यावर आलेली असते. शेकुने खूप प्रयत्न करुन देखील त्यांना बैल मिळाला नाही. तेव्हा एका बाजूने बैल व दुसऱ्या बाजूने शेकूची

बायको स्वतःच्या खांद्यावर जूं घेऊन बैलाबरोबर टिपण ओढीत राहते. अशा पद्धतीने शेकूची बायको शेकूची पेरणीची व वर्षभर उपाशी राहण्याची चिंता दूर करते. रात्री शेकू तिच्या पाठीवर राहून तिचे अंग, दुखरी पाठ तुडवीत होता.

कारभाऱ्याच्या मृत्यूनंतर कारभाऱ्याची नात अंजी शेकूकडे राहत असते. तेव्हा शेकू तिच्या नादी लागतो व तिच्याशी दूसरे लग्न करायचे ठरवितो. पुरुषा बरोबरीने शेतात काम करणाऱ्या, बैलाबरोबर टिपण ओढणाऱ्या शेकूच्या बायकोचे डोळे भरून येतात. ती वेगळी राहू लागते. काही दिवसांनी शेजारच्या येडशी गावच्या मळयात आलेला मेंढका अंजीला भेटतो. अंजी शेकूला न सांगता त्याच्याशी लग्न करते आणि त्याच्याबरोबर जाते. जेव्हा शेकू परत आपल्या बायकोकडे येतो तेव्हा ती आपल्या मनात काहीच न ठेवता व शेकूला काहीच न म्हणता त्याला परत स्वीकारते. यावरून तिचे आपल्या नवऱ्यावर असलेले प्रेम स्पष्ट होते. शेवटी आनंदी चेहरा घेऊन शेकूची बायको नायकाकडे येते आणि म्हणते की “मास्तर, आलं आमचं खुळं माघारी.”[२]

वरील व्यक्तिरेखांशिवाय अनेक इतर व्यक्तिरेखा वैशिष्ट्यपूर्ण व्यंकटेश माडगूळकरांनी या कादंबरीत उभ्या केल्या आहेत. उदाहरणार्थ: सता, बाळा बनगर, जगन्या रामोशी, राजा, नायकाचे आई-वडील, जगन्याची बहीण, गावकरी अशी अनेक व्यक्तिरेखा विविध प्रसंगाच्या निमित्ताने पुढे येताना दिसतात. जरी ह्या व्यक्तिरेखा काही क्षणासाठीच कादंबरीत आलेली असली तरी कादंबरीचे कथानक पुढे नेण्याचे कार्य अशा व्यक्तिरेखांनी केलेले पाहावयास मिळतात. बनगरवाडीत मोजक्या शब्दात व्यंकटेश माडगूळकर यांनी व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत. त्यांच्यामुळेच बनगरवाडीतील सामाजिक, सांस्कृतिक जीवन प्रत्ययास येते. उदाहरणार्थ म्हणजे ज्यावेळी वांगीचे लोक जगन्याला शोधण्यासाठी वाडीत येतात तेव्हा वाडीतील एक म्हातारी पुढे येते व म्हणते “उन्हाचा आलास पाणी पी.” तसेच वांगीचे लोक दादागिरी, खून, मारामाऱ्या करणारे असले तरी ते लोक आपल्या गावाची अब्रू राखणारे असतात. हे जगन्या ज्यावेळी त्यांच्या गावातली विधवा बाईला पळवितो तेव्हा स्पष्ट होते. ते म्हणतात “बाई विधवा असली, तिचे कुणी नसले, तरी हा सगळ्या गावाच्या अब्रूचा प्रश्न आहे. रामोशाने आमच्यातली एक बाई काढून नेली हे काळे आमच्या तोंडाला लागले आहे.”

बनगरवाडी कादंबरीतील व्यक्तिरेखा, त्यांची वृत्ती- प्रवृत्ती, त्यांचे स्वभाव, त्यांचा नायकाशी येणारा अनेक प्रकारचा संबंध अशा विविध गोष्टींमुळे बनगरवाडी सजीव वाटते. दादू बालट्याचा दुष्टपणा त्याच्या स्वार्थातून निर्माण झालेला आहे. बनगरवाडीत आलेल्या व्यक्तिरेखांचे चित्रण वाचत असताना, आपल्या अवती-भोवतीच्या परिसरातसुद्धा अशा वृत्तीची माणसे आहेत हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

## ३.१.३ बनगरवाडी कादंबरीतील वातावरण

'बनगरवाडी' ही ग्रामीण कादंबरी आहे. 'बनगर' हा शब्द पाहताच धनगरांबद्दल काही तरी असेल असा बोध होतो. माणदेशातल्या विशिष्ट लोकांच्या अर्थात धनगर लोकांच्या जीवनाचे चित्रण यात आले आहे. माडगूळकरांच्या जन्म गावाच्या जवळच असलेल्या एका वाडीचे नाव 'लेंगरवडी' होते. त्या वाडीत धनगरांची वस्ती होती. माडगूळकरांनी तिला 'बनगरवाडी' हे नाव दिले व त्या गावचे सविस्तर असे वर्णन या कादंबरीत केलेले आहे. त्यामुळे व्यक्तिरेखांइतकाच त्या गावचा परिसरही जिवंत झालेला आहे.

दशम्यांची पिशवी पाठीला मारून चालत बनगरवाडीला जात असताना केलेल्या नायकाच्या निवेदनातून सुंदर वर्णन आलेले आहे. नायक बनगरवाडीला जाण्यास बाहेर पाडतो तेव्हा सर्वत्र काळोख भरून राहिलेला असतो. चांदण्यांच्या उजेडात वळसे मारीत चाललेली गाडीवाट तेवढी फिक्कट अशी दिसत असते. रात्र किती आहे व उजाडायला आणखी किती वेळ लागणार याचा अंदाज बांधता येत नसतो. हळूहळू चांदण्या नाहीशा होत होत्या व उजाडू लागत होते. असा अप्रतिम वातावरण कादंबरीच्या सुरुवातीला अनुभवायला मिळतो. वाडीच्या परिसराचे वर्णन करताना लेखक लिहितात की "आजूबाजूला सपाट मोकळा माळ, बाजरीची तांबडी राने, आणि मध्येच गबाळे पडावे तशी पडलेली तीस- पस्तीस घरे, अशी बनगरवाडी होती."[३] लेखकांनी केलेल्या या वाडीचे वर्णन वाचत असताना आपण त्यात मिसळून जातो.

हा गाव कमी पाऊस पडणारा आहे. गाव ओसाड पडलेला असतो. पाहता तिकडे पिवळ्या करड्या रंगाचे भगभगीत माळ दिसून येतात. हे माळ चोहीकडे दगडगोट्यांनी भरलेले असतात. निसर्गाचे वर्णन करताना खालील काही वाक्ये पाहाव्या सारख्या आहेत.

उदाहरणार्थ: १. "वाटेवरची धूळ पायाला गार लागू लागली."[४]

२. "झोपेतून जाग्या झालेल्या कावळयांची जड कावकाव ऐकू आली."[५]

३. "माळावर वाळून पडलेले गवत सूर्याच्या पहिल्या किरणांनी उबदारले."[६]

४. "आता आसपास कुठे काळे कुठे तांबडे असे जमिनीचे तुकडे नांगरून पडलेले होते."[७]

हा गाव कमी प्रमाणात पाऊस पडणारा असल्याने या गावात लिंबाची व बाभळीची झाडे आढळतात. कमी पावसातही ह्या झाडांची वाढ होते. या वाडीत राहणाऱ्या लोकांना पाण्याची कमतरता भासत असल्याचे आपल्याला नायक व कारभारीच्या संवादातून दिसून येते. "पाण्याची वरड हाय गा वाडीला. उन्हाळयात पार वाळवण हुतं."[८] सुकलेल्या ओढ्याओघळीला असलेले पाणी चरायला गेलेल्या मेंढरांना प्यावे लागत असे. दगडचुन्याने बांधलेला एक हेळ असतो. पाऊस पडतो तेव्हा मात्र एक वेगळे बनगरवाडीचे रूप प्रत्ययास येते. बारीक बारीक बेडक्या दिसू लागतात, उड्या मारू लागतात, सगळीकडे हिरवेगार झालेले असते, चोहीकडे गवत उगवलेले असते. याचे वर्णन करताना लेखक म्हणतात की "अंगणात, माळरानावर, छपरांवर जिथे उगवू नये तिथे गवत उगवू लागले. सर्वत्र झगझगीत पोपटी रंग दिसू लागला." तसेच सकाळच्या प्रहरी, संध्याकाळी बनगरवाडी वेगवेगळया रुपाने दिसू लागते. उदाहरणार्थ: भल्या सकाळी उठून रात्रभर कोंडलेली मेंढरे घेऊन मेंढके वाडीबाहेर जात असे, जिथे गवताळ कुरण होते तिथे त्या मेंढरांना घेऊन जात असे. एक धनगर आणि एक कुत्रे शंभर शंभर मेंढरांमागे असे. तर संध्याकाळी रानातून परत येणाऱ्या मेंढरांचा गलगा ऐकू येत असे, धनगरी कुत्री भुंकत होती, माणसे बोलत होती, कोंबडे आरवत होते, चिमण्या- कावळे कोलाहल करीत होते. यामुळे निर्जीव वाटणारा गाव आता सजीव वाटत होता.

लेखकांनी प्रसंगानुरूप वातावरण निर्माण केलेले दिसून येते. उदाहरणार्थ: ज्यावेळी वांगीचे लोक जगन्याला शोधण्यासाठी येतात तेव्हा ते का आलेले असतात याचा कोणाला अंदाज बांधता येत नसतो. पण ते वांगीचे लोक होते व त्यांच्याबद्दल गावातील लोकांना आधीच माहित होते की ते दादागिरी, मारामाऱ्या, खून करणाऱ्यांपैकी आहेत. त्यामुळे तेव्हा त्या वाड्यात भयावह वातावरण निर्माण करण्यात आले आहे. तसेच दुसरे उदाहरण म्हणजे जेव्हा दादू बालट्याला मारहाण करण्यात येते तेव्हा आठपंधरा

दिवस झाले तरी तो हिंडूफिरू लागला नाही त्यामुळे गावातील लोकांना असे वाटू लागते की बालट्याला भुताने घोळसला आहे व आता ह्यातने तो बाहेर पडून जगणार नाही. लोकांमध्ये निर्माण झालेली अंधश्रद्धा येथे पाहावयास मिळते. अशा विविध प्रसंगांना, घटनांना केंद्रस्थानी ठेवून, कादंबरीकारानी त्या-त्या घटना – प्रसंगाला समर्पक असे वातावरण निर्माण केलेले दिसून येते.

## ३.१.४ बनगरवाडी कादंबरीची भाषा

भाषा ही कादंबरीचा अत्यंत महत्त्वाचा असा घटक आहे. कादंबरीत लेखकांनी जे विश्व कल्पिले आहे त्या विश्वात वावरणाऱ्या माणसाची जी संस्कृती आहे तिला अनुरूप अशीच भाषा कादंबरीत वापरावी अशी अपेक्षा असते.

ह्या कादंबरीत व्यंकटेश माडगूळकर यांनी नागरी तसेच बोली भाषेचा वापर केला आहे. निवेदनासठी प्रमाण व संवादांसाठी माणदेशातील धनगरी बोली भाषेचा उपयोग केला आहे. उदा: “काय अंडीवाला हायेस का गा?.”[९] अशा पद्धतीची भाषा वापरल्याने चांगला वाचकवर्ग ह्या कादंबरीला प्राप्त झाला आहे. जर लेखकांनी निवेदन बोली भाषेत केले असते तर शहरी वाचकांना ती भाषा समजायला अडचण आली असती. त्याचबरोबर पात्रांच्या तोंडी जर प्रमाण भाषा दिली असती तर पात्रे कृत्रिम वाटली असती. व्यंकटेश माडगूळकर यांनी भाषेचा हा समतोल व्यवस्थितपणे सांभाळला आहे. नायक सुशिक्षित असल्याने त्याची भाषा शुद्ध व प्रमाण आहे. उदा: “पाणी कुठाय ते सांगा, म्हणजे मी जेवण करीन. भाकरी आणल्यात बरोबर.”[१०]

“मला तुमच्याशी थोडं बोलायचं होतं बाबा. एक जरुरीची गोष्ट सांगायची होती.” यावरून बनगरवाडीत प्रमाण भाषेचा साज चढलेला दिसून येतो.

वाडीतील इतर लोक बोलीभाषेत वार्तालाप करतात. उदा: “हं, हतं काय करायचा गा मास्तर? साळा चालतीय कुटं हतं?

“एकलेच हाय का मास्तर?” यावरून शिक्षकासंदर्भात असलेला जो आदर असतो तो आनंदाच्या या संवादावरून लक्षात येतो. या कादंबरीतील पात्रांची नावे सुद्धा त्या ग्रामीण भागातील आहेत. उदा: आयबू, बालट्या, कारभारी, अंजी इत्यादी. तसेच त्या गावातील माणसे उच्चारताना ‘ण’

ह्या व्यंजनाचा उपयोग न करता त्याऐवजी ‘न’ चा उपयोग करतात. उदा: “मोजून बगा. मी तीन रुपये धा आने खाऊन बसलोय. ते काय माघारी देनार न्हाई. पर बाकी तुमचं सगळं रुपयं तसचं हायेत.”[११] बोलीभाषेतील संवादामध्ये असलेल्या नैसर्गिक गोडव्याने कादंबरीतील भाषेला एक वेगळंच सौंदर्य प्राप्त झालेले दिसून येते. सरकारच्या तोंडी प्रमाण भाषा आली आहे. व्यंकटेश माडगूळकर यांची शैली चित्रमय व ओघवती आहे. ज्या परिसराचे, निसर्गाचे, वस्तूचे, व्यक्तीचे ते जेव्हा-जेव्हा वर्णन करतात ते वर्णन जेव्हा वाचक वाचू लागतो तेव्हा तो निसर्ग, परिसर, घटना, प्रसंग आपल्या डोळयांसमोर उभी राहिलीच पाहिजे अशा पद्धतीची भाषा तसेच वर्णनशैलीचा वापर त्यांनी केला आहे. वाचक ही कादंबरी वाचत असताना रंगून जातो. एकदा ही साहित्यकृती हातात घेतली की पूर्ण झाल्याशिवाय खाली ठेवावीशी वाटत नाही. पाऊस न पडल्याने आजूबाजूच्या परिसरात बदललेले वातावरण, वाडीतील लोकांवर होणारे परिणाम हे सर्व त्यांनी अतिशय सूक्ष्मपणे नोंदविले आहेत. उदाहरणार्थ म्हणजे कादंबरीच्या सुरुवातीला केलेले वर्णन वाचत असताना प्रत्यक्ष तो परिसर आपल्या डोळयांसमोर उभा राहिल्याशिवाय राहत नाही. उदा: “मुरमुट्याच्या बुंध्यावर बसून राहिलेले हिरव्या झगझगीत रंगाचे भुंगे मुरमुटीची तुरट पाने खाऊ लागले.”[१२]

“अगोदर भगभगीत असलेले हे माळ उन्हाळयामुळे अधिक भगभगीत दिसत होते.”[१३]

व्यंकटेश माडगूळकरांनी माणदेशातील धनगर समाजात अर्थात बनगरवाडीच्या मातीत येताच गावातले जे गावपण असते ते गावपण धनगरांच्या बोलीभाषेतून व्यक्त केले आहे. लेखकांनी काही प्रमाणात अलंकाराचा वापर केला आहे. उपमा या अलंकाराचा वापर केला असून त्या प्रदेशाला साजेल अशा उपमांचा वापर केला आहे. उदाहरणार्थ: “ती गार सावली बघताच, तापलेल्या कोंबड्यासारखा जाऊन मी तिच्यात बसलो.”, “दूधभात खाऊन मांजर झोपते, तसा आयबू झोपला.”, “जमिनीप्रमाणे आभाळातही पांढरी मेंढरे वाडग्याकडे चालली होती.” तसेच त्या प्रदेशातील काही म्हणींचा वापर यात केलेला दिसून येतो.

उदाहरणार्थ: “घर बघावं बांधून.”[१४]

“धनगरी वेड सहा महिने जाणार नाही.”[१५]

"बोडकीला बावाचा धाक काय रं राम्या?"[१६]

या कादंबरीत जी धनगरी बोलीभाषा आलेली आहे त्याचे एक वैशिष्ट्ये सांगायचे झाले तर ज्यावेळी एखाद्या माणसावर एखाद्याला संतापायचे असेल तर जेव्हा त्यांचा राग त्यांच्या मायभाषेतून व्यक्त होतो तेव्हा त्यांची बोलण्याची पद्धत व त्यांचा संस्कार त्यांच्या भाषेवरून स्पष्ट होत असते. उदाहरणार्थ: जेव्हा नायक शाळेत वर्ग घ्यायला सुरुवात करतात तेव्हा काही कारणामुळे एका धनगरी विद्यार्थ्याची आई नायकावर रागवते. ती म्हणते की "बाबा, तुला लेकरं बाळ नाहीत का? ह्या प्रश्नाने ऐकणाऱ्याचे मन दुखावले जाणार परंतु 'बाबा' म्हणून स्वल्पविराम दिलेला आहे. जेव्हा मायेने आपण आपल्याच माणसावर रागवत असतो तसाच आपलेपणाचा भाव ह्या वाक्यात व्यक्त होताना दिसून येतो.

लेखकाच्या भाषाशैलीतून त्याचे समाजाशी व निसर्गाशी असणारा जवळचा संबंध नेमकेपणाने प्रकट होतात.

## ३.२ 'करुणाष्टक' कादंबरी

व्यंकटेश माडगूळकरांची 'करुणाष्टक' ही कादंबरी सप्टेंबर, १९८२ साली प्रकाशित झाली आहे. या कादंबरीचा आत्मचरित्रात्मक कादंबरी म्हणून उल्लेख केला तर चुकीचे ठरणारा नाही. या कादंबरीत लेखकाच्या घरच्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे असे वर्णन आले आहे.

### ३.२.१ करुणाष्टक कादंबरीचे कथानक

पोटासाठी राहते गाव सोडून जाणारे दादा, त्यांच्याबरोबर जाणारे त्यांचे कुटुंब यांच्या प्रवासातून व इतक्या साध्या प्रसंगापासून कादंबरीला सुरुवात झाली आहे. नायक, आई, दादा, नायकाची आणखी तीन भावंडं व वृद्ध आजी असा त्यांचा कुटुंब असतो. जन्मगावापेक्षा कितीतरी वेगळं हे नोकरीचं गाव असते. प्रवासादरम्यान लेखकाची आई फक्त लेखकाची आई न राहता सगळ्यांचीच आई होते, काळजी घेते व सगळ्यांना ती जपत असते. त्यांच्या आजीचे मात्र पार हाल होत असते. आजीला आपला गाव सोडून जावेसे वाटत नाही कारण तिला वाटत होते की आपले राहत घर सोडू नये. या मातीतच आपला देह मिसळून जावा. तिला जबरदस्तीने या गावात आणण्यात आले होते. माडगूळकर पुढील प्रमाणे त्याचा उल्लेख करतात ते म्हणतात 'आपल्या गावातून तिला जणू उपटून आणावे तसे आणले गेले होते.'

आपल्या आजीला लेखक बाईआजी म्हणत असे. लेखकाच्या आईचे बाईआजीसंबंधी एकमत निर्माण झाले होते. ती म्हणत असे की "आजी भ्रमिष्ट आहे, आजच झाली आहे असे नव्हे, तर ती पहिल्यापासूनच तशी आहे."[१७] या संदर्भाला लागू पडणारा एक प्रसंग म्हणजे ज्यावेळी लेखकाचे वडील लहान होते त्यावेळी ते सहपरिवारासोबत नातेवाईकाकडे लग्नाला गेल्यानंतर ही आजी आपल्या स्वतःच्या मुलाला तिथेच विसरून गावाकडे चालली असताना वाटेत लक्षात आल्यावर परत लग्नघरी येऊन त्या मुलाला परत घेऊन गेले होते. अशा विविध प्रकारचे प्रसंग कादंबरीत अनेक ठिकाणी पाहावयास मिळते. लेखकाच्या आईचा अंधश्रद्धेवर विश्वास असतो, ज्यावेळी बदलीच्या गावी ती सर्व लोकं येतात त्यावेळी ती मंडळी ज्या घरात राहत असतात, त्याठिकाणी एके रात्री लेखकाच्या आईला छपरातून खाली लोंबणारा भला मोठा एक नाग दिसतो. त्यावेळी तो नाग दिसण्यामागचे कारण आई पुढीलप्रमाणे सांगते की "ही निपुत्रिकाची वास्तू आहे. इथे पोरंबाळं घेऊन राहायला आता माझे मन धजणार नाही. यापेक्षा मी बेलदारासारखे झाडाखाली जाऊन राहीन!" स्वतःचे घर सोडून नोकरीच्या गावी आल्यानंतर लेखकाच्या आईला घरात नीटनेटकी व्यवस्था करावी लागत होती. एक महत्त्वाचे म्हणजे आईजवळ एक चांगली वृत्ती होती, ती नवीन माणसांना आपलेसे करीत होती. त्यामुळे इतर माणसेही उत्साहाने तिचा मदतीला येऊ लागतात व त्यांच्यात चांगला संबंध तयार होतो.

पुढे लेखकांनी त्यांच्या लहानपणीचे, सोसाव्या लागलेल्या त्रासाबद्दल सांगितले आहेत. लेखक व त्यांच्या थोरल्या भाऊला खेळायला खेळणं तयार करण्यासाठी घोड्याच्या शेपटीचा लांब केस पाहिजे असतो. तो केस काढण्याच्या प्रयत्नात असतानाच घोडीने थाप हाणली व डोळ्याखाली अर्धा इंच, घोडीची मारलेली थाप बसली होती. पूर्वीच्या काळात आणि आधुनिक काळातसुद्धा स्पृश्य-अस्पृश्य, जातपात पाळली जात होती व पाळली जाते पण लेखकाची आई मात्र या असल्या गोष्टींवर विश्वास ठेवत नाहीत व या सगळया गोष्टींच्या ती विरोधात असतात. तिने कधीही आपल्यापेक्षा खालच्या जातीतल्या लोकांना हिन समजले नाही. उलट वेळप्रसंगी याच लोकांच्या घरी आई आपल्या मुलांना पाठवत असे. यापलीकडे आईचे दूध देणारी माणसे देखील तिला भेटली होती. हे आईच्या बोलण्यावरून स्पष्ट होते. उदाहरणार्थ: आई म्हणते "त्या पाटलिणीचं दूध पिऊन तू वाढला आहेस, म्हणून असा आहेस. हातात बंदूक घेऊन पाखरे मारतोस, मांसमच्छर खातोस. हा सगळा त्या दुधाचा गुण आहे."[१८]

गावातील तांबे मास्तरांसारखी श्रीमंत माणसे, नानासारखी ज्याच्या मुखात सतत शिव्या असतात अशी माणसे, गोळे कंपाउंडरसारखी माणसे आईला सतत कुठे ना कुठे भेटतात. त्यामुळे पारगावात असून परक्यापणाची जाणीव तिला होत नाही. याचे कारण म्हणजे त्या गावचे लोक सर्वपरीने आईला मदत करीत असतात. घराला सावरण्याचा प्रयत्न आईने नेहमी केला आहे. लेखकाच्या वडिलांची कामात बढती झाली तेव्हा तिला फार आनंद झाला. ती वेगळ्याच स्वप्नात रमून जाते पण ज्याक्षणी तिला समजते की ही बढती नोकरी फारच जोखमीची आहे तेव्हा तिला खूप वाईट वाटते. ती नाखुश होते व आपल्याच नशिबाला दोष देते. सासरी सुरुवातीच्या काळात चांगली स्थिती असते पण सासरा वरल्यापासून घरातली लक्ष्मीच निघून गेली असे ती सांगते. तेव्हापासून घराची अशी अवस्था झाली आहे. एवढे असून सुद्धा तिचा आत्मविश्वास हिंमतवान असतो. ती म्हणायची "आज माझी पोरं लहानधाकटी आहेत, तोवर मला सगळं सोसलं पाहिजे. उद्या मोठी झाली म्हणजे ती मला सोन्यारुप्यानं न्हाऊ घालतील! माझीच पोरं आहेत ती, ती चांगलीच होतील पुढे!"[११] अशा विविध घटनांद्वारे लेखकाच्या आईबद्दल लेखक कादंबरीतून बरेच काही व्यक्त करतात. आई सतत या हलाखीच्या परिस्थितीतून मार्ग काढण्याचे प्रयत्न करताना दिसून येते. होणाऱ्या बदलीमुळे प्रत्येक वेळा त्यांना स्थलांतर करावे लागत असे. त्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जाऊन आपला संसार सावरून नेटाने पुढे नेणाऱ्या एका भारतीय स्त्रीचे दर्शन कादंबरीत 'आई' या व्यक्तिरेखाद्वारे पुढे आले आहे.

'प्लेग'सारख्या भयानक रोगापासून बचाव करण्यासाठी आई आपले बिऱ्हाड मानलेल्या बहिणीच्या शेतात हालविते. भटक्या लोकांप्रमाणे हेही तेथे राहू लागतात. त्याच दरम्यान लेखकाचा मोठा भाऊ पुढील शिक्षण घेण्यासाठी राजधानीला गेला होता. तो तिथे वसतिगृहात राहून शिक्षण पूर्ण करणार होता. आईने जाताना त्याला सांगितले होते की 'सोन्या, जा. नीट अभ्यास कर. परीक्षा दे. उत्तीर्ण हो आणि एकदा मिळवता हो, बाबा. अरे, आम्ही किती काळ त्रास सोसायचा? किती दारिद्र्य भोगायचे? फार ओझे आहे बाबा तुझ्यावर… सगळी लहानधाकटी भावंडे आता तुलाच वर काढली पाहिजेत ह्या गरिबाच्या गळ्यातनं, आधी तू निघाला पाहिजेस आणि यांना एकाएकाला हात धरून या गरिबीतून बाहेर काढले पाहिजे. आम्ही आता हात टेकले. आता आम्हाला तुझाच एकमेव आधार आहे. जा, जपून राहा. यशवंत हो!' यावरून संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आता लेखकाच्या मोठ्या भावावर असलेली स्पष्ट होते. थोरल्या भावानंतर लेखकाचा दुसरा भाऊ आपल्या काकांकडे गेला. तोच लेखकाचा भाऊ मध्यंतरीच्या

काळात खूप आजारी पडला होता, पण वाचला होता. त्यानंतर वडिलांची बदली पुन्हा होते व हे चक्र असे सतत चालूच राहते. आता झालेली बदली मात्र देवस्थानचा वहिवाटदार म्हणून झालेली होती. देवस्थानचा हा कारभार फार मोठा होता. त्या कारभारावर लक्ष ठेवणे म्हणजे साधे काम नव्हते. संकट होते. अशाच वेळी देवीच्या हारातील रत्नाची पुडी नाहीशी होते. त्यामुळे लेखकाचे वडील दुःखी होते कारण हे आलेले संकट फार भयानक होते. ह्यामुळेच त्यांची अब्रू जाण्याची शक्यता होती. अशात लेखकाचा थोरला भाऊ मॅट्रिकच्या परीक्षेत नापास होतो. हे ऐकून त्यांच्या आईला पार वाईट वाटते. आई त्याला खूप ऐकवते. तेव्हा तो घर व गाव सोडून सोडून जातो. लेखकाच्या वडिलांची सरकारी नोकरी जाते. नोकरी गेल्यामुळे आता पुढे काय होणार? असा प्रश्न त्या कुटुंबापुढे निर्माण होतो. अजून मुलांचे शिक्षण पूर्ण झाले नव्हते. शेवटी आई आपल्या माहेरचे घर व जमीन विकायचे ठरवते कारण आईचा त्यांच्या संसारात मोठा मोलाचा वाटा आहे. आपल्या कुटुंबाची, संसाराची काळजी तिला सतत होते. त्यामुळे पुढे उपस्थित असलेल्या समस्यातून बाहेर पडण्याचा मार्ग ती शोधीत असते.

जसे-जसे या कादंबरीचे कथानक पुढे जाते तसे-तसे एकापाठोपाठ एक घटना-प्रसंग या कादंबरीत येत राहतात. या कादंबरीच्या काळातच दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली होती. त्याच दरम्यान घर सोडून गेलेला लेखकाचा भाऊ त्यांना भेटतो. लेखकाला नवीन कपडे घेऊन तो आलेला असतो. लेखकाच्या थोरल्या भावाचे लग्न झाल्यानंतर आई-वडील जुन्या वाड्यात राहतात. या सगळ्या घटनांनंतर एके दिवशी लेखक कुणाला काहीच न सांगता चळवळीत सहभागी होतात. स्वातंत्र पूर्वीची घटना लेखकांनी येथे सांगितलेली पाहावयास मिळते. महात्मा गांधींचा खून झाल्याने सामाजिक स्थिती अस्थिर होते. ब्राह्मणेत्तर समाजाने अनावर होऊन ब्राह्मण कुटुंबे उध्वस्त केली. जाळली व लुटण्यात आली. वावटळसारखे लोक खेड्यापाड्यात पसरले. लेखकाच्या गावी, त्यांच्या वाड्यापर्यंत हे लोक पोहोचले होते. लेखकाच्या घरच्या मंडळींना बाहेर पडण्यास सांगू लागले, तेव्हा लेखकाची आई त्या लोकांना म्हणते की ‘अरे मी तुमच्याच गावची. लेकीचे घर जळतात? तिला वनवाशी करता? त्यावर एकजण म्हणतो ‘आक्का, तू आमच्या गावची हे खरे, पण आता आम्ही बाकी दहा जणांची घरे जाळली. तुलाच सूट देणे बरे दिसत नाही. तू आपली बाहेर हो.’ ऐनवेळी आईने कमवलेली माणसे उपयोगात पडतात. हे यावेळी स्पष्ट दिसून येते. कारण ज्यावेळी लोक घर जळतात त्यावेळी शेजारी असलेल्या रामोसवाड्यातून गावचा संरक्षक नाईक धावत येतो व देवाचा देव्हारा सुरक्षित बाहेर आणतो. कुठेही

स्पृश्य अस्पृश्य असा भेद पाळताना लेखकाची आई दृष्टीस पडत नाही. घर गेल्यामुळे वडिलांची जगण्यावरची वासनाच उडाली. ते आजारी पडतात व धसक्यातच त्यांचा मृत्यू होतो. अशा अनेक हालअपेष्टांना सामोरे जाऊन, अनेक चांगली- वाईट घटना पचवण्याचे कार्य आयुष्यभर आई करताना दिसून येते.

## ३.२.२ करुणाष्टक कादंबरीतील व्यक्तिरेखा

या कादंबरीतील व्यक्तिरेखांचा विचार केला तर असे स्पष्ट होते की ही एक हतबल पण अत्यंत प्रमाणिक असलेल्या कुटुंबाची कहाणी आहे. पात्रांचे व्यक्तिमत्त्व, कार्य, मनोवृत्ती, विचार इत्यादी पुरते नव्हे तर संपूर्ण जीवनावर प्रादेशिक वैशिष्ट्यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

## १. आई

वडिलांनी नव्या गावी नोकरी करणे व त्यामुळे सर्व कुटुंब मंडळींना दुसऱ्या गावी जाणे हे आधुनिक काळातील लोकांसाठी नवे नाही, परंतु 'करुणाष्टक' कादंबरीत आलेल्या आईसाठी जाण्याची तयारी करावी लागली, तसेच नवीन गावी पोहोचल्यावर त्या सर्व बदलाला सामोरे जाणे हे मोठे जोखमीचे काम होते. इथून पुढे या व्यक्तिरेखेचे दर्शन होते.

दर एका घरातल्या कर्त्या स्त्रीने अमके असण्याची गरज असते असे जणू तिच्या मनावर आधीच बिंबवले गेले होते. आई ह्या कादंबरीत सगळयांचीच आई झाल्यासारखे वागत असे. या कादंबरीतील सुरुवातीचे हे वाक्य 'आईच्या' व्यक्तिरेखेमधला दणकटपणा दाखवते. आई स्वभावाने मदतीचा हात पुढे काढणारी असते व कुणाच्याही अडचणीला उपयोगी पडते. 'देवाने पदरी घातलेले भोग' म्हणून ती नशिबी आलेल्या दारिद्र्याला निमूटपणे सोसते. कुलकर्ण्याच्या घराण्यात जन्माला आलेल्या या मुलीने लग्नाआधी दुःख अनुभवले नव्हते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचे लग्न झाले. मुले व्हायला सुरुवात झाल्यावर व्यक्तिमत्त्वामधील वयोवृद्ध मात्र आईमध्ये पुरेपूर दिसून येते. परिस्थितीमुळे मात्र त्यात गांभीर्य व कणखरपणा येतो. आई धार्मिक असते. घरातील कामे करताना, उठबस करताना देवाचे नामस्मरण कायम चालूच असते. तसेच कोणीही भिक्षेकरी काहीच न घेता जर पुढे गेला तर ते तिला पटत नाही. असे असून सुद्धा एकदा ती स्वतः होऊन एका गोसाव्यांकडे आपला मुलगा उपाशी आहे म्हणून पिठाची

मागणी करते कारण त्या प्रसंगात दारिद्र्यामुळे ती अगदी मोडून पडलेली असते. गोसाव्याने दिलेल्या पिठाच्या भाकरीने मुलांचे जेवण झाल्यावर उष्टे आवरताना मुलांना विचारते की 'हा देह कशाला म्हणून मी जगवायचा?.' अशीच भावना ज्यावेळी तिच्या दोन मुलींचा मृत्यू होतो तेव्हाही येते. आई जास्त शिकलेली नव्हती पण शिक्षणाचे महत्त्व तिला पटलेले होते. त्यामुळे शिक्षण घेऊ पाहणाऱ्या गरजूंना मदत करणे हा तिच्या स्वभावातील महत्त्वाचे वैशिष्टे आहे. घरात परिस्थिती अत्यंत हालाखीची असताना देखील नातेवाईकांची मुलेबाळे आपल्याघरात ठेवून घेण्यास ती नेहमी तयार असे, 'माझ्या सहा मुलांत तू सातवा राहशील' असे म्हणते. त्यांच्या जातीपातीतील नसलेला एक आजारी म्हातारा घरात आल्यावर म्हणतो की 'काकी, मला सांजा खावासा वाटतो' आई त्याला सांजा करून देते.

त्या पिढीतील 'आई' च्या रूढ प्रतिमेची प्रतिनिधी तिचा श्रद्धाळूपणा, सोशिकपणा, व नियतीवर असलेला गाढ विश्वास बनवते. तो काळ असा होता की कुटुंबनियोजनाचा खास प्रसार त्या काळात झाला नव्हता. लग्न झाल्यावर बाळंतपणामध्ये एकामागे एक अडकणाऱ्या स्त्रियांचेच चित्र दर एका घरी पाहावयास मिळे. कादंबरीतील आईने आपल्या बाळंतपणामध्ये अनेक हाल सहन केले आहे. एका मुलाच्या पायाला झालेला त्वचारोग व दुसऱ्याच्या वाढलेल्या केसांमध्ये झालेला जीवघेणा घाव या प्रकारचे आजार तत्कालीन आरोग्य विषयक जागृती न झालेल्या समाजाचे प्रतिनिधी आहेत. गोरेगोमटे, धडधाकट जन्मलेले गुणी मूल दोन-अडीच वर्षाचे असताना अचानक मरून जाते. यामुळे आईच्या जिवाला चटका लागतो. आई म्हणते "बाळा माझ्या, का रे माझ्या पोटी जन्माला आलास व दोन वर्षाचा होऊन माझ्या मांडीवरच गेलास?."

आपल्या वडिलांचे व सासऱ्याचे अमाप कर्तुत्व आईने बघितले होते. त्यामुळे लेखकाच्या धीम्या व शांत स्वभावाच्या दादांचा तिला मनातून फार राग यायचा. त्यांची तीस- बत्तीस रुपयांची नोकरी, गावोगावी होणाऱ्या बदल्या तिला मुळीच आवडत नसे.

माडगूळकर सांगतात की 'आईचा जीवनप्रवास हा परिस्थितीच्या वाळवंटातून केलेला खडतर व लांबलचक असा प्रवास होता. लेखकाला काही सगळे पाहावयास मिळालेले नव्हते. बरेचसे त्यांनी कल्पनेने जाणून घेतले होते.' तर यावरून असे स्पष्ट होते की माडगूळकरांनी कल्पनेने जाणून घेतलेल्या

अनुभवांना व त्यांच्या आठवणींनी या कादंबरी मधील आईचे फक्त गोडवे गाणारे वाटत नाही तर ते भावस्पर्शी व वास्तवदर्शी वाटते.

## २. वडील (दादा)

आईच्या जिद्दी, कणखर व कष्टाळू व्यक्तिमत्त्वापुढे दादांची व्यक्तिरेखा काहीशी फिकट वाटते. त्यांचा पापभिरुपणा, साधेपणा व प्रामाणिकपणाने जगण्याची वृत्ती हे गुण मात्र महत्त्वाचे ठरतात. कादंबरीच्या सुरुवातीलाच आपल्या कुटुंबासह परगावी निघालेले दादा दिसतात. लेखकाने म्हटले की 'प्रवासात आपल्या वडिलांच्या वृत्ती नेहमीच जास्त उत्तेजित होत. ते जास्ती चपळ होत. जास्ती घाबरे होत व जास्ती बोलत. अंगात संचार झाल्यासारखे त्यांचे सगळे वागणे असे.' दादांना कामात बढती मिळाली. ते आता जेलर झाले होते. त्यादिवशी त्यांना खूप आनंद झाला. घरात काहीतरी गोड करा असे तो सांगतो. पण रोज उठून गुन्हेगारांची तोंड बघावी लागत असल्याने कधी आपल्याच भाऊबंदांपैकी कुणी बेड्या घालून समोर आले तर ते सहन होणार नाही म्हणून ती बढती ते स्वीकारत नाहीत. आई वडिलांना 'तुकारामबोवा' असे म्हणत. बाईआजीचा ज्या घरात मृत्यू होतो, आईला जिथे मोठा नाग दिसतो, भर मध्यानरात्री कपाळभर कुंकू लावलेली व केस मोकळे सोडलेली बाई दिसते तिथे आईला राहायचे नसते. आपल्या मुलाबाळांना घेऊन ती तिथे राहायला तयार नसते. पण दादांना ह्या सगळ्यात काही विशेष असे वाटले नाही. त्यांना वाटे घरावर काय आहे? आपण धीराने राहिले पाहिजे. आईच्या व दादांच्या स्वभावाचे विरोधी पैलू या प्रसंगामुळे प्रत्ययास येते.

'प्लेगच्या साथीत जेव्हा माणसे गाव सोडून दुसऱ्या ठिकाणी राहायला जातात, तेव्हा लेखकाच्या मावशीकडून आईला माळ्यावर राहायला या असा निरोप येतो. दादा मात्र म्हणतात, 'त्यांनी आम्हाला बोलावले हा त्यांचा मोठेपणा. त्यांना त्रास द्यायला नको.' या प्रसंगातून दादांची दोन वृत्ती पाहावयास मिळते. पहिली म्हणजे अतिसज्जन स्वभाव व दुसरी वृत्ती म्हणजे फार कष्ट न करता, व्यवहारी विचार न करता आला तो दिवस घालवायचा. आई पाचव्या बाळंतपणासाठी जेव्हा धाकट्या मुलीला घेऊन गावी जाते तेव्हा फक्त दादा व लेखक घरात असतात. त्या काळात लेखकाचे वडील दुपारी कचेरीतून घरी आले की दोघांपुरता स्वयंपाक करत असे. लेखकालाही काही गोष्टी शिकवायचे. असे म्हणतात की वडिलाचे व मुलाचे कधी पटत नाही. अशा काळात हे एक वेगळे चित्र या कादंबरीत

दिसून येते. दम्याचा त्रास जोरदार होत असतानाही नेटाने संसाराचा गाडा ओढणारा, शांत व प्रामाणिक असा माणूस त्यांच्या रुपात प्रत्ययास येतो.

साखरगडच्या देवस्थानचा वहिवाटदार म्हणून ज्यावेळी वडिलांची बदली होते. तिथे एक असा प्रसंग घडतो की तो दादांच्या स्वभावाचे दर्शन घडवणारा असतो. देवीचे एक पन्ना रत्न हरवला हे समजल्यावर त्यांची झोप उडते. आपल्यावर अफरातफरीचा आरोप येईल या कल्पनेने या सभ्य माणसाला कापरे भरते. शेवटी वडिलांचे काम गेल्यानंतर आई त्यांना आपल्याला मिळालेल्या माहेरचे घर व जमीन विकायला सांगते. तेव्हा ते राजी होत नाही. ते म्हणतात 'ते माझ्याने होणार नाही. ते सगळे तुझे आहे. स्त्रीधनाचा अपहार माझ्याकडून होणार नाही.' या उद्गारातून दादांचा सत्प्रवृत्त स्वभाव दिसतो. कर्त्या मुलांवर संसाराचा भार टाकून लेखकाचे आई-दादा फक्त सर्वात लहान मुलाला घेऊन पुन्हा आपल्या गावी वाड्यात राहायला जातात. तिथेही उर्वरित आयुष्य सुखीपणे घालवणे त्यांच्या वाट्याला येत नाही. गांधीवधानंतरच्या जाळपोळीत त्यांचा जेव्हा वाडा जाळला जातो, तेव्हा दादा खचून जातात. त्यातच आपल्या मोठ्या मुलाच्या मांडीवर डोके ठेवून ते मरण पावतात.

## ३. कविराज

गौण व्यक्तिरेखांमधले 'कविराज' ही महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. कादंबरीत जरी ही गौण व्यक्तिरेखा असली तरी ती तेवढीच महत्त्वाची अशी व्यक्तिरेखा आहे. कविराज हे व्यंकटेश माडगूळकरांचे मोठे बंधू अर्थात मराठी चित्रसृष्टी आणि भावगीतांचे विश्व गाजवून सोडणारे गजानन दिगंबर माडगूळकर होय. जन्मजात त्यांना उच्च बुद्धिमत्ता, जीवनमूल्यांचा संपन्न वारसा, संस्कार लाभलेले होतेच. सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत 'करूणाष्टक' या कादंबरीत या थोरल्या भावाचा उल्लेख अत्यंत आदराने व प्रेमाने केलेला प्रत्ययास येतो. नव्या गावी नोकरीसाठी आल्यानंतर घरामध्ये विचित्र, भीतीदायक घटना घडायलाच सुरू झाली. पहाटे काळोखात नाग घरात येणे, अमावस्या-पौर्णिमेला आईला होणारे भास, बाईआजीचे असहाय एकटे मरण ह्या सर्व घटना धडधडत्या काळजांनी माडगूळकरांच्या सगळ्या भावंडांनी ज्या दिवशी ऐकली, त्यादिवसापासून कविराजाने रात्रीचे घरी झोपणेच सोडून दिले होते. अभ्यासाच्या निमित्त घराबाहेर पडलेले त्याचे पाऊल गगनचुंबी कर्तुत्व झळकवल्याशिवाय घरात परत पडलेच नाही. प्लेगच्या साथीत जेव्हा गोळेबाईंना ताप येतो तेव्हा आई

त्यांना भेटायला जातात. तेव्हा हा लेखकाचा भाऊ रागाने म्हणतो 'तुम्हाला तुमच्या जीवाची पर्वा नाही पण आम्हाला आमची आई हवी आहे. असल्या आजारपणात भेटीचा उपचार पाळायचे काही कारण नाही.' यावरून थोरल्या भावाच्या व्यक्तिमत्त्वात वडीलपणाची धार असलेली दिसून येते. या बरोबरच मुलाचे मुलपणही दाखवणारे अनेक किस्से या कादंबरीत आहेत. माडगूळकरांना घारीच्या घरट्यात काय आहे हे बघण्यासाठी उंच झाडावर चढायला लावणे, मोराच्या पिसांच्या बक्षिसाची त्यासाठी लालच दाखवणे, घोड्याच्या शेपटीचा लांब केस ओढल्याबद्दल तिच्या लाथा तोंडावर घेऊन मार खाणे इत्यादी उदाहरणातून लहानपणाचे प्रसंग पुढे येतात.

साखरगड संस्थानाच्या राजवाड्यात राहत असताना देवीचा पन्ना रत्न हरवतो. त्या काळातच कविराजांचा मॅट्रिकचा निकाल लागतो व ते नापास होतात. आईने त्याच्याकडून खूप अपेक्षा ठेवलेली होती. नापास झाल्याचे ऐकून ती खूप निराश होते व त्याला फार टाकून बोलते की 'तुझ्या मनाला लाज कशी वाटत नाही? तिकडेच राहिला असतास, माधुकरी मागून जेवला असतास, रस्त्यावरच्या दिव्याखाली बसून अभ्यास केला असतास व पुढच्या वर्षी उत्तीर्ण होऊन आपल्या समोर आला असतास, तर मला तुझा अभिमान वाटला असता. आज मला तुझी लाज वाटते बघ. हे सगळे त्यांनी मुकाट्याने ऐकून घेतले. नेहमीप्रमाणे मित्राच्या घरी जाण्यासाठी बाहेर पडले, ते परत घरी आलेच नाही. घरातून बाहेर पडून कोल्हापूर येथे सिनेमा स्टुडिओत नोकरीला लागतात. 'काही तरी कर्तबगारी कलेच्या क्षेत्रातच करून दाखवीन अशी त्यांची इच्छा होती. या एका चांगल्या घटनेनंतर वडिलांना सरकारी नोकरीतून चमत्कारिक धोरणामुळे कामावरून काढून टाकण्यात येते. तेव्हा आई आपल्या या मुलाला पत्र पाठवते ते वाचताच तो धावून येतो. आपली वडीलपणाची जबाबदारी निभावतो. छोट्या भूमिका, सिनेमा स्टुडिओ, गावोगावचे कार्यक्रम करु लागतो.

## ४. बाईआजी

ही लेखकाच्या वडिलांची आई असते. लेखक तिला बाईआजी असे म्हणतो. म्हातारपणात दुसऱ्या गावात आपला जीव रमवणे अवघड झालेली ही वृद्धबाई मुलाच्या नोकरीच्या गावी नाईलाजाने जाते. तेथील अनोळखी परिसर, माणसे यात तिला एकटेपणाची भावना निर्माण होते. गावात असताना ती पहाटे लवकर उठून जात्यावर दळायची, दुपारी रानातून पात्रा, हरबरा, करडा, घोळ ह्या आपोआप

उगवणाऱ्या भाज्या आणायची. जेव्हा दादा तिला विचारायचे 'काय होते का तुम्हाला? कुणाशी बोलत का नाहीस? तेव्हा सून जवळ नाही हे बघून 'ती गावी जावे वाटतं' असे म्हणायची. यावरून तिला सुनेची भीती वाटते हे स्पष्ट होते. नव्या गावात नवीन माणसे जोडण्यास आई दंग होते पण बाईआजी मात्र एकटी होते. 'सोडव' असे ती देवाला साकडं घालत राहते. एका पावसाळ्यात तिला अतिसार झाला व त्यातच घरात कोणीही नसताना तिचा मृत्यू होतो. वडिलांनी काढलेले उद्गार इथे महत्त्वाचे ठरते. ते म्हणतात 'इतके गोत असून अखेरच्या क्षणी तिच्यापाशी कोणी नव्हते. मुलगा, सून, नातवंडे नव्हते. बेवारशासारखी आई एकाकी गेली. आपल्या गावात, आपल्या घरात राहिली असती, तर आणखी दहा वर्ष जगली असती.' आजी ज्या जागी मरण पावली तेथे आई जोंधळ्याचे पीठ पसरते व पणती लावते. तिसऱ्या दिवशी त्या पिठावर चिमणीचे पाय उमटलेले बघताच आई म्हणते 'अश्राप म्हातारी! देवाने तिला चिमणीच्या जन्माला घातले.'

याशिवाय नागोपंत, लहानपणी दोन्ही पायांना त्वचारोग झालेला बारीकराव, लेखकाच्या दोघी बहिणी यांची चित्रणही या कादंबरीत पाहावयास मिळते, मात्र ती आईच्या भोवतीच फिरताना दिसतात. कविराजला सोडून कुणाही भावंडांची नावे लेखक सांगताना दिसून येते नाही. तसेच कारंडेमामी, तांबे मास्तर, गोळे पती- पत्नी याही गौण व्यक्तिरेखा कादंबरीत आलेल्या आहेत.

### ३.२.३ करुणाष्टक कादंबरीतील वातावरण

व्यंकटेश माडगूळकरांची करुणाष्टक ही ग्रामीण, प्रादेशिक कादंबरी असल्याने तिला ग्रामीण व प्रादेशिकतेचे रूप आलेले आहे. या कादंबरीतून खराखुरा, अस्सल, जातिवंत असा अनुभव प्रत्ययास येतो. त्यामुळे घटना- प्रसंगांना पोषक असे वातावरण माडगूळकरांनी निर्माण केलेले दिसून येते. ज्यावेळी लेखकाचे वडील कुटुंबासह नोकरीच्या गावी येतात तेव्हा लेखकाची आजी अबोला धरते कारण तिच्या ओळखीचे, गावातल्या म्हाताऱ्या बायकांचे, गावकऱ्यांचे चेहरे तिला दिसेनासे झाले होते. याचे वर्णन पृष्ठ क्रमांक १० वर सविस्तर केलेले पाहावयास मिळते.

ज्यावेळी लेखकाच्या आईला घराच्या दारावर साप दिसतो, बाईआजीचे असहाय एकटे मरण, अमावस्या-पौर्णिमेला आईला होणारे भास त्याच्यामुळे लेखकाच्या थोरल्या भावावर होणारे परिणाम यात दिसून येते. या प्रसंगांमुळे भयावह वातावरण प्रत्ययास येते. लेखकाचा थोरला भाऊ घर सोडून

आपल्या मित्राच्या घरी राहावयास जातो. आई आजीला घरात ठेवून बाहेरून कुलूप घालून पाणी आणण्यासाठी जाते त्याचदरम्यान आजीचा मृत्यू होतो. त्यामुळे आईला पश्चाताप झालेला तिच्या संवादावरून स्पष्ट होते. ती म्हणते 'अरे, तुम्हा चार कच्च्या-बच्चांच्या व्यापातून त्या कष्टी जीवकडे बघायला सवड कशी झाली नाही. अरे, शेवटच्या आजारात सुद्धा घडावी तशी त्या वडीलमाणसाची सेवा हातून घडली नाही. कशी बुद्धी झाली आणि घराला कुलूप लावून पाण्याला गेले.' हे आईने काढलेले उद्गार हृदयाला स्पर्श करून जातात. तसेच आईचे व तिच्या सगळया मुलांचे जगणे, आजार, मुलांमुळे आईला होणाऱ्या वेदना अशा विविध प्रकारच्या घटना व प्रसंगांच्या माध्यमातून लेखकाने समर्पक असे वातावरण निर्माण केलेले आहेत.

महात्मा गांधींच्या खुनानंतर झालेल्या दंगलीमुळे, जाळपोळीमुळे ब्राह्मण समाजाला सोसाव्या लागलेल्या त्रासाबद्दल सांगताना, वावटळ यावी तशी ब्राह्मणांच्या विरुद्ध असलेले लोक येतात व त्यांची घरे लुटतात, जळतात ह्याचे वर्णन करताना भयावह वातावरण निर्माण केलेले आहे. लेखकाचा थोरला भाऊ परीक्षेत नापास झाल्यामुळे आई त्याला खूप काही बोलते. त्यावेळी वाचकाचे तसेच बोलून झाल्यावर आईलाचे देखील हृदय हादरून जाते.

## ३.२.४ करुणाष्टक कादंबरीची भाषा

व्यंकटेश माडगूळकरांनी 'करुणाष्टक' या कादंबरीत निवेदनासाठी प्रमाण मराठी भाषेचा वापर केला आहे तर संवादासाठी बोली भाषेचा वापर केला आहे. उदाहरणार्थ: "चुतडीच्च्यांनो, पानं खायाला सोकला होय? मोठेपणी काय रंडीखान्यात काम बघणार?."[२०] या कादंबरीच्या भाषेत सहजता दिसून येते. व्यंकटेश माडगूळकर यांच्या लेखनामध्ये स्वाभाविकता, सहजता दिसून येते. माडगूळकरांनी केलेल्या पात्र वर्णनामुळे ती सगळी व्यक्तिरेखा वाचत असताना जिवंत असल्याची वाटतात. अनेक ठिकाणी लेखनातली वाक्ये अगदी काव्यमय असल्याची दिसून येतात. उदाहरणार्थ: गांधींच्या हत्येनंतर ते म्हणतात "जमाव हा रामायणातल्या कबंध राक्षसासारखा असतो. डोकं नाही, छातीवर डोळा- तोही एकच. पाय नाहीत. दोन्ही हात मात्र सहस्त्र योजनं पोहोचू शकतील असे लांब."[२१] तर आईच्या आयुष्याबद्दल सांगताना ते म्हणतात 'वाट चालताना ओझे वागवणे हे स्त्रीच्या भाळी अगदी इतिहासपूर्व काळापासूनच आले आहे.'

अनेकदा क्रियापदांचा वापर टाळणे, लहान लहान वाक्ये रचना अशा लेखनशैलीमुळे गद्यदेखील लयबद्ध होते. उदाहरणार्थ: जेव्हा लेखक आपल्या थोरल्या भावाच्या होणाऱ्या पत्नीला पाहतो तेव्हा असे वर्णन आले आहे की "मोठे मोठे केस, जाड वेणी पाठीवर. फुगीर गालांवर भुरुभुरू बटा, गोरा-गोरा रंग आणि गुलाबी रंगाची नऊवारी साडी नेसलेली."[२२] घराच्या दारावर रात्रीच्या वेळी जेव्हा आईला साप दिसतो तेव्हा त्याचे वर्णन "ढणाढणा जळणारी चिमणी. भिंतीवरच्या गडद काळ्या सावल्या आणि छपरातून खाली लोंबणारा हा काळा- चांगला पुरुषभर उंचीचा."[२३] मोजक्या शब्दात ठसठशीतपणे एखादे चित्र डोळ्यांपुढे उभे करणे हा माडगूळकरांच्या चित्रदर्शित्व या शैलीचा महत्त्वाचा गुण आहे. तसेच प्रतिमांचा वापर केला आहे. उदाहरणार्थ: "मावशी नेहमीच मोगऱ्याच्या फुलासारखी ताजी दिसायची."[२४] लेखकाचा भाऊ दुसऱ्या गावात असतो. त्यामुळे संवादासाठी पत्राचा वापर केला आहे. इंग्रजी तसेच हिंदी भाषेचा वापर यात केला आहे. उदाहरणार्थ: "अरे बाय द वे, तुला एक किंचित सीरिअस बातमी द्यायची आहे."[२५] "सावकाशपणे त्यानं मजकूर वाचला, "मदर एक्सपायर्ड टुडे."[२६] "शिवाय त्यांची बिबी, बालबच्चे इथं नव्हते."

## ३.३ 'वावटळ' कादंबरी

१९८५ साली व्यंकटेश माडगूळकर यांची 'वावटळ' ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. ही कादंबरी महात्मा गांधींच्या खुनानंतर ब्राह्मणेत्तर समाजाने अनावर होऊन महाराष्ट्राच्या शहरात तसेच खेड्यापाड्यात ब्राह्मणांची घरे लुटली, जाळपोळ केली, व त्यात कित्येकजणांची हत्याही केली अशा विषयाला अनुसरून व्यंकटेश माडगूळकरांनी वावटळ ह्या कादंबरीचे लेखन केले आहे. एकंदरीत वधानंतर निर्माण झालेला परिणाम यात मांडला आहे.

### ३.३.१ वावटळ कादंबरीचे कथानक

महात्मा गांधी आभाबेन आणि मनू या आपल्या नातींच्या खांद्यावर हात घालून ३० जानेवारी १९४८ रोजी सायंप्रार्थनेसाठी जात असताना नथुराम विनायक गोडसे नामक एका ब्राह्मण माणसाने त्यांच्या पुढे उभे राहून त्यांच्यावर तीन गोळ्या झाडल्या. 'हे राम!' असे उद्गार काढत महात्मा गांधी तिथेच खाली कोसळून त्यांचा मृत्यू होतो. एका ब्राह्मण माणसाने भारतीय राष्ट्रपुरुषाला मारले हे कळल्यावर ब्राह्मणेत्तर लोक क्रोधीत झाले. पुण्या शहरात दंगल सुरू झाली. ब्राह्मणांची घरे लुटण्यात

आली, घरांना जाळण्यात आले. ही लुटालूट-जाळपोळ फक्त शहरापुरतीच मर्यादित न राहता खेड्यापर्यंत पोहोचली. पुणे शहरापासून ही दंगल ह्या कादंबरीच्या नायकाने म्हणजेच शंकरराव कुळकर्णी, त्याचे दोन मित्र यशवंत देशपांडे व गोपू देशपांडे यांनी अनुभवलेली होती. पुणे ते नांदवडी गावापर्यंत गावागावातून ब्राह्मण लोकांची घरे पेटलेली त्यांनी पाहिलेली होती. शंकरराव, यशवंत व गोपू जातीत ब्राह्मण असल्यामुळे जीव मुठीत घेऊन त्यांनी पुणेहून नांदवडीपर्यंतचा प्रवास केला. भीतीचे वातावरण गावो-गावी पसरले होते. शंकरराव व यशवंत एकाच सामाजिक दर्जाचे असतात. शंकररावचे वडील कारकून व यशवंतचे वडील मास्तर असतात. गोपू मात्र वकिलाचा मुलगा असतो.

सर्व्हिस मोटाराने ते तिघेही सारंगपूरला उतरतात. तिथे गोपूच्या मावशीचा वाडा असतो. ते तिघे तिथे जातात. गोपूचा मावसा सखाराम ब्राह्मण हा संघ कार्यकर्ता असतो. पुढे मोटार स्टँडवर या तिघांच्याही पिशव्या तपासल्या जातात कारण हे तिघेही एका ब्राह्मण वाड्यातून बाहेर पडलेले असतात. त्यांचा प्रवास नांदवडीकडे जाण्यास पुन्हा सुरू होतो. शिवघाट मागे टाकून सोमेवाडी लागण्याअगोदर मोटार थांबवण्यात येते. आबासाहेब देशमुख सोमेवाडीत दंगल सुरू असल्याचे सांगतो व गाडीत असलेल्या ब्राह्मण लोकांना येथे उतरावे लागेल असे सांगल्यावर मनात नसताना, नाइलाजाने तिघांनाही खाली उतरावे लागते. वेळ संध्याकाळची असल्याने आता कुठे जायचे असा प्रश्न त्यांच्या पुढे निर्माण होतो. ते कुरवंडी गावात जायचे ठरवतात. कुरवंडी गावात जाणारी मोटार चालक सावंत ड्रायव्हर हा यशवंताच्या ओळखीचा असतो. ओळख असूनही ड्रायव्हर गाडी थांबवत नाही कारण यशवंत ब्राह्मण जातीतला असतो. येथे स्वतःचा जीव राखण्यासाठी, स्वतःच्या स्वार्थासाठी आपल्याच परिचयातील लोकांना मदत न करणारी वृत्ती स्पष्ट होते. आता आसपास असलेला गाव म्हणजे बेलकरंजी. वाट ओळखीची नव्हती. त्यात रात्र असल्याने चांदण्याच्या प्रकाशाचा आधार घेऊन अनोळखी रस्त्याने ते चालत राहिले. तिथे पोहोचण्यासाठी त्यांना तीन- चार मैलाचा चालत प्रवास करावा लागला. गावात असलेल्या मारुती मंदिराच्या जोत्यावर ते तिघेही बसून राहिले. गावातील लोकांना मंदिराच्या जोत्यावर कोणी तरी बसल्याचे समजल्यावर ते लोक चौकशी त्यांच्याकडे येऊन विचारपूस करू लागले. त्या लोकांमध्ये यांना एक माणूस परिचयाचा भेटला. महादू न्हाव्याने त्या तिघांनाही आपल्या सासुरवाडी आणले. त्यांना खायला दिले व झोपायला सांगून आपण न झोपता उशाशी बसून राहिला. कारण ते अतिशय भ्यालेले होते. दुसऱ्या दिवशी पहाटे महादू त्यांना गावाबाहेर पोहोचवून आला. सोमवाडी,

वळवंडे, नांदवडी इत्यादी गावातील ब्राह्मणांची घरे पेटविण्यात आली होती. शंकर व त्याच्या मित्रांना गाव दिसले की तेथून येणारा धूर दिसायचा. यशवंत व गोपू नांदवडे गावचे रहिवासी होते तर शंकरराव चोपडी गावचा रहिवासी होता. ते नांदवडीला आले तरी त्या ठिकाणचे वातावरण सुरळीत झाले नव्हते. अद्याप घरे पेटतच होती. प्रथम ते गोपुच्या मळयात गेले. तेथेही जाळपोळ चालूच होती. तेथेही जीव वाचवण्यासाठी ते लपून बसले. आलेले लोक परतले असे एका मेंढक्याने त्यांना सांगितले तेव्हा त्यांना बरे वाटले व त्या मेंढक्याने त्यांना चटणी भाकरी खायला दिली. गोपू तेथून सरळ आपल्या घरी गेला. शंकरराव व यशवंत यशवंतच्या घरी गेले. यशवंतचे घर लुटण्यात आले होते. घरात कोणी नसल्याने शंकररावांनी व त्याने शेजारी जाऊन चौकशी केली. त्यावर गावातील भगुराव म्हणाला ‘आमची आम्हाला पंचाईत पडलेली आहे. तुझ्या घरच्या माणसांचे कोणी बघितल?’ यावरून त्या दरम्यान झालेली त्यांची अवस्था स्पष्ट होते.

तीन दिवस शंकरराव यशवंतच्या घरी थांबून चौथ्या दिवशी चोपडीला जाण्यास बाहेर पडला. नायकाला असे वाटत होते की त्याचे घर सुरक्षित असेल कारण त्याचा कुटुंब कुणाच्या अध्यात ना मध्यात होता, सावकारी, जोरजुलूम नाही. त्यांचे कुणाशी वैरच नव्हते. तसेच कसल्याही राजकारणाशी त्यांचा संबंध नव्हता. चोपडी या गावात पोहोचतात त्याच्या लक्षात येते की त्याचेसुद्धा घर लुटण्यात व जाळण्यात आले आहे. त्याचे घर जळून खाक झाले होते. नायकाचे वडील विनायकराव गाव सोडून मुंबईला आपल्या थोरल्या मुलाकडे राहायला जातात. गोपूचे वडील नांदवडीतच राहतात. यशवंतचे आई-वडील व अण्णा तीन वर्षाच्या कालावधीत वारतात. अण्णांची मुलेबाळे व बायको पंढरपूरला वेगळे बिऱ्हाड करून राहतात. त्यांचे घर, जागा धोंडोपंत वकिलांनी घेतली. धोंडोपंत वकिलाच्या मृत्यूनंतर गोपू गावात असलेला मळा, घरे, शेतजमिनी विकून पुण्यात मोठा बंगला बांधून राहतो. शंकराचे आई- वडील मुंबईतच वारतात. रामचंद्र व दिनकर असे त्याचे भाऊ चोपडी गावातच राहतात. शंकर पुण्याला राहत असतो. वधानंतर निर्माण झालेल्या परिणामामुळे ब्राह्मण समाजातील अनेक कुटुंब शहराकडे वळली. शहरात जाणे ज्यांना शक्य झाले नाही ते गावातच राहिले. त्या काळात त्यांचे जगणे असुरक्षितच होते. असे भयावह वास्तव व्यंकटेश माडगूळकरांनी ‘वावटळ’ मध्ये बारीकसारीक घटनांच्या माध्यमातून चित्रित केले आहे.

## ३.३.२ वावटळ कादंबरीतील व्यक्तिरेखा

ह्या कादंबरीमध्ये एकच एक अशी व्यक्तिरेखा केंद्रस्थानी नसून, अनेक व्यक्तिरेखांच्यामाध्यमातून कथानक पुढे सरकत असल्याचे दिसून येते.

## १. शंकरराव कुळकर्णी

शंकरराव कुळकर्णी हा ह्या कादंबरीचा नायक. व्यंकटेश माडगूळकरांनी वावटळ कादंबरीतील कथा शंकरराव कुळकर्णी या तरुण मुलाच्या तोंडून ऐकविली आहे. शंकरराव हा ब्राह्मण जातीतील असतो व  चोपडी गावचा रहिवासी असतो. मासिकांतून, साप्ताहिकांतून लिहिणारा तो एक लेखक असतो. ह्या माध्यमातून मिळणाऱ्या अल्प पैशातून तो स्वतःचे चरितार्थ चालवत असतो. शंकरराव हा विनायक कुळकर्णी या संस्थानातील निवृत्त कारकुनाचा मुलगा असतो. तो पुण्यात यशवंताबरोबर त्याच्या हॉस्टेलच्या खोलीत राहणारा असतो. महात्मा गांधींच्या खुनानंतर पुण्यात छत्तीस तासांची कर्फ्यू ऑर्डर जारी झाली होती. शंकरराव व त्याच्या मित्रांना खोली बाहेर पडता येत नव्हते, त्यामुळे ते आपल्या गावात जायचे ठरवितात. वाहने मिळण्यास कठीण होते त्यामुळे ते चालत जायचे ठरवतात. रस्त्याने चालत जात असताना शंकररावच्या चप्पलचा अंगठा तुटतो. तो ती चप्पल पिशवीत घालून अनवाणीच चालू लागतो. विविध ठिकाणी ब्राह्मणांची घरे जळालेली बघून त्याचे मन उदास होत होते. हे तरुण वयातील मुले स्वतःचा जीव वाचवीत प्रवास करत होते. शंकरराव नांदवडीत यशवंताच्या घरी तीन दिवस राहतो. त्याला असे वाटत होते की आपले घर कुणाच्या अध्यात ना मध्यात होते. गावातील कोणत्याही व्यक्तीबरोबर आपले वैर नाही त्यामुळे आपले घर लोकांनी जाळले नसावे. चोपडीत आल्यावर शंकरराव प्रथम आपल्या वाड्यात जातो. वाडा जळून त्याचे राख- राख झालेले असते. पाटलाच्या वाड्यात आश्रयासाठी त्याचे कुटुंब गेलेले असते. गावातील ब्राह्मणांची घरे पेटवून दिल्यामुळे उघड्यावर पडलेल्या कुटुंबीयांना शंकरराव भेटतो, त्यांची विचारपूस करतो. त्यांचे मन हलके करतो. शेवटी आपला गाव सोडून, कुटुंबाबरोबर पुण्याला स्थायिक होतो. त्याची मुले गावात आल्यावर सगळ्यांना आम्ही पुणेकर म्हणून सांगतात. त्याचे नायकाला खूप दुःख होते.

## २. यशवंता देशपांडे

यशवंता देशपांडे हा बाबा मास्तर यांचा मुलगा असतो. संस्थानच्या इस्टेटीचा कारकून म्हणून तो पुण्याला काम करीत असतो. पुण्याला असलेल्या एका वसतिगृहाच्या खोलीत तो राहणारा असतो. बाबा मास्तर निवृत्त झाले होते, त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती हलाकीचीच असते. ज्यावेळी जाळपोळीत त्याचे घर लुटण्यात येते त्यावेळी त्याचे आई-वडील पंढरपूरला गेले होते. पंढरपूरला यशवंताचा एक मोठा भाऊ होता. सगळयात थोरला भाऊ व त्याची पत्नी नांदवडीस होते. त्यांनी आयुष्यभर कष्ट करून उभा केलेला प्रपंच त्यांचा वाडा लुटल्यामुळे एका दिवसाच्या आत नष्ट झाला होता. ज्यावेळी पुण्याहून यशवंता आपल्या मित्रांबरोबर गावात येतो तेव्हा आपल्या घरातील कोणी दिसत नाही म्हणून शेजाऱ्याशी विचारपूस करतो तेव्हा शेजारचा भगूराव म्हणतो की ‘आमची आम्हाला पंचाईत पडली आहे. तुझ्या घरच्या माणसांचे कोणी बघितले?.’ यावरून असे स्पष्ट होते की जाळपोळीच्या वेळी सगळयांच्याच मनात भीतीचे  वातावरण निर्माण झाले होते व गावातील लोक आपल्या घरातील माणसांशिवाय इतर आपल्या शेजारी- पाजाऱ्याची विचारपूस करायचे विसरून गेले होते. यशवंताचे दादा, वहिनी जाळपोळीनंतर गाव सोडून पंढरपूरला जातात. गावात असलेले त्यांचे घर, जागा धोंडोपंत वकील विकत घेतो. शेवटी यशवंताही पुण्याला जातो.

## ३. गोपू देशपांडे

गोपू देशपांडे हा धोंडोपंत वकिलांचा मुलगा असतो. तो पुण्याला राहून लॉ चा अभ्यास करीत असतो. शंकरराव, यशवंता व गोपू यापैकी गोपू हा श्रीमंत घराण्यातील मुलगा असतो. त्याचे वडील वकील असतात. त्यांच्याजवळ खूप पैसा असतो. त्यामुळे गोपूच्या वागण्यात श्रीमंतीचा एक मिजास असतो. गोपूला सिगारेट ओढण्याची सवय असते. खूप महाग सिगारेट घ्यायचा ती वरचेवर ओढत रहायचा. किमतीने खूप उंची प्रकारचे कपडे तो परिधान करायचा. त्याच्या पायातील बूटही महाग होते. त्यांचा शेतमळा होता. तिथे काम करण्यासाठी गडी माणसे होती. पुण्याहून गावात प्रवास करीत असताना गोपूलाच आपल्या वडिलांची जास्त काळजी असल्याची दिसून येते होती. त्याला असे वाटत होते की ‘जाळपोळीच्यावेळी पूर्वीची दुश्मनी काढून कोणीतरी आपल्या वडिलांना मारील असे वाटण्याचे कारण म्हणजे सावकारीमुळे पुष्कळ लोकांचा गोपूच्या वडिलांवर राग होता, लोकांची घरे, जमिनी त्यांनी अन्यायाने घेतली होती, त्यामुळे ही वेळ साधून दुखावलेले लोक सूड घेतील असे त्याला कायम

वाटायचे. गोपूच्या तोंडी आलेले वाक्ये लक्षात घेणे सारखे आहेत. तो म्हणतो की 'माणूस जर श्रीमंत असला तर तो गरिबांचा वैरी ठरतो. मग त्याची इच्छा नसो वा असो, खायला ज्यांना मिळत नाही, ते नेहमीच खुनशी डोळ्यांनी तुमच्या भरल्या ताटाकडे पाहत असतात. संधी मिळाली की त्या ताटात माती फेकायला ते पुढे होतात.' गोपूचे वडील सुखरूप होते पण घर मात्र लुटले होते. गोपू पुण्यात वकिली करीत असतो. वडील वारल्यानंतर नांदवडीत असलेली शेतजमिनी, घरे, वाडा, जागा हे सर्व विकून पुण्यात मोठा बंगला बांधून राहतो.

## ४. विनायकराव कुळकर्णी

विनायकराव कुळकर्णी हे या कादंबरीतील नायकाचे वडील आहेत. संस्थानामध्ये कारकून म्हणून नोकरी करीत होते. आयुष्यभर प्रामाणिकपणे नोकरी करून थोडे- थोडे पैसे साठवून त्यांनी आपल्या कष्टाच्या पैशाने गावात जमीन घेऊन स्वतःचा वाडा उभा केला होता. गावातील लोकांबरोबर त्यांचा संबंध चांगला होता. घर नेहमी धान्याने भरून गेलेले असायचे. त्यांची शेती होती व त्यामधूनच त्यांचा घरचा प्रपंच चालत असायचा. त्यांचा थोरला मुलगा रामचंद्र गावात शिक्षक होता. जाळपोळीत त्यांचे घर लुटण्यात येते व त्यानंतर ते घर पेटविण्यात येते. त्यामुळे त्यांच्या मनात भीती निर्माण होते. गावात आता त्यांचे काही राहिलेले नव्हते. त्यामुळे ते मुंबईला आपल्या मुलग्याकडे जाण्याचा निर्णय घेतात. गावातील लोकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यामुळे मुंबईला जाण्याअगोदर ते गावातील लोकांना भेटून येतात. तुकदेव पाटील, भानुदास कारंडे, काळा महादेव, विष्णुदास सोनार हे काही लोक गाव सोडून जाऊ नका अशी समजूत घालण्यासाठी त्यांच्याकडे आलेली असतात. ते विनायकराव कुळकर्णींना विचारतात की 'तुम्ही चाललात गाव सोडून?' तेव्हा कुळकर्णी त्यांना सांगतात की 'गाव सोडून कुठे जाणार? कुठेही गेले तरी माती इथेच पडणार.' या त्यांच्या वाक्यावरून गाव सोडून जात असताना त्यांना झालेल्या वेदनेची जाण करून देते. दुसऱ्या दिवशी गाव सोडून जाताना देखील ते लोक त्यांना गावात राहण्याची विनंती करतात पण ते काही ऐकत नाही. गावकरी त्यांना पोहोचवायला लांबपर्यंत येतात. शेवटी त्यांचा मृत्यू मुंबईलाच होतो.

## ५. धोंडोपंत वकील

धोंडोपंत वकील हे गोपूचे वडील असतात. वकिलाचा व्यवसाय करून त्यांनी भरपूर पैसे कमवलेले असतात. त्यांनी सावकारीही केलेली असते. गरिबांचे शोषण करून त्यांनी अनेकांच्या जमिनी आपल्या ताब्यात घेतलेल्या असतात. ह्याच कारणामुळे लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल क्रोध निर्माण झाला होता. यामुळे गोपूला आपले वडील गावात सुरक्षित नाहीत असे वाटायचे. जाळपोळीच्या वेळी देखील चातुर्याने त्यांनी पैसे, दागिने जे काही घरात होते ते विहिरीत टाकून वाचविले होते. स्वतःचे घर जाळण्यापासून वाचविण्यासाठी थोडे पैसे असलेला डबा धोंडोपंत वकिलांनी त्या लोकांना दिले होते. यशवंताचे घर शेवटी त्यांनी विकत घेतले. शेवटपर्यंत ते नांदवडीतच राहतात.

'वावटळ' कादंबरीचे केंद्रस्थान एक गाव नाही. त्यामुळे पुणे ते चोपडीपर्यंत प्रवास करत असताना वरील व्यक्तिरेखांबरोबर अनेक इतर व्यक्तिरेखा कथानक पुढे सरकत असताना पहावयास मिळतात. कादंबरीच्या कथानकाला सुरुवातच नथुराम गोडसे नामक ब्राह्मण माणसाने गांधीजींचा खून केल्याचे समजल्यावर जनक्षोभ उसळल्याने होतो. या कादंबरीतील इतर व्यक्तिरेखाही आपल्या व्यक्तिमत्त्वाचा स्वतंत्र ठसा उमटविताना दिसतात. गोपूचा मावसा, मावशी, नाना, शंकररावचे भाऊ रामचंद्र व दिनकर, आबासाहेब देशमुख, रंगभट, कोंडीकाका, बाजीराव, सीताबाई, धोंडू आजी, रमा काकू, ईश्वर रामोशी, श्रीपती रामोशी, चंद्रू, तुकदेव पाटील, भानुदास कारंडे, काळा महादेव, विष्णुदास सोनार अशा अनेक व्यक्तिरेखा या कादंबरीत आल्या आहेत. कादंबरीतील नाट्य यामुळेच अधिक प्रभावीपणे व्यक्त झाले आहे व वास्तव जीवनावर अधिक प्रकाश पडताना दिसून येतो.

### ३.३.३ वावटळ कादंबरीतील वातावरण

महात्मा गांधींचा खून झाल्यानंतर महाराष्ट्रात निर्माण झालेल्या परिस्थितीचा पडसादाचे चित्रण या कादंबरीत केले आहे. महाराष्ट्राचे सांस्कृतिक केंद्र पुणे असल्यामुळे प्रथम पुणे या ठिकाणी दंगल सुरू होते. गांधींचा खून करणारा ब्राह्मण समाजातील असल्यामुळे दंगलीला सुरुवातच ब्राह्मण समाजाविरुद्ध झाली. गांधीसारख्या लोकप्रिय माणसाचा खून झाल्यामुळे सामान्य लोकामध्ये चीड निर्माण झाली. शहरातून जसा हा संताप व्यक्त होत होता तसेच खेड्यापाड्यातही त्याचा परिणाम दिसू लागला होता. लोकांना डोक्याचे केस काढण्याचे सांगण्यात आले होते, म्हणजे एका अर्थी महात्मा गांधींच्या खुनानंतर लोकांना सुतक पाळण्याचे सांगत होते. ब्राह्मण समाजातील लोकांची घरे लुटली, जाळली, काही

लोकांची हत्या केली. घरे लुटणे, जाळणे हा बेत ब्राह्मण लोकांपूर्तीत आखलेला. आयुष्यभर मेहनत करून उभे केलेले प्रपंच धडाधड पेटत होते. भयावह परिस्थितीचे चित्रण यात आले आहे. दंगलीमुळे वडील माणसांना नोकरी –धंद्यावर, मुलाबाळांना शाळेला जाता येत नव्हते. कुठेच बाहेर पडता येत नव्हते. संध्याकाळ झाली तरी रस्ते खाली होते, बागा मोकळया होत्या, हॉटेल, थिएटर बंदच होते. ह्या दंगलीचा परिणाम शाळा-महाविद्यालयांच्या मुलांवर देखील झाला होता. एरवी मुलांचा होणारा गोंधळ, वेड्याविद्र्या आवाजाने गीतांच्या ओळी म्हटल्या जायच्या, मुले एकमेकांना चिडवायची हे सगळे नाहीसे झाले होते. ब्राह्मणांची घरे लुटण्यात, जाळण्यात येत आहे अशी बातमी ऐकल्यानंतर काही लोक तर बेशुद्ध पडले होते.

दंगलीचा परिणाम पुणे ते इतर विविध खेड्यांपर्यंत पोहोचल्या कारणाने नायक व त्याचे दोन मित्र मोटारीत प्रवास करत असताना देखील अनेक लोक दंगलीबद्दल बोलत होते. ते बोलत असताना एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट स्पष्ट होते की जाळपोळ, लुटालूट करणाऱ्या लोकांना जर त्यावेळी ब्राह्मण समाजातील लहान मुले मिळाली असती तर लहान वयोगटातील मुले आहेत असे समजून त्या लोकांनी त्यांना सोडले नसते. इतके भयावह वातावरण गांधींच्या खुनामुळे निर्माण झाले आहे. हे तिघेही प्रवास करताना गंभीर खळबळीचे वातावरण आहे तरी या तिन्ही मित्रांना त्यांच्या परिचयातील गावात पोहोचले की त्यांना अनेक चांगल्या आठवणी आठवायच्या व परत असले तसे भीतीदायक वातावरणात समरसून जायचे. शिवघाटाची वेडीवाकडी वळणे काढून जेव्हा मोटार खाली उतरते तेव्हा आबासाहेब देशमुख नावाचा एक व्यक्ती मोटार थांबवतो व सांगतो की जर कोणी ब्राह्मण मंडळी असेल तर इथेच उतरावे. सोमेवाडीत दोन- चार माल ट्रक भरून लोक आले आहेत. ते लोक घरे जाळतात, लुटतात. तशात जर त्यांनी तुम्हाला बघितले तर बरे-वाईट झाल्याशिवाय राहणार नाही. हे तिघेही लहान असल्यामुळे त्यांना काय करावे हे समजेना. ड्रायव्हरचा स्वार्थपणा या क्षणी दिसून येतो. तो त्यांना म्हणतो की 'तुम्ही खाली उतरा. एवढे सांगतात ते कळत नाही का तुम्हाला? तुमच्यामुळे ते लोक माझी गाडी जाळतील.'

शंकरराव, यशवंता व गोपू यापैकी गोपूच्या तोंडावर या दंगलीबाबत जास्त भीती असल्याचे दिसून येते. याचे कारण म्हणजे गोपूचे वडील वकील होते. सावकारीमुळे जास्त लोकांचा त्यांच्यावर राग होता. लोकांच्या जमिनी, घरे त्यांनी अन्यायाने घेतली होती. गोपू आपल्या मित्रांना सांगतो की 'ही वेळ

साधून दुखावलेले लोक बदला घेतील. आमचे घर जाळले, लुटले, तरी मला काही वाटणार नाही. पण….' या पुढे गोपू काहीच बोलला नाही व बोलून दाखविणेसुद्धा जमले नाही. दंगलीचा चांगलाच परिणाम त्याच्यावर झालेला आहे. आबासाहेबांनी त्या तिघांनाही बसमधून उतरवायला सांगितल्या नंतर ते कुरवंडीला जायचे ठरवतात. कुरवंडीला जाणाऱ्या मोटारीचा ड्रायव्हर यशवंताचा ओळखीचा असतो पण या दंगलीच्या वातावरणामुळे तो त्यांना बसमध्ये घेत नाही तेव्हा यशवंता म्हणतो की 'आम्ही ब्राह्मण असल्यामुळे इथेही जात आडवी आली म्हणून त्याने आम्हाला मोटारीत घेतले नाही.' कुरवंडीला गेल्यावर तेथील लोकं यांची विचारपूस करण्यासाठी आले. त्या गावातील लोकांच्या बोलण्यावरून त्यांना समजले की नांदवडीला खूप गोंधळ झाला आहे, आठ लोकांचा खून झाला आहे, गांधीजींना मारल्यामुळे दुनिया बामणांवर कशी बिघडलेली आहेत, बामण लोकं कशी भिऊन गेली आहेत. ते तिघेही जण गप्प राहून फक्त ऐकत होते. ह्या सगळ्यांमुळे त्यांना तहान- भुकही लागली नाही.

ज्यावेळी हे तिघेही आपापल्या गावात पोहोचले तेव्हा त्यांना समजते की सगळ्यांचीच घरे लुटण्यात व जाळण्यात आली होती. भरपूर कष्ट करून उभा केलेल्या संसाराचा राखराख झाला होता. काही लोकांकडे अंगावरील वस्त्रांशिवाय काहीही राहिले नव्हते. परगावी कोणाकडे जायचे ठरवले तर नातेवाईकांकडून पत्रे यायची की 'आमच्याकडेही जाळपोळ झाली आणि त्यामुळे अनेक नुकसान झाले आहे.' आपले हात-पाय काम करण्याजोगे असताना पुणे-मुंबईला आपले मुले काम करतात तिथे जाऊन आता आम्हाला सांभाळा म्हणून पोरांवर का भार घालावा असा विचार करून लोक होते त्याच ठिकाणी राहिले. कुणाचे काहीच शिल्लक राहिले नाही त्यांनी मात्र राहण्यासाठी देवळे शोधली. काही जी भली मुले शहरात नोकरी करीत होती ती आपले काम- धंदा सोडून धावत गावी येतात व वनाझालेल्या आपल्या आई-वडीलांना, भावंडांना पुण्या- मुंबईला घेऊन जातात. कुणाच्या अध्यात ना मध्यात नसलेले शंकररावचे घरसुद्धा जाळले जातात. शंकररावचे वडील गाव सोडून मुंबईला जायचे ठरवतात. गावातील इतर लोक त्यांना समजावून सांगत होते की 'घर जाळले म्हणून तुम्ही हादरले? जाळलं तर जाळलं. आम्ही परत बांधून देतो. शंकररावचे वडील गावात राहायला काही राजी झाले नाही. शेवटी सगळी मंडळी निराश, दुःखी होऊन आपापल्या घरी गेले. माडगूळकरांनी अशा पद्धतीने कादंबरीच्या शेवटचे वर्णन, वातावरण तयार केले आहे की ते वाचत असताना जणू आपल्यातलेच कोणी सोडून दूर जातात ही भावना निर्माण होण्याशिवाय राहत नाही.

## ३.३.४ वावटळ कादंबरीची भाषा

या कादंबरीची शैली ही व्यंकटेश माडगूळकरांची स्वतःचीच शैली आहे. त्यांच्या भाषेचा एक महत्त्वाचा दुवा म्हणजे त्यांच्या भाषेतील लवचिकता. त्यांच्या भाषाशैलीद्वारे त्यांनी गावातील लोक किती शोषिक आहे, हेच दर्शवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी संवादासाठी माणदेशी बोली भाषेचा वापर केला आहे तर निवेदनासाठी प्रणाम भाषा वापरलेली आहे. ती विशिष्ट गावची बोलीभाषा असली तरी वाचत असताना हृदयाला भिडल्याशिवाई राहवत नाही. बोली भाषेच्या माध्यमातूनच कादंबरीत जिवंत वस्तावपण जपला आहे. उदाहरणार्थ: "मी लांबनं बघत हुतो तुमी पळाल्यालं, तालीत दडल्यालं. मानसं वरल्या अंगाला गेली. तवा तुमाला हात करून उठा म्हनालो."[२७] काव्याचा उपयोग या कादंबरीत झालेला आहे. उदाहरणार्थ: "समर्थांनी म्हटलंय- बरे ऐसा प्रसंग झाला| झाला तो होऊन गेला| आता तरी ब्राह्मणी आपणाला| शहाणे करावे||"[२८] वरील काव्य भयावह अवस्थेत असलेल्या खंडुबुवा रामदासीच्या तोंडी घर लुटले, जाळले, त्याच्याकडे काहीच शिल्लक राहिले नाही म्हणून आलेले आहे. कादंबरीची भाषा साधी, सरळ व सोपी आहे. सगळ्या स्तरावरील लोकांना समजणारी अशी भाषा या कादंबरीत आलेली आहे. एक प्रसंग-घटना वाचली की पुढे काय होईल हे जाणून घेतल्याशिवाय राहवत नाही अशा उत्कृष्ट शैलीचा व भाषेचा वापर यात केला आहे. त्यामुळे खराखुरा, अस्सल, जातिवंत अनुभव ह्या भाषेमुळेच प्रत्ययास आला आहे.

एखादी घटना स्पष्ट करण्यासाठी अलंकाराचा वापर केला आहे. उदाहरणार्थ: ज्यावेळी पुण्यात छत्तीस तासांची कर्फ्यू ऑर्डर जारी केली जाते, त्यावेळी रस्त्यावर वाहने दिसत नाहीत, सगळी दुकाने बंद असतात, चोवीस तास नाना तऱ्हेच्या आवाजाने बोलणारे हे शहर वाचा बसल्यासारखे गप्प झाले होते. तर इथे उपमा हा अलंकार उपयोगात आणता आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या लेखनात म्हणी व वाक्प्रचाराचा वापर केलेला दिसून येतो. उदाहरणार्थ: "काळ्या स्लेट पाटीवर दगडी पेन्सिलीने चरा उठावा, तशी एखादी लष्करी गाडी डांबरी रस्त्यावर वाजते."[२९]

## ३.४ 'सत्तांतर' कादंबरी

जुलै १९८२ साली 'सत्तांतर' कादंबरीची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली होती. माडगूळकर लोकजीवनातून वन्यप्राणी जीवनाकडे सत्तांतर कादंबरीद्वारे वळलेले दिसून येतात.

## ३.४.१ सत्तांतर कादंबरीचे कथानक

माडगूळकर एक लेखक म्हणून जगण्यातल्या मूलभूत व आदिम प्रेरणांचा वेध एका वानर परिवारातील सत्तांतर दाखविण्याच्या निमित्ताने घेत आहेत असे वाटते. या कादंबरीत संपूर्ण वानर परिवार, सत्तेच्या प्राप्तीची इच्छा, वानरांच्या वृत्ती- प्रवृत्ती, वासना, स्वार्थ इत्यादी गोष्टींवर कादंबरी फिरताना दिसून येते. मराठीतील एका वेगळया धर्तीची कादंबरी म्हणून सत्तांतर या कादंबरीकडे पाहिले जाते. सर्वसामान्य वाचकांना तांबड्या तोंडाची माकडे व काळया तोंडाची वानरे या पलीकडे फारसे काही माहीत नसते. ती माहिती असावी अशी अपेक्षाही ठेवता येते नाही. ‘सत्तांतर’त आलेला वानर हा ‘Presbytis Entellus हनुमान लंगूर आहे असे माडगूळकर आठव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत म्हणतात. हनुमान लंगूरचा अभ्यास प्रथम एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश निसर्ग अभ्यासकांनी सुरू केला होता. अठराशे छत्तीसमधील अगदी सुरुवातीची नोंद आहे. सर्व नरच असलेल्या टोळीने नर- माद्या- पोरे एकत्र आहेत, अशा एका टोळीवर हल्ला कसा केला, ही हकिकत यात नोंदवली आहे. चार्ल्स मॅकॅनपासून याच्या पद्धतशीर अभ्यासाची सुरुवात झाली. त्यांनी १९३३ साली वानराबद्दल विस्ताराने लिहिले आहे.

मॅकॅननंतर १९५८-५९ साली फिलिस जे या संशोधिकेने मध्यभारतातील ओऱ्छा आणि उत्तर भारतातील काकोरी गावाजवळ राहून महत्त्वाचे संशोधन केले. आई- मुलाचे परस्परांशी वर्तन हा तिच्या निरीक्षणाचा प्रमुख विषय आहे. वानरांवर एकूण अकरा महत्त्वपूर्ण अशी संशोधने १९५८-१९७५ पर्यंत झालेली आहेत असे प्रस्तावनेत माडगूळकरांनी सांगितले आहे. लेखिका एस. हर्डी यांनी आपल्या ‘दि लंगूर्स ऑफ अबू: फीमेल ॲण्ड मेल स्ट्रॅटेजीस ऑफ रिप्रॉडक्शन’ या प्रबंधात्मक ग्रंथात दोनशे एकोणचाळीस संदर्भ- ग्रंथ, लेख, टिपणे अशा यादींचा समावेश केला आहे. प्रत्येक दोन किंवा तीन वर्षानंतर टोळीतील ‘सत्तांतर’ होते. धारवाडला झालेल्या संशोधनात हा तपास लागलेला आहे. फक्त स्वभाव व शरीर वैशिष्ट्यानुसारच ‘सत्तांतरा’तील वानरांना नावे आहेत. वानरे पाहण्यासाठी माडगूळकर अबू पर्वतावर सात दिवस राहिले. ‘सत्तांतर’ हे वानरांच्या वर्तनाचा अभ्यास म्हणून लिहिलेले शास्त्रीय पुस्तक नसून, पानगळी जंगलात प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांवर आधारलेली ती एक कल्पित कथा आहे.

वानर परिवाराशी व्यंकटेश माडगूळकर एकरूप झालेले दिसून येतात. कादंबरीची सुरुवातच वानरांच्या घुसखोरीतून होते. “ओढ्याच्या पलीकडे, शंभर- सव्वाशे पावलांवर, उंबराच्या झाडावर

डुलकी घेणाऱ्या सहा भटक्या नरांची झुंड जागी झाली होती. एकापाठोपाठ एकेकाने वरून धारा सोडल्या, लेंडके टाकली. त्याचा खाली पसरलेल्या पाचोळ्यावर आवाज झाला उग्र वास हवेत पसरला. आसमंत गोंधळात टाकला व एकाएकी सुरू झालेला हा दंगा, इशारा व्हावा, तसा क्षणातच गप्प होतो."[३०] घुसखोरेच त्या परिसरात असलेले प्रत्ययास येतात. टोळी-टोळीने वानरे वानर परिवारात राहतात. त्यात त्यांचा एक प्रमुख असतो. दुबळा व मोडक्या अवस्थेस आलेल्या टोळीवर नर वानर हल्ला करीत असे. वानर परिवारात जसे सत्तेच्या हावने भांडणे होतात, घुसखोर येतात हे सगळे ध्यानी आले की माणसाच्या प्रवृत्तीतही हीच आदिम प्रवृत्ती जाणवते. माणसे सत्तेसाठी काय करतात व काय करत नाहीत याची जाण सगळ्यांनाच असते. त्यामुळे जरी ही कादंबरी वानर परिवारातील वास्तव मांडणारी असली तरी ती एक रूपकात्मक कादंबरी आहे. घुसखोर घुसल्यामुळे जांभळीच्या झाडावर विसावलेल्या टोळीत घबराहट निर्माण होते. वानरांची पोरे ओरडू लागली होती. वानरी हुशारीने पिलांना पोटाशी धरून उंचउंच जाऊन बसू लागतात. लेखकाने दरएका वानर व वानरीला नाव दिले आहे. नावाचाच उल्लेख करून त्यांच्या परिवाराचे चित्रण लेखक करीत असतो. "नेहमीच आपल्या टोळीपासून दूर राहून टोळीचा नेता 'हुप्या' टोळीची राखण करीत असतो. घुसखोरांच्या समोरासमोर बसून, त्यांच्याकडे बघून त्याने आपले दात कराकरा खाल्ले. पसरल्या जबड्याने हवेचा एक, दोन, तीनदा लचका तोडून आपल्या काळ्या जबड्यातले पांढरे कणखर सुळे परत परत दाखवले. आक्रमक असा गुरगुराट केला. हुप्याचा हा जोर पाहून घुसखोर पळाले."[३१] तेवढेच आवेशपूर्ण लेखकाने ह्याचे वर्णन केले आहे. हुप्याच्या डाव्या कानाच्या वरच्या बाजूचा मोठ्ठा तुकडा हाणामारीत गमावला होता. त्यामुळे तो मुड्या कानाचा होतो.

वानरी हुप्याची अर्थातच टोळीप्रमुखाची काळजी जास्त घेताना दिसतात. त्याच्या अंगाला चिकटलेली कुसळ, कुत्री, लांडगे, झाडाच्या चिकाने झालेल्या गुठळ्या निवडून काढून टाकू लागतात. एकूण सात टोळ्या या अरण्यात वास्तव्याला असतात. प्रत्येकाचे स्वतःचे म्हणून जबरदस्तीने तयार केलेले क्षेत्र होते. त्यात वर्षानुवर्षे नवी पोरे जन्माला येतात, वाढतात, बलदंड होतात. टोळीतून हाकलून दिली की एकत्र येऊन पोरे एकोप्याने दुसऱ्या टोळीच्या हद्दीत घुसखोरपणा करण्यासाठी जात असे. 'संघर्ष दररोज चालू असत. हा संघर्ष टोळी- टोळीत असतो, एका टोळीतील मादींमादीत, नरानरांत असतो. या अरण्यात वानरांना खाणारे अनेक हिंस्र प्राणी होते. रानकुत्री, बिबटे, वाघ, फांद्यांना वेढून बसलेले अजगर, तळ्यात असलेल्या मगरी, तीक्ष्ण नजर, नखं, चोची व पंखात विलक्षण झेप असलेले

बाज पक्षी. कधीमधी तिरकमठे, कुऱ्हाडी, भाले, शिकारी कुत्री घेऊन अरण्यात घुसणारी शिकारी माणसे. या दररोजच्या संघर्षातून वानरे जगत होती. मध्यभारतातील एका विशाल अरण्यात हाणामारीत डाव्या कानाचा मोठा तुकडा गमावलेला मुडा टिकून होता. लेखकाने तपशीलासह सुरेख चित्रण या मुडाच्या परिवाराचेही केलेले आहे. लांडी, थोटी, काणी, उनाडी, बोथरी, लाजरी, बोकांडी अशी त्या कळपातील वानरींची नावे होती. वयात येणे, जुळण असे सगळेच तपशील यात टिपले आहेत. प्रत्येकाच्या सवयीदेखील वेगवेगळ्या होत्या. नर वानरांना थोड्या वयात आले की टोळीतून हाकलायचे. त्यांनी मग कसेही, कुठेही राहायचे.

वानरांची एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जोपर्यंत टोळीचा प्रमुख कोणत्याही गोष्टीत पुढाकार घेत नाही तोपर्यंत इतर वानरही पुढे जात नाही, मग ते पाणी पिण्यासाठी असो किंवा दुसऱ्या कामासाठी. भीतभीतच एकामेकांची राखण करीत वानरांची पाणी पिण्याची विधी होत असे. जीव मुठीत घेऊनच वानरांना जगावे लागत असे. एखादा हिंस्त्र पशू आला की, एकामेकांना इशारा करीत होते. याचे वर्णन माडगूळकरांनी आठव्या आवृत्तीच्या पृष्ठ क्रमांक बारावर केलेले पाहावयास मिळते. मुडाच्या टोळीतील बोथरी एकदा रानकुत्र्याच्या तावडीत सापडते. याचे वर्णन वाचताना जणू तो प्रसंग आपल्याच समोर घडतो असा भास होतो (पृष्ठ क्रमांक १२). अशा प्रकारे या हिंस्त्र पशूंच्या तावडीत ही वानरे सापडतात. त्यामुळे त्यांना जीव मुठीत घेऊनच जगावे लागतात. वानरांचा दिनक्रम देखील माडगूळकर वाचकांसमोर उलगडून दाखवतात (पृष्ठ क्रमांक १४).

कादंबरीच्या दुसऱ्या प्रकरणात माडगूळकरांनी मूडाने कशा प्रकारे मोगाच्या टोळीवर हल्ला चढविला व त्यामुळे तो स्वतःचा कुटुंब कसा त्याच ठिकाणी सोडून गेला याचे वर्णन केले आहे. मुडाच्या टोळीत मोगाच्या टोळीतील त्याची पोरे सामील होते. ती पोरे मोठी झालेली असतात. त्याचे वर्णन पृष्ठ क्रमांक १६वर आले आहे. मुडाची टोळी चारोळ्या खाण्यात गुंग झाली. त्यांच्या शेजारी लालबुड्या शेजारधर्म म्हणून रानात बारकाईने निरीक्षण करत होता. तेव्हा त्याला मोगाची टोळी दिसते. त्याने हूप्प हूप्प असा आवाज केला. गदागदा फांद्या हलवल्या. ह्या फांदीवरून त्या फांदीवर अशा लांब उड्या मारल्या. अशा प्रकारे बारीकसारीक तपशील येथे माडगूळकर देताना दिसून येतात. यावरून असे समजते की दोन्ही टोळयांमध्ये आता भांडणाला सुरुवात होणार कारण दोन्ही टोळया एकामेकांसमोर होत्या.

टोळीचा प्रमुख अधून मधून नाहीसा होत असे. असाच एकदा लालबुड्या नाहीसा झाला होता. त्यामुळे त्याची टोळी दिशाहीन होते. सात वानरी व दोन कळती पोरे अशी त्या टोळीत असते. मुडा आता लालबुडाची टोळीही सांभाळू लागला होता. दोन्ही टोळयातील माद्या एकत्र येतील एक ना एक दिवस व आपल्या अधिकारासारखी गुण्यागोविंदाने नांदतील असा त्याला विश्वास होता. त्याचदरम्यान मोगाच्या टोळीलाही लालबुड्या नाहीसा झाल्याचे कळले. त्याने वानरीला आपलेसे केले. मुडाला मोगाची चाहूल लागते. याता या दोघांत भांडण होणार असे वाटत होते पण तसे न होता मोगानेच माघार घेऊन पळ काढला. वानराचेही मोठे तत्त्वज्ञान होते. मोगाला हाकलून मुडा उंच झाडावर बसून दोन्ही टोळीतील वानराचे भांडण पाहत बसला होता. कारण दोन्ही टोळया त्याला सांभाळायच्या होत्या. तसेच लालबुडाच्या टोळीत नर नसल्यामुळे त्यांना संरक्षणासाठी नर हवा असतो. त्या पोरे पळवून आणि होत्या व त्यांच्या मागोमाग आया येतील, इथेच राहतील, म्हणून पाहत होत्या पण मुडाच्या टोळीतील वानरींना एकत्र राहणे पसंत नव्हते. त्या विरोध करीत होत्या. याचे कारण म्हणजे दोन टोळया एक झाल्या तर मोठा परिवार होणार व एका नराला एवढी मोठी हद्द सांभाळणे अशक्य होणार. दोन्ही टोळया एकत्र करण्याचा मुडाचा प्रयत्न मात्र चालूच असतो. वानराचे हे तत्त्वज्ञान लेखक सांगतो तेव्हा वानर परिवारात व माणसात असलेली सत्ता हाव कशी एकच आहे याचा प्रत्यय येतो.

एका लहानशा टोळीतल्या आईच्या पोटी सात वर्षापूर्वी मध्यानरात्री लालबुड्याचा जन्म झाला होता. आईपासनं दूर ओढून मावशा त्याचे हाल करीत होत्या. पुढे टोळीतूनच त्याला हाकलण्यात आले. असेच हाकललेले इतर चार- सहा जण एकत्र येऊन त्यांची एक टोळी होते. लालबुड्या अंगाच्या ताकदीने टोळीचा मालक होतो. शेजारचा मुडा लालबुड्याचा दुश्मन असतो. लालबुड्या एक दिवस पक्षांची अंडी चोरून खाण्याच्या नादात आपला जीव गमवून बसतो. साप त्याचा चावा घेतो व त्यातच त्याचा अंत होतो. मुडा व मोगा हे टोळीप्रमुख एकमेकांच्या ताकदीचा अदमास घेत असतात. मोगा व त्याच्याबरोबर त्याच्या पाच साथीदाराने मुडाच्या ताकदीचा अदमास घेतला होता.  वानरी त्याच्या टोळीत होत्या पण त्यांची फार भीती वाटत नव्हती याचे कारण म्हणजे वानरी कितीही आडदांड असल्या तरी नरासारखे खंजीरी सुळे त्यांच्यापाशी नसतात. शहाण्या मुत्सद्याप्रमाणे मुळा प्रत्यक्ष संघर्ष मात्र टाळतो. याचा अंदाज हल्लेखोरांना आला होता.

मोगा व त्याचे साथीदार मुडाच्या टोळीत घुसतात. पोरंबाळं, म्हातारी, बाई, लहान- धाकटे काही न बघता पोरे पकडून अंगाखाली ओढतात, वानरी ओढतात, मारझोड करतात. लाजरी, उनाडी यांना चौघा पाच जणांनी ओढल्या. लहान पोरे रडू लागतात. लागोपाठ तीन दिवस त्यांनी त्यांच्या टोळीवर हल्ला केला. तिसऱ्या हल्ल्यात मुडाची उजवी कूस शेवटच्या बरगडीखाली पाच इंच उसवते. त्यामुळे पराभव स्वीकारून तो टोळी समोर पळतो. शेवटी मुडा वानर एकाकी असा पाण्याच्या काठ्या शेजारी मरून पडतो. मोगा गर्विष्ठ झाला होता. मुडाच्या टोळीत भीती निर्माण झाली होती. काणीचे पोरं मोगाने ओढून काढले होते. ते रक्त बंबाळ झाले होते. मोगाला अतिशय राग आला होता. लांडीचे पोरं त्याने तिच्या कवेतून हिसकावून घेतले व ते आपल्या कवेत घेतले. पोराची मांडी आपल्या दातात धरली व जमिनीवर उडी टाकून वेगाने दूर पळाला. अशाप्रकारे मुडाच्या टोळीतीलतिन्हीही पोरं मोगाने मारली. ज्या टोळीवर कोणाचा हक्क नव्हता अशा लालबुडाच्या टोळीला नर मिळाला होता. सहा भटक्यांची टोळी परत परागंदा झाली होती. मुडाच्या टोळीतील वानरी दाढीवाल्याच्या टोळीत मिसळू लागल्या.

रानातील पशु- पक्ष्यांच्या व मगरीच्या जीवन चरित्राचे चित्र लेखकाने शेवटच्या प्रकरणात साकार करुन वानर परिवारातील सत्तापालटाचे तत्त्वज्ञान सांगितलेले आहे. मुडाच्या टोळीतील तरणी मुडाचा गर्भ पोटात वाढवत होती. तरणीचे दिवस भरते. तिच्या पोटात पोरं हलू लागते. तरणी व्याली. तिने झालेले चिमुरडं पोर चाटून स्वच्छ केले. दोन्ही हातांनी वर काढले व बघितले काय आहे ते? नर की मादी? तर तो नर होता. सत्तांतरानंतर जन्माला आल्यामुळे तो सुरक्षित होता. कदाचित जगला, वाचला तर हाच उद्या मोठा होऊन मोगाला घायाळ करून टोळीचा प्रमुख होणार होता. हजारो वर्ष फिरत आलेले सत्तासंघर्षाचे हे रहाटगाडगे असेच फिरत राहणारे होते.

## ३.४.२ सत्तांतर कादंबरीतील व्यक्तिरेखा

वानरे व त्यांचे जीवन ‘सत्तांतर’ या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. त्यामुळे ह्या कादंबरीत आलेली वानरे म्हणजेच या कादंबरीतील व्यक्तिरेखा आहेत. ज्या व्यक्तिरेखांच्या भोवती या कादंबरीचे कथानक गुंफले आहे, तीच या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. मुडा, लालबुड्या, थोटी वानरी व मोगा या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत.

### १. मुडा

मुडा हा कादंबरीत आलेल्या जंगलातील एका वानर टोळीचा प्रमुख असतो. त्याच्या डाव्या कानाचा, वरच्या बाजूचा मोठ्ठा तुकडा हाणामारीत तुटला होता व तो मुड्या झाला होता. त्याचे वजन खूप भारी होते. तो पिळदार स्नायूंचा होता व खैराच्या गाठीसारखा धट्टाकट्टा होता. त्याच्या अंगावर मारामारीच्या अनेक खुणा होत्या. लांब मोठा वण शेपटीवरसुद्धा होता. अगदी संतापी स्वभावाचा होता. ज्यावेळी तो संतापलेला असतो, त्यावेळी त्याच्या जवळ जाण्याचे धैर्य वानरींना होत नाही पण फक्त तरणी वानरीच धीटपणाने त्याच्या जवळ जायची. या अरण्यात त्याचे राज्य होते. ते त्याने स्वतःच्या क्षमतेवर मिळवलेले होते. नर म्हणून जन्माला आल्यानंतर वानराच्या पोरांना टोळीत जास्त काळ राहायला मिळत नसे. थोडा मोठा झाला म्हणजे त्यांना टोळीतून हाकलले जात असे. या पोरानेच मग इतर वानरांशी मारामाऱ्या करून टोळी बनवावी लागत असे. हे सगळे अनुभवायला तो वानर जगला पाहिजे होता. तरच हे शक्य होते. ज्याच्या अंगात शक्ती जास्त असे त्यालाच हे सगळे शक्य होते. मुडाही हे सगळे करूनच टोळीप्रमुख झाला होता. त्याच्या टोळीत एकूण सोळा जण होते. सात वानरी, चार लहान पोरे, दीड-सव्वा वर्षाची नरपोरं होती व दोन वयात आलेल्या पोरी होत्या.

मुडाने कमवलेले राज्य जंगलात टिकवून ठेवणे फार कठीण होते याचे कारण म्हणजे इतर टोळीतील हाकलून दिलेली पोरे मोठी होऊन त्याला आव्हान देत होती. टोळी प्रमुखाला टोळीचे संरक्षण, रोजचे खाणे, रात्री झोपण्यासाठी सुरक्षित झाड शोधावे लागत असे. मुडा ताकदवान असल्यामुळे प्रतिस्पर्धी पळून जातात. उदाहरणार्थ: एकदा मोगा व त्याचे साथीदार मुडाच्या टोळीवर हल्ला करण्याच्या हेतूने उंबराच्या झाडावर गुरगुराट करतात. दात खातात, नैसर्गिक विधी करून उग्र भपकारा हवेत सोडतात. हुप्प हुप्प असा आवाज करून एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या मारतात. ज्यावेळी मुडा अचानक झाडीतून बाहेर येतो व घुसखोरांच्या समोर बसून कराकरा दात खातो, गुरगुराट करतो तेव्हा मोगा व त्याचे साथीदार घाबरून पळून जातात. मुडा टोळीचे संरक्षण करण्याबरोबरच आपल्या राज्याची वाढ करण्याचे ठरवितो. त्याच्या टोळी शेजारी लालबुड्याची टोळी असते. एकेदिवशी लालबुड्या अचानक गायब होतो. सहा- सात दिवस झाले तरी परतला नाही. हे जेव्हा मुडाच्या लक्षात येते तेव्हा तो त्याच्या टोळीवर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करतो.

उघड्या पडलेल्या लालबुडाच्या टोळीतील वानरींना तो आपल्या ताब्यात घेतो. दोन्ही टोळयांचे एकत्रीकरण करण्याच्या हेतूने तो दिवसा लालबुड्याच्या टोळीत तर रात्री स्वतःच्या टोळीत राहतो.

मुडाचे राज्य फार काळ टिकत नाही. त्याला पाहिजे तसे दोन टोळीचे एकत्रीकरण होत नाही. मोगा आपल्या साथीदारांबरोबर मुडावर हल्ला करीत राहतो. एका हल्ल्यात मुडा जखमी होतो. मुडा पराभव पत्करुन दूर पळतो. पाणी पिण्यासाठी पाण्याजवळ जातो. तेथेच स्वतःचे प्रतिबिंब पाहतो व तोल गेल्यामुळे तिथेच खाली पडून त्याचा अंत होतो.

## २. लालबुड्या

लालबुड्या हा मुडाच्या शेजारच्या टोळीतील प्रमुख असतो. त्याच्या टोळीत एकूण तेरा जण असतात. मुडाच्या टोळीच्या जवळपास असलेल्या अरण्याचा भाग ही त्याची जमीन होती. तो चांगला शक्तिशाली असतो. तो सात वर्ष वयाचा असतो. लेखकांनी याला लालबुड्या हे नाव त्याच्या वैशिष्ट्यामुळे दिले आहे. त्याच्या बुडावर दोन्ही बाजूला लालसर रंगाची ठिगळं असतात. उड्या मारल्या की ती स्पष्ट दिसायची. लालबुड्या लहान होता तेव्हापासून इतर वानरी त्याला त्याच्या आईपासून दूर घेऊन जातात व ह्या फांदीवरून त्या फांदीवर उड्या घेत असताना त्याला खूप भीती वाटायची. जंगलातील इतर हिंस्त्र प्राणी पक्षी वानरांवर हल्ला करीत होते हे बघतच लालबुड्या लहानचा मोठा झाला होता. त्याच्या वयातील एका खेळगड्यावर एका पक्ष्याने जडप घातली व आपल्या दोन पायांच्या नख्यात त्याला पकडून नेताना लालबुड्याने बघितले होते तेव्हापासून त्याला पक्ष्यांच्या सावलीचीही भीती वाटू लागली. लहान वयातच त्याला खाण्यापिण्याचे धडे मिळाले. इतर वानरांबरोबर खेळत, मस्ती करीत तो मोठा झाला. त्याच्या स्वभावातील आक्रमकता थोडा मोठा झाल्यावर प्रत्ययास येऊ लागते. त्याला झोपण्यासाठी, बसण्यासाठी, खाण्यापिण्यासाठी जे चांगले आहे तेच हवे होते. यासाठी तो इतरांशी हाणामारी करून आपल्याला हवे ते मिळवू लागला. इतर टोळीतील वानरी, पोरे त्याला घाबरू लागली. त्याच्या ह्याच सवयीमुळे की नर असल्यामुळे कुणास ठाऊक पण त्याला त्या टोळीतून हाकलण्यात येते.

लालबुड्या ताकदवान व स्वभावाने आक्रमक असल्याने एका टोळीचा मालक होतो. सकाळी उठून एका उंच झाडाच्या फांदीवर बसून 'हुप्प हुप्प' असा आवाज करण्याची त्याला सवय होती. काय खायचे, काय करायचे म्हणजे दिनक्रम तोच ठरवत असे व त्याची टोळी त्यापद्धतीने वागत असे. पुढे त्याच्या व मुडाच्या टोळीत भांडण होत राहते. लालबुड्या थोडा धाडसी होता. स्वतःची हद्द व टोळी सोडून तो फार लांब जात नसे पण थोडे दूरपर्यंत झाडांच्या फांद्यावरून उड्या घेत जायची सवय त्याला होती. जमिनीवर, झाडावर विविध पक्ष्यांनी घातलेली अंडी शोधणे व ती फस्त करणे यात त्याला मजा यायची. हीच मजा, आनंद घेत असताना त्याला आपला जीव गमवावा लागतो. चितूर पक्षिणीने घातलेली अंडी खाण्यासाठी जात असताना त्याचा हात एका विषारी सापावर पाडतो. तोच साप त्याच्या हाताचा चावा घेतो. त्यातच त्याचा मृत्यू होतो.

## ३. थोटी

थोटी ही मुडाच्या टोळीतील लहान पोरे असलेली वानरी असते. एका घुसखोर वानराने ती लहान असतानाच तिच्यावर हल्ला केलेला असतो. तिला तिच्या आईपासून दूर करून तिच्या डाव्या हाताचा चावा घेतला जातो व टाकून दिले जाते. त्यामुळे तिचा डावा हात दंडापर्यंतच असतो व लेखकांनी तिला थोटी हे नाव दिलेले असते. एका हाताने ती आपल्या पोराला सांभाळायची. फिरायला घेऊन जायची. आपल्या हाताची पर्वा न करता भांडणात उभी राहायची. भांडणाची रुची तिला होती. एकदा मुडा व लालबुड्या यांच्यात भांडण होऊन संपते तेव्हा ही थोटी आपल्या पोराला उनाडी या दुसऱ्या वानरीजवळ सोडून लालबुड्याच्या टोळीत जाऊन त्यांच्या वानरीच्या अंगावर धावून जाते. ती आपल्या पोरावर अपार प्रेम करायची. ज्यावेळी इतर वानरी तिच्या पोराला घेऊन जायची तेव्हा ती धावत जाऊन तिला परत आणायची. परक्याच्या हातात आपल्या पोराला देणे तिला आवडत नसे. काळतोंडी वानरी जेव्हा पोराच्या मांडीचा चावा घेते तेव्हा पोरं खूप रडू लागते. तेव्हा मात्र तिचे हाल होऊ नये म्हणून थोटी आपली पकड सैल करते व पिलाला नेऊ देते. काही वेळाने लाजरी व उनाडीच्या मदतीने आपल्या पोराला घेऊन येते.

मुडाला मारल्यानंतर मोगा मुड्याच्या टोळीत जाऊन त्यांच्या लहान पोरांना मारायचा सपाटा चालू करतो. लांडीच्या पोराला मारल्यानंतर इतर पोरांना मारतो. थोटी आपल्या पोराला घेऊन ती टोळी

सोडून दूर निघते. तात्पुरती तरी ती मोगाच्या तावडीतून पिलाची सुटका करते. पुढे- पुढे पोराला सांभाळणे तिला कठीण जाऊ लागते. खाण्यापिण्याची सोय देखील तिला करता येत नव्हती कारण तिच्या बरोबर कोणीच नव्हते. रात्री झोपताना भीती वाटू लागते. काहीच पर्याय नसल्याने शेवटी ती दाढीवाल्याच्या टोळीच्या जवळ जाते. हा दाढीवाला म्हणजे मोगाच्या टोळीतील ताकदवान असा एक नर. थोटीच्या पोराला लालबुड्याच्या टोळीतील वानरी जवळ घेतात. दाढीवाल्याची थोटीला भीती वाटत होती कारण तिला वाटायचे की तो धावून येऊन आपल्या पोराला मारेल पण तो तसे काही करत नाही. त्या टोळीत लहान पोरं नसल्यामुळे थोटी आपल्या पोरासाठी शेजारच्या टोळीत राहू लागते.

## ४. मोगा

मोगा प्रखर दृष्टीचा, बुटका, वजनदार शरीर, रागीट व तोंडाभोवती खूप केस असलेला असतो. मोगाबरोबर अजून पाच नर व पोरे असतात. या सगळ्यांना टोळीतून हाकलण्यात आले होते. तेव्हापासून त्यांना स्वतःचा असा एक प्रदेश नसतो. ते रानोमाळ भटकत असतात. त्यामुळे त्यांना खाण्या-पिण्यासाठी दुसऱ्यांच्या जागी शिरावे लागत असे. मोगा आपल्या टोळीचा मालक असतो. इकडे-तिकडे भटकत असताना एखाद्या टोळीवर हल्ला करून त्या टोळीचा प्रमुखपद मिळवण्याच्या धडपडीत तो असतो. मुडाने त्याला टोळीतून हाकलल्यामुळे मुडाच्या टोळीवर तो हल्ला करीत असतो. लालबुड्या नाहीसा झालेला आहे असे कळताच तो त्या बेवारशी टोळीत शिरतो. त्या टोळीतील एक वानरी लगेच त्याला ताब्यात घेते. तिच्यासोबत असताना मुडा आपल्याला पाहतो आहे हे लक्षात येताच तो पळून जातो. मोगाला लालबुड्याची टोळी मिळवायची असते पण त्यासाठी तो स्वतःचा जीव जोखमीत टाकत नाही. प्रतिस्पर्धीला पाहून तो आपली शहाणपण करायचा. मुडाच्या ताकदीचा अंदाज घेऊन तो असा निष्कर्ष लावतो की त्याच्या टोळीतील वानरींचा फार धोका नाही कारण नरासारखे त्यांच्याकडे खंजिरी सुळे नसतात. मुडाची व लालबुड्याची टोळी एकत्र आली तरी वानरींची संख्या लालबुड्याच्या टोळीत जास्त होत असल्याने मुडाचे बळ कमी होते हे त्यांनी ओळखलेले असते. एके दिवशी दुपारी झाडावर विश्रांती घेत असलेल्या मुडाच्या टोळीवर मोगा हल्ला करतो. मुडाच्या टोळीत घबराट पसरते. मोगा मुडाच्या टोळीतील लहान पोरांना, त्याच्या आयांना, इतर वानरींना, बोथरीला मारतो. मोगाचा साथीदार मुडावर चाल करून जातो. त्याच्याबरोबर लढाई करून थकल्यावर मोगा मुडावर हल्ला करतो. मुडा

झाडावरून खाली कोसळतो. तो जखमी होतो व त्याच अवस्थेत मोगा मुडावर परत हल्ला करतो. प्रतिकार न करू शकल्याकारणाने तो पळत जातो. पाण्याच्या तळयाच्या काठावर मुडाचा अंत होतो. मोगाला मुडाच्या टोळीचे प्रमुखपद मिळते. दाढीवाला मोगाच्या सोबतीला असतो.

## ३.४.३ सत्तांतर कादंबरीतील वातावरण

'सत्तांतर' या कादंबरीचे वातावरण वनात घडते. त्यात आलेल्या व्यक्तिरेखा जंगलातच वावरतात. त्यामुळे कादंबरीतील वातावरण जंगलातील, नैसर्गिक आहे. कथानकाचा एक अविभाज्य घटक म्हणजे या कादंबरीत आलेले जंगल होय. विविध रानटी झाडांबरोबर चिंच, चारोळी, आंबा, जांभूळ इत्यादी वृक्षांची वर्णने यात आलेली आहे. झाडांच्या साथीनेच वानरांच्या जीवनातील घटना घडतात. कधी पाणी पिण्यासाठी तळयावर जाण्याआधी सर्व वानर टोळी तळयाकाठच्या सागाच्या झाडावर विसावा घेते तर कधी जांभळीच्या झाडावर विश्रांती घेत असलेल्या वानरांवर उंबराच्या झाडावर डुलकी घेणारे घुसखोर वानर हल्ला करतात. कादंबरीची सुरुवात उन्हाळा या ऋतूने होते व शेवट होतो तेव्हा पावसाळा सुरू झालेला असतो.

वानरांमधील असलेल्या सत्तासंघर्षाबरोबरच त्यांच्या जीवनातील इतर घटना-प्रसंग, एकमेकांबरोबर वागणे, टोळी मालकाशी वागणे, त्यांचे मृत्यू , त्यांच्यात होणारी मारामारी, याचे उत्कट वर्णन केले आहे. 'वानरी दुसऱ्या वानरीचे पोरं पळवतात. त्याच्याशी थोडा वेळ खेळतात. हे दुसऱ्या तसेच स्वतःच्या टोळीबाबतही घडत असते.', 'पावसाळयात वानरे भूमीवर उतरत नाही. झाडावरच एकमेकांच्या अंगाची ऊब घेत बसून राहत असतात.'

ज्यावेळी काळतोंडी वानरी थोटीच्या पोराच्या मांडीचा चावा घेते तेव्हा पोर खूप रडू लागते. तेव्हा मात्र तिचे हाल होऊ नये म्हणून थोटी आपली पकड सैल करते व पिलाला नेऊ देते. हे वर्णन करताना आईला होणारी वेदना प्रत्यासास येते. या कादंबरीच्या वातावरणाचा भाग वानरांप्रमाणेच जंगलातील इतर प्राण्यांचे जीवनही आहे. जंगलात असलेल्या विविध पक्ष्यांच्या खाण्याचे, गप्प राहण्याचे, उडून जाण्याचे उल्लेख यात आलेला आहे. पावसाळयाला सुरुवात होताच होणाऱ्या सृजनाचा सोहळा यात दिसतो. ढोकरी पक्ष्यांमधले नर पाऊस पडायचा आधी घरटी बांधतात. माद्यांचे

आगमन, अंडी देणे, तळयाच्या काठावर मगर कशी अंडी घालते, हे सर्व वर्णन मनोरंजक आहे. हे वाचून जंगल वाचनाचा एक वेगळा अनुभव येतो. एकंदरीत या कादंबरीची मांडणी नाट्यमय अशी आहे.

## ३.४.४ सत्तांतर कादंबरीची भाषा

व्यंकटेश माडगूळकरांनी साधी, सरळ, सोपी, सुटसुटीत अशी भाषा वापरून या कादंबरीची रचना केलेली आहे. अगदी छोटी- छोटी वाक्ये यात आलेली आहे. उदाहरणार्थ: 'सगळीकडेच चूपचाप झाले.', 'टळटळीत दुपार होती.'

अलंकारिक वाक्ये यात आलेली आहे. उदाहरणार्थ: 'हे जांभळीचे झाड. फळांनी फणसाचे झाड लहडावे, तसे आता वानरांनी लहडले होते.', 'मोठमोठ्या थेंबानी आभाळातून खाली तिरकस उड्या घेतल्या. तळयाच्या पाण्यावर पांढऱ्या लाह्या फुटू लागल्या.', 'सृष्टी अन्नब्रह्माच्या पूजेला बसणार होती.'

या कादंबरीत काही बोली भाषेतील शब्द आलेले आहेत. उदाहरणार्थ: भीजपाऊस, उष्णकाळ, धगाटा यामुळे कादंबरीतील वातावरणाला जीवितपणा येतो. अनेक प्रसंग बारकाईने टिपले आहेत. 'काळयातोंडीने दुसऱ्या टोळीतून पोर पळवून आणले म्हणताच ते तिच्याकडून घेण्यासाठी झुंबड उडाली. पहिल्या मनाची सर्वात ताकदवान वानरी होती, तिचे दुसरे पोर नुकतेच गेले होते, त्यामुळे ती आधी धावत आली आणि काळयातोंडाच्या हाततने तिने ते पोरं हिसकावून घेतले.', 'वयाने सर्वात मोठी असलेली मादी कळपाची पुढारी होती. ती तत्काळ सावध झाली. मोठमोठे कान ताठ पसरून, मान तणावून तिने वाऱ्याकडे आपले काळे ओलसर नाक करुन वास घेतला. बिबट्याचा वास येताच 'पुका' असा इशारा करून ती विरुद्ध दिशेला उडाली. मागोमाग सगळा कळपही उधळला.'

या कादंबरीत काही असे वर्णन आलेले आहे की ते वाचता क्षणी आपण त्यात रमून जातो व डोळयांपुढे तो प्रसंग उभा राहतो. उदाहरणार्थ: मुडाला मारल्यानंतर मोगा मुड्याच्या टोळीत जाऊन त्यांच्या लहान पोरांना मारायचा सपाटा चालू करतो. लांडीच्या पोराला मारल्यानंतर इतर पोरांना मारतो.

## ३.५ 'पुढचं पाऊल' कादंबरी

पुढचं पाऊल' ही व्यंकटेश माडगूळकर यांची कादंबरी ७ मे, १९५० रोजी प्रकाशित झाली. या कादंबरीत एकूण महारवाडा व त्यांच्या जीवनाबद्दल मांडलेले आहे.

### ३.५.१ पुढचं पाऊल कादंबरीचे कथानक

'पूर्ण गावचे व महारवाड्याचे रक्षण करणारे शहीद रामनाक महार यांचा पुत्र देवा व देवाचा थोरला मुलगा कृष्णा या भोवती ही कादंबरी फिरताना दिसते. देवाला दोन मुले आहेत. थोरला कृष्णा व धाकटा गणा. या कादंबरीत कृष्णा गावची कामे करताना दिसतो. निरोप सांगणे यासारखी तराळाची कामे तो करीत असतो. कृष्णाच्या पत्नीची नाव रखमा असते. त्यांना एक मुलगा व एक मुलगी असते. एके दिवशी लहान मुलांचे लसीकरण करण्यासाठी गावात डॉक्टर येतो. पाटील कृष्णाला बोलवतो व लस टोचून घेण्यासाठी गावात घोषणा द्यायला सांगतो. कृष्णा आपले काम प्रामाणिकपणे करतो पण कोणतेच पालक लसीकरणासाठी तयार होत नाहीत, कारण त्यांना आधी असा अनुभव आला होता की लस टोचल्यामुळे गावात एका मुलाचे निधन झाले आहे. न्हाव्याची भागी व परटाची सुबा रानातून परत येताना ही घोषणा ऐकतात. न्हाव्याची भागी व परटाची सुबा एकमेकांशी बोलताना म्हणतात, "कशाला येतोय मुडदा? टोचलं म्हंजे पोरास्नी ताप येतो मुलूखभर! जात्यात सुदीक पोरं वक्तावर! मी न्हाई बाई टोचायची माज्या पोरीला. सकाळच्या पारीच जाईन तिच्यासंगं रानात. व्हय, तर काय, दोडा! माझ्या नणंदेचं पोरगं आज तीन साली टोचलं या मुडद्यानं, आन् गेलं बघ पोरगं. कसं सोजीच्या लाट्यावाणी होतं! आणि तीन सालांपूर्वी लिव्हरच्या विकारानं मेलेल्या नणंदेच्या पोराएकी तिचे डोळे पाण्यानं भरले."[३२] त्या दोघांच्या ह्या संवादावरून असे लक्षात येते की, लस टोचण्याचा त्यांचा अनुभव फार चांगला नव्हता.

डॉक्टरने पाटलाच्या वाड्यावर एक कोंबडी फस्त केली तरी एकही गावातले पोर लस टोचून घेण्यासाठी चावडीवर दिसले सुद्धा नाही. यामुळे डॉक्टर संतापले व पाटीलवर ओरडायला लागले. पाटील कृष्णावर संतापला. कृष्णावर ओरडून म्हणतो की गावातील एकही पोर लस घ्यायला आले नाही. तूच त्यांना सांगितले नसेल. कृष्णा त्याला म्हणतो सगळयांना सांगितले आहे. लोक येत नाही. यावरून डॉक्टरांचे व कृष्णाचे भांडण होते. त्यादरम्यान डॉक्टरच्या गाडीचा बैल कुठे निघून जातो. त्या बैलाला

शोधण्यासाठी गेल्यामुळे कृष्णाच्या डोक्याला मार लागतो. कृष्णा चिडतो व डॉक्टरलाच मारतो. हे सगळे बघून पाटील निराश होतो. कृष्णाला डॉक्टरची माफी मागायला लावतो. कृष्णा प्रथम माफी मागत नाही. देवाच्या सांगण्यावरून तो माफी मागतो पण हे लाजिरवाणे जगणे, अपमान त्याला सहन होत नाही. रात्री घरी देवासोबत भांडण करतो. देवाला सांगतो की तूच कर ही म्हारकी व तराळकी. रात्री कुणाला काहीच न सांगता कृष्णा मुंबईला निघतो. बावऱ्या महार नावाचा एक व्यक्ती आधीच मुंबईला गेलेला असतो. बावऱ्या हा कृष्णाच्याच गावचा असतो. तो मुंबईला राहतो पण गावात त्याचा एक मोठा मळा असतो. त्या मळयात गणा राबत असतो. गणा कृष्णाचा भाऊ असतो. बावऱ्या मुंबईहून ज्यावेळी गावात यायचा त्यावेळी कृष्णाला भेटून म्हणायचा की गावात का राहतो? मुंबईला ये, तिथे कामं मिळतात. बावऱ्याच्या सांगण्यावरून कृष्णा गाव सोडून मुंबईला जातो. मुंबईत तो एका हॉटेलवर जातो. ते हॉटेल बामणाचे असते. त्या हॉटेलचा मालक मामा कृष्णाला चहा देतो. कृष्णा हा एक चांगला ढोलकी वादक आहे हे कळताच मामा त्याला मोगराबाईच्या तमाशामध्ये ढोलकी वाजवण्याचे काम देतो. कृष्णा सुशिक्षित नसल्याने त्याची फजिती होते. मामा मात्र कायम त्याला पाठिंबा देतो. कृष्णा तमाशात काम करून गावात मळा घेण्याचे स्वप्न पाहतो. वर्षभर तो मोगराबाईकडे काम करतो. मोगराबाई त्याच्यावर जीव लावते. गावात देवा मुलाची वाट पाहतो. मुंबईहून गावात कृष्णा पत्र पाठवतो. ते पत्र वाचून देवाला धक्काच बसतो कारण कृष्णा तिथे तमाशात ढोलकी वाजवायचे काम करीत असतो. मुंबईला जाऊन काम करणे हे देवाला आवडत नसे. त्यामुळे त्याला खूप वाईट वाटते. तो गावची कामे करण्यातच धन्यता मानत असे. मुंबईला जाऊन ढोलकी वाजवायचे काम करीत असल्यामुळे देवाला वाईट वाटते व तो आपला मुलगा मेला असे समजून त्याला सोडून देतो.

कृष्णाच्या मागे त्याच्या कुटुंबाची काळजी गणा व देवा घेऊ लागतात. त्यांची तरीही आबाळ होते. अशात वृद्ध देवा पंढरीच्या वारीला जाण्याचे ठरवितो. विठ्ठलाचे दर्शन घेऊन परत येताना त्याचा मृत्यू होतो. आपल्या भावाच्या शोधात गणा मुंबईला जातो. मुंबईला मोगरा कृष्णाला फसविते. त्याच्या कष्टाचे पैसे ती त्याला देत नाही. बायको, पोरांना विसर आणि आपल्याकडे रहा अशी सांगते. परंतु कृष्णाचा आपल्या कुटुंबावर खूप जीव असतो. तो तिला सरळ नकार देतो. त्यामुळे कृष्णाची तिच्याकडून व तिच्या गुंडांकडून पिटाई होते. कृष्णाला तेथून हाकलण्यात येते. मुंबईसारख्या शहरात कृष्णा परत एकटा पडतो. मामाच्या हॉटेलवर जातो. मामा त्याची विचारपूस करून परत त्याला कामाला

लावतात. कृष्णा दिवसभर बाहेर काम करून रात्री झोपण्यासाठी मात्र मामांच्या हॉटेलवर येतो. मामांना हॉटेलच्या गल्ल्यावर बसल्या असताना चष्म्यातून आला गेला माणूस बघायची सवय होती. तसे बघत बसलेले असताना रस्त्यावरच्या पानपट्टीच्या दुकानासमोर मोगरी एका गोऱ्यागोमट्या माणसाबरोबर हसत असलेली मामा बघतात. तरातरा ते कृष्णापाशी येतात. कृष्णाला म्हणतात की 'कृष्णा, तुझी सटवी ती बघ! नवा कुणी पकडला वाटते?' कृष्णाने बघितले तर मोगरी आणि गणा हसत- बोलत उभी होती. कृष्णाचा चेहरा काळानिळा होतो. भीतीची एक शिणक त्याच्या छातीतून उठते. हाताने छाती चोळीत कृष्णा बोलतो, 'अरे देवा, मी काय बघतोय हे?' असे म्हणून आडोशाला जाऊन बसतो. मामा धावतात व घबऱ्या घाबऱ्या म्हणतात काय झाले? कृष्णा म्हणतो काही नाही मामा, छातीत कळ आली.' कृष्णाच्या छातीत कळ यायचे कारण म्हणजे मोगरा बरोबर असलेला मुलगा कृष्णाचा भाऊ असतो. तिच्या तावडीतून भावाला सोडण्यासाठी कृष्णा खूप प्रयत्न करतो. त्या आधीच म्हणजे ज्यावेळी तिला कळते की गणा कृष्णाचा भाऊ आहे. त्याचवेळी ती गणाला भावाबद्दल व भावजयीबद्दल खूप काही वाईट वाईट सांगितलेले असते. ती गणाला सांगते की कृष्णा तुझ्यावर नाराज आहे, कारण कृष्णा मुंबईला आल्यानंतर तुझा भावजयीसोबत संबंध होता. हे ऐकून गणाला खूप वाईट वाटते. भावाच्या अशा संशयखोर स्वभावामुळे गणा अतिशय दुःखी होतो. मोगराच्या तावडीतून सोडवायला आलेल्या भावालाच गणा मारतो. दोघा भावांमध्ये भांडण लावून थेअटरातील लोक व मोगरा पळून जातात. गणाने मारहाण केल्यामुळे कृष्णाचे डोके फुटते. गणा तसाच नंतर आपल्या रूमवर येतो. पाहतो तर तातेराव नावाच्या एका दुसऱ्या माणसाच्या गळयात गळा टाकून मोगरा झोपलेली असते. ज्यावेळी गणा मोगराला असे करण्यामागचे कारण विचारतो तेव्हा ती म्हणते, कृष्णाचा बदला घेण्यासाठी हे सगळे केले आहे. यातून गणाला आपली चूक कळून येते. दुसऱ्या दिवशी कृष्णाची व त्याची मामांच्या हॉटेलवर भेट होते. दोघेही एकमेकांना मिठी मारून रडतात. नंतर आपल्या गावातील बावऱ्या महारकडे जातात. त्याच्याकडे दोन दिवस राहून, गोडधोड खाऊन, गणा परत गावाला जाण्यासाठी बाहेर पडतो. लेकीसाठी, बायकोसाठी कृष्णा भावाकडे कपडे पाठवतो. वडील गेल्याची खबर ऐकून कृष्णाला रडू कोसळते. काही वर्षे बावऱ्या महाराकडे राहूनच कृष्णा पैसे कमवू लागला. गावात गुरवाच्या बेवारशी म्हातारीने दोन एकरांचा मळा विकायला काढलेला होता. मुंबईहून कृष्णा बावऱ्याच्या कुटुंबासह गावी येतो व तो मळा विकत घेतो. गणाला बावऱ्या आपली मुलगी देतो. सुशिक्षित मालन आपल्या घरी कशी काय राहील?

असे कृष्णाला व गणाला वाटू लागते. परंतु  बावऱ्या म्हणतो ‘अडाणी बावऱ्याची लेख आहे ती. गणाला शहाणं करेल, सगळया म्हारुड्याला शहाणपण शिकवेल.’ मालनला सुद्धा हे सर्व आवडते. ती देखील राजी होते. गावची महारकी सोडून मुंबईला जाऊन कृष्णा मळा विकत घेण्याचे स्वप्न पूर्ण करतो. मळयात उभा राहून ‘बायकोचा चुड्याचा हात धरून तो उत्तेजित स्वरात म्हणतो, ‘ रखमे, रखमे बघ. हे आपले रान. माझा म्हातारा हे बघायला जगला नाही.’ असे म्हणून मळयातील काळी माती डोक्याला लावतो व ओंजळीत घेतलेली माती कपाळाला लावून, म्हाताऱ्याची आठवण काढून कृष्णाच्या डोळयातून पाण्याच्या धारा वाहतात. आपले स्वप्न पूर्ण झाले व आपल्या बरोबर आपले वडील नाहीत याच दुःखाने कादंबरी संपते.

## ३.५.२ पुढचं पाऊल कादंबरीतील व्यक्तिरेखा

या कादंबरीत देवा, कृष्णा, गणा, रखमा मुख्य व्यक्तिरेखा आहेत, तर बावऱ्या, मामा चिपळूणकर, तुका पाटील, मालन ह्या गौण व्यक्तिरेखा आहेत. त्याचप्रमाणे भोजा, तात्याकाका, बिंच्या, रश्शी इत्यादी व्यक्तिरेखा प्रसंगानुरूप पुढे येताना दिसतात.

### १. देवा (वडील)

देवा हा कृष्णाचा व गणाचा वडील असतो. त्याचे शरीर खाल्ले प्यालेले असते. अंगापिंडाने तो चांगला जवान असतो. त्याचा जबडासुद्धा वाघासारखा असतो. भल्यामोठ्या मिशांमुळे तो अधिकच मोठा वाटे. देवा एक सज्जन महार असतो. कृष्णा ज्यावेळी डॉक्टरला मारहाण करतो त्यावेळी देवाच सगळे सांभाळून घेण्याचा प्रयत्न करतो. कृष्णा मुंबईला जाऊन तमाशात काम करीत आहे हे त्याच्या लक्षात येते तेव्हा देवा संतापतो. त्याला असे वाटते की तमाशात गेल्यामुळे कृष्णाने घराण्याचे नाव बुडविले. तो गावची कामे करण्यातच धन्यता मानणारा असतो. यावरून देवाची विचार करण्याची वृत्ती प्रत्ययास येते. न सांगता घर सोडून गेल्यामुळे कृष्णा आपल्यासाठी मेला असे म्हणतो. कृष्णा गाव सोडून गेल्यामुळे त्याला दुःख होते पण नंतर तो आपल्या सुनेला नवरा मेलेल्या बायका जगतात त्याप्रमाणे जगायला सांगतो. दोन पोरं आहेत त्यांच्याकडे बघून जग असे सांगतो. आपल्या जिवात जीव आहे, तोपर्यंत हाडाची काडे करून तुला सांभाळीन असे सांगतो. आपल्या सूनेला मुलगीप्रमाणे वागवत असतो. ज्यावेळी रखमा त्याला सांगते की आपल्याला होणार नाही असे जगायला तेव्हा तो तिला म्हणतो

पाटाचा दाल्ला कर आनी जा तोंड काळे करून. म्हाताऱ्याने भावजयीला असे म्हटलेले गणाला सहन होत नाही व तो आपल्या वडिलांना मारायला जातो. कृष्णाच्या मागे देवा कुटुंबाची देखभाल करू लागतो. त्याला आपल्या जातीचा वर्ग असतो. थोरला मुलगा परागंदा झाला व धाकटा मारायला आला तेव्हापासून देवा खालीच झाला. सून देते ते खाऊ लागला व मुक्यानेच नातवंडांच्या पाठीवरून हात फिरवीत राहू लागला. म्हातारपणी त्याला पंढरपूरला जायची इच्छा होते. वारीला जाऊन आपल्यानंतर त्याचा मृत्यू होतो. देवडीतला एक चांगला महार नाहीसा झाला होता.

### २. कृष्णा

कृष्णा हा या कादंबरीतील नायक आहे. कृष्णा हा देवाचा थोरला मुलगा असतो. तो ढोलकी वादक असतो. सांगावा सांगणे यांसारखी तराळाची कामे तो करीत असतो. एके दिवशी गावात डॉक्टर लस टोचण्यासाठी आलेले असतात. कृष्णा गावात फिरून घोषणा देतो तरी देखील कोणीच येत नाही. गावचा पाटील कृष्णावर ओरडतो. कृष्णा सगळ्यांना सांगतो की आपण सगळ्यांना सांगितले आहे. यावरून कृष्णाचे व डॉक्टरचे भांडण होते. कृष्णाचे वडील त्याला माफी मागण्यास सांगतो. कृष्णाला माफी मागल्यामुळे अपमान व लाजिरवाणे जगणे वाटते. त्याला असले जगणे नको असते म्हणून तो कुणालाच काही न सांगता मुंबईला जातो. मुंबईला मोगरीच्या हाताखाली काम करतो. कुटुंबाला सोडून आपल्याकडे रहा असे त्याला मोगरी सांगते. ती त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करते. कृष्णा मात्र तिच्या जवळ जाताना दिसत नाही. तो आपल्या परिवाराशी प्रमाणिक असतो. स्वभावाने तो भिडस्त व भाबड्या असतो. याचाच फायदा मोगरी घेते. गावात एक मळा घ्यायचा हे त्याचे स्वप्न होते व ते स्वप्न साकार करण्यासाठी त्याने केलेली मेहनत पूर्ण कादंबरीत पाहावयास मिळते. आपल्या भावाला मोगरीच्या तावडीतून सोडवून आणण्यासाठी तो गणाचा मार सहन करतो. आपले स्वप्न पूर्ण झाले पण वडील आपल्यापासून दूर गेले म्हणून तो खूप रडतो.

### ३. गणा

गणा हा कृष्णाचा धाकटा भाऊ असतो. बावऱ्या महार याच्या मळ्यात गणा राबत असतो. कृष्णा घर सोडून गेला ह्याचे दुःख गणालाही होते पण तरी तो भावजयीची समजूत घालताना दिसून येतो.

गणा आपल्या कुटुंबावर जीवापाड प्रेम करतो. ज्यावेळी भावजयी बाजरीची भाकरी करते त्यावेळी ती खात असताना गणाला रडू येते, कारण बाजरीची भाकरी ही कृष्णाची आवडती भाकरी असते. तो नाहीसा झाल्यामुळे त्याच्या आठवणीने तो ती भाकरी न खाता पानावरून उठतो. यावरून आपल्या भावाप्रती असलेले गणाचे प्रेम स्पष्ट होते. तो आपल्या भावाच्या मुलांना आपलीच मुले समजून वागवत असे. ज्यावेळी देवा रखमाशी तुच्छ भाषेत बोलतो तेव्हा देवा आपला वडील आहे, याचे भान न ठेवता तो त्याला मारायला जातो. यावरून तो स्त्रीचा किती आदर करतो हे स्पष्ट होते. ज्यावेळी आपल्या भावाला शोधण्यासाठी गणा मुंबईला जातो तेव्हा तो मोगरीच्या जाळयात सापडतो. मोगरी त्याचे कान भरते. कुटुंबाबद्दल वाईट वाईट सांगून कृष्णा व गणा यांच्यात दुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न करते व ती सफल होते. ज्यावेळी कृष्णा गणाला मोगरीच्या तावडीतून सोडण्यासाठी येतो, त्यावेळी गणाच कृष्णाला बेदम मारतो. नंतर सत्य काय याची कल्पना आल्यानंतर गणा कृष्णाला मिठी मारून रडरड रडतो. शेवटी पूर्वीसारखे भाऊ-भाऊ परत एकत्र राहू लागतात.

## ४. रखमा

रखमा ही कृष्णाची पत्नी असते. महारवाड्यातील रामनाक नावाच्या एका पराक्रमी महार पुरुषाची रखमा ही नातसून असते. कृष्णा न सांगता मुंबईला गेल्यापासून रखमा आपल्या दोन्ही मुलांची, म्हातारा सासरा देवा व दीर गणा यांची काळजी घेते. रखमाच्या माध्यमातून दलित स्त्रीचे चित्रण या कादंबरीत आलेले आहे. आपला संसार करताना कधीच कुणाचे काही घेऊ नये असे म्हणणारी, घरच्यांची काळजी घेणारी रखमा दुःखी दाखविलेली आहे. सकाळ झाली व रखमा उठते. जागरणाने सुकलेली रखमा तशीच कामाला लागते. शेरडीला बाभळीचा पाला, पोरांना भाकरी, गणाला दूध व म्हाताऱ्याला काला हे सगळे करता करता रखमा स्वतःशीच म्हणत होती, "येत्याल दोन- चार रोजांत. त्यांना तरी काय माया न्हाई?"[३३] नवऱ्याच्या माघारी चटके सोसावे लागल्यामुळे ती आपल्या मनाची समजूत काढताना दिसून येते. दोन- चार रोज उलटून गेले तरी मात्र कृष्णा आलेला नसतो. गावची तराळकी करण्याचा देवाचा काळ संपतो. घरात गणा एकटाच कमवणारा असतो. घरच्यांची जबाबदारी गणावर येते. अशातच बापासारखा कायम पाठीशी उभा असणारा सासरा पांढरीहून आल्यावर त्यांचे

निधन होते. ही गोष्ट तिला अधिक अस्वस्थ करते. अशा या गरिबीतही मुलांची काळजी घेणारी रखमा व नवऱ्याच्या आठवणीत रोज तुटणारी रखमा लेखकांनी या कादंबरीत उभी केली आहे.

## ५. मोगरी

मोगरी ही मुंबईत एका चंद्रविलास तमाशाच्या थेअटरमध्ये नाचण्याचे काम करीत असते. प्रामुख्याने दलित स्त्री पूर्वी तमाशात नाचकाम करणाऱ्या स्त्रिया असायच्या. या कादंबरीत मोगरीच्या जातीचा उल्लेख कुठेही केलेला दिसून येत नाही, परंतु तत्कालीन परिस्थितीनुसार ती याच समुदायातील असल्याचे दिसते. ह्याच मोगरीकडे कृष्णा काम करीत असतो. मोगरीचे चित्रण या कादंबरीत अप्रामाणिक नगरीतील फसविणाऱ्या लोकांसारखे लेखकांनी केलेले आहे. मुंबईही लुबाडणूक करणारी नगरी असल्यामुळे या नगरीत गरीब, अशिक्षित, सामान्य माणसाला वावरत असताना फार सांभाळून वावरावे लागत असे. मोगरी कृष्णा सारख्या अशिक्षित, साध्या, सरळ स्वभावाच्या माणसाला फसवते. ती त्याच्या मेहनतीचे पैसे देण्यास नाकारते. यामुळे या कादंबरीत मोगरीच्या माध्यमाने या लुबाडणूक नगरीचे प्रतिबिंब व्यंकटेश माडगूळकरांनी दाखवले आहे असे वाटल्याशिवाय राहवत नाही. मोगरी कृष्णाला आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करते. कृष्णा मात्र तिच्यापासून दूर राहतो. त्यामुळे रागावलेली मोगरी कृष्णाला मारते व हाकलून देते. जेव्हा कृष्णाचा शोध घेण्यासाठी गणा मुंबईला येतो तेव्हा प्रथम मोगरीच्या जाळयात अडकतो. मोगरी या दोन्ही भावांमध्ये फूट घालण्याचा प्रयत्न करते. भावलाच भावाला मारण्यासाठी प्रवृत्त करताना दिसते.

## ६. बावऱ्या नाना

बावऱ्या नाना हा कृष्णाच्याच गावचा असतो. मुंबईत तो मोकरी करीत असतो. तेथे गिरणीत काम करून पैसे मिळवीत असतो. त्या पैशाचे गावात मळा घेतो. त्या मळ्यात गणा राबत असतो. स्वतःच्या मुलीला सुशिक्षित करतो. जरी बावऱ्या मुंबईला राहत असला तरी तो आपल्या गावाला व गावातील लोकांना विसरला नव्हता. बावऱ्या आपल्याला जमेल त्या पद्धतीने मुंबईत असताना कृष्णाला सतत मदतीचा हात पुढे करताना दिसून येतात. धोंडीमामाला असे वाटायचे की एखादा महार गाव सोडून

मुंबईला गेला की त्याच्या स्वभावात, वागण्यात- बोलण्यात बदल होतो. कारण त्याला असा अनुभव आलेला असतो. तसे मात्र बावऱ्या नानाच्या बाबतीत पाहावयास मिळत नाही.

### ७. मामा चिपळूणकर

मामा चिपळूणकर यांचे मुंबईत हॉटेल असते. जरी ते कायद्याला भिऊन वागणारे असले तरी स्वभावाने मात्र फार चांगले असते. मुंबईत गेल्यानंतर कृष्णाला प्रथम मामाचं कामाला लावतात. तमाशातून हाकलून दिलेल्या कृष्णाला मामाचाच आधार मिळतो. कसे वागायचे, काय करायचे हे सगळे व्यवहारी मामाच कृष्णाला शिकवत असतात. ते त्याला सांगतात की' धीर सोडू नकोस, दूसरे काम बघ. ह्या मुंबईत कुणीच उपाशी मरत नाही. आलाच अन्नाचा प्रश्न तर आपल्याकडे ये. मी इथेच आहे.' मामांच्या अशा बोलण्यावरून अशी कल्पना येते की तो इतरांना कशी मदत करीत असणार. मामा कृष्णाला आपल्याच घरच्या माणसांसारखे वागवताना दिसून येतात. शेवटी मामाच कृष्णा व गणा यांची भेट घडवतो. मुंबईसारख्या शहरात चांगली माणसेही असतात याचे प्रतिबिंब म्हणून मामाकडे पाहिले तर चुकीचे ठरणार नाही.

### ३.५.३ पुढचं पाऊल कादंबरीतील वातावरण

व्यंकटेश माडगूळकरांनी 'पुढचं पाऊल' ह्या कादंबरीतील वातावरण हुबेहूब साकारलेले आहे. या कादंबरीत गाव ओढ्याच्या काठावर वसलेला महारवाडा, तिथे राहणाऱ्या लोकांचे ओबडधोबड खोपटे, तेथील वातावरण, महारांची उघडी- नागडी पोरे, तेथील लोकांच्या खोपटातील वातावरण लेखकांनी निर्माण केले आहे. या कादंबरीत आलेला देवा, त्याचा थोरला मुलगा कृष्णा, त्यांची पत्नी रखमा, व देवाचा धाकटा मुलगा गणा यांच्यातील आपुलकीचे नाते लेखकांनी अतिशय सुंदर पद्धतीने मांडलेले आहे. यामुळे कादंबरीतील वातावरण डोळयांसमोर उभे राहते. कृष्णा व गणा यांचे वर्णन करताना निर्माण केलेले वातावरणही मनाला भावते. कृष्णा मध्यरात्री मुंबईला निघून जातो. त्या मुंबई नगरीचे वर्णन वाचताना त्यातील वातावरण निर्मितीमुळे मुंबई नगरी देखील वाचकांच्या डोळयांसमोर उभी राहते. पृष्ठ क्रमांक २७ वर सविस्तर वर्णन वाचायला मिळेल. मुंबईत कृष्णाला भेटलेल्या मोगरीच्या वर्णनामुळे तिचा नाच देखील डोळयासमोर येतो. कृष्णा मुंबईला गेल्यानंतर गणा आपल्या वडिलांची,

भावाच्या पत्नीची व भावाच्या दोन छोट्या मुलांची काळजी घेताना केलेले वर्णन व त्यांच्यामुळे निर्माण होणारे प्रसंग काळजाला टोचतात. यामुळे कळत नकळत वाचकांचे डोळे भरून येतात.

मुंबईत कृष्णा व गणा यांची मामांच्या हॉटेलवर ज्यावेळी भेट होते. तेव्हा लेखक लिहितात 'एके दिवशी रात्री ज्यावेळी मामा दुकानाच्या फळया लावीत होते. तिथे येऊन गणा म्हणाला, "चहा मिळेल का ?" मामांनी त्याला न्याहाळला व म्हटले दुकान बंद झाले बाबा. मुंबईतला ना तू, ठाऊक नाही तुला? मुंबईचा नाही मी. मग कुठचा? कोकणातला दिसत नाही. तिकडचा नाही, सांगलीकडचा आहे देवडीचा. देवडीचा? म्हणजे कृष्णाच्या गावचा? कृष्णाचे नाव ऐकताच गणा घाबरा झाला. कृष्णा महार, देवडीचा? माहित आहे तुम्हाला? कुठे आहे तो? 'मी भाऊ त्याचा, गणा." मग मामांनाही आश्चर्य वाटले. आत गेले व तोंडावर पांघरून घेऊन उगीच पडलेल्या कृष्णाला उठवून म्हणाले, "ये रे कृष्णा भाऊ आला आहे तुझा." कृष्णा धडपडून उठतो. 'गणा गणा' करून बाहेर येतो. धाकट्या भावाला घट्ट मिठी मारतो. त्याच्या डोळयातून पाणाच्या धारा लागतात. गणाला रडूच आवरेना. त्याचे सगळे अंग हादरू लागते. तसा त्याच्या डोक्यावरून हात फिरवीत कृष्णा म्हणतो "गप रे गप." अशा अनेक प्रसंगातून केलेली वातावरण निर्मिती एका वेगळया उंचीवर नेऊन ठेवते. हा प्रसंग वाचताना वाचकाचे काळीज खाली पडते.

आणखी एका प्रसंगामुळे वाचकाचे मन खिन्न होते. ज्यावेळी भोजा येतो व घाबऱ्या घाबऱ्या गणाला म्हणतो की गणा घराकडे चल. त्यावेळी आता काहीतरी वाईट होणार आहे असे वाटते कारण त्यावेळी देवा पंढरपूरला गेलेला असतो. ज्यावेळी गणा घराकडे पोहोचला तेव्हा त्याच्या घरासमोर एक गाडी उभी होती. वारीहून परतलेले काही अनोळखी महार होते. गणाच्या घराभोवती माणसे जमली होती व आतून रखमाचा आणि रशीचा रडण्याचा आवाज येत होता. गणाच्या काळजाचे पाणीपाणी होते. त्याच्या काळजाचे जसे पाणीपाणी होते तसेच वाचकाचेही मनाचे होते. भयावह व मन खिन्न पडणारे अनेक प्रसंग या कादंबरीत आलेले आहेत. कादंबरीचा शेवट कृष्णाचे स्वप्न साकार झाल्याने होते. त्याने दोन एकरचा मळा घेतलेला असतो. तेव्हा बांधावर उभा राहून कृष्णा चौफेर दृष्टी टाकतो. त्याचे मन आनंदाने भरून येते. बायकोचा चुडूयाचा हात धरून तो उत्तेजित स्वरात म्हणतो 'रखमे, रखमे बघ. हे आपले रान. आपली काळी ही.' असे म्हणत तो पैशाच्या ढिगातून रूपयाची ओंजळ भरून घ्यावी तशी त्याने ती सुगंधी माती ओंजळीत घेतली, तिचा वास घेतला. ती कपाळाला लावली. त्याच्या

डोळ्यांतून पाण्याच्या धारा येऊ लागल्या. निळया आभाळाकडे बघत तो सावकाशीने बोलतो, ‘म्हातारा हे बघायला जगला नाही.’ अशा आनंदी व दुःखी वातावरणाने कादंबरीचा शेवट होतो.

## ३.५.४ पुढचं पाऊल कादंबरीची भाषा

या कादंबरीत व्यंकटेश माडगूळकर यांनी निवेदनासाठी ग्रामीण भागातील भाषा वापरली आहे तर संवादासाठी ग्रामीण बोली भाषेचाच वापर केला आहे. ह्या कादंबरीत तृतीय पुरुषी निवेदनाचा वापर केलेला आहे. ही कादंबरी गावगाड्यातील जीवनावर आधारित असल्यामुळे या कादंबरीतील संवादलेखन हे त्यांच्यात मेळ घालण्याची बाजू आहे. या कादंबरीत गावगाड्यातील तसेच देवा व त्यांच्या कुटुंबातील संवाद लेखकांनी अनेकवेळा ग्रामीण बोली भाषेत मांडलेले दिसून येते. एकदा रखमाच्या वाड्यात हातावर, कपाळावर गोंदणारी बाई येते. रश्शीला कपाळावर चांद काढायचा असतो पण रखमाकडे तेवढे पैसे नसतात. तिचा दीर गणा तिच्याकडे पैसे देतो. नंतर रश्शीला चांद काढताना दुखू लागल्याने ती चांद काढत नाही. रखमा आपण आपल्या पतीचे नाव गोंदण्यासाठी बसते. परंतु ग्रामीण भागातील स्त्रिया आपल्या पतीचे नाव घेताना लाजतात, त्या थेट नाव घेत नसतात. तेव्हा गोंदणारीला नाव सांगत असताना लेखकांनी मजेशीर असा संवाद मांडला आहे. ती बाई रखमाला पतीचे नाव विचारते. रखमा आपण न सांगता आपल्या मुलाला नाव सांगण्यास सांगते. ती बिंच्याला म्हणते,

“सांग रे बिंच्या.”

“काय?”

“बाचं नाव सांग तुज्या.”

“बाबा.”

त्यावर लटक्या रागाने रखमा बोलते, “आं, बाबा कसं आसंल?”

पण गोंदणारणीला हे उखाणे- पाखाणे परवडण्यासारखे नव्हते. कपाळाला आठ्या घालून ती बोलते, “सांग बया बिगी, उशीर हुतुया मला.”

मग रखमा बिंच्याचा नाद सोडते. म्हणते,

“देवाचंच नाव हाय बया.”

“संकर?”

“न्हवं, गोकुळातला देव!”

“मुकिंदा?”

“न्हवं.”

“गोपाळा?”

“त्येबी न्हवं.”

रखमाच्या पतीचे नाव कृष्णा असते. आई गोंदणारीण यांच्या तोंडाकडे पाहणाऱ्या बिंच्याच्या डोक्यात एकदम प्रकाश पडतो. टाळ्या पिटून तो ओरडू लागतो, मी सांगतो “ढोलकीवाला किस्ना.”[३४]

एकदा लावणी चालू असताना कृष्णा ढोलकी वाजवत होता त्यावेळी त्याला मागून साद येते, “किस्न्या, ए किस्न्या तराळ! एवढा झटक्यानं बरा उठलास? मी काय पाटील नव्हं. जरा कडक साद आली, म्हनलं, पाटीलच आलं म्हारुड्यात. मी आलोय पा पाटलाकडनंच. का वं, काम निघालं काय? हां, दवंडी करायची हाय गावात. डागदार येनार हाय सकाळच्या पारी.”[३५]

अशा विविध संवादातून ही कादंबरी रंगत जाते. कित्येक प्रसंग या कादंबरीत लेखकांनी मांडलेले आहे. कादंबरीतील वातावरण कधी हलकेफुलके तर गंभीर केलेले आहे.

## ३.६ समारोप

प्रस्तुत प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर यांच्या ‘बनगरवाडी’, ‘सत्तांतर’, ‘करुणाष्टक’, ‘वावटळ’, ‘पुढचं पाऊल’ इत्यादी कादंबऱ्यांचा अभ्यास केला आहे.

‘बनगरवाडी’ या कादंबरीचे कथानक फार गुंतागुंतीचे असून नायकाच्या बरोबरच वाचकही उदास, अस्वस्थ, आनंदी होत राहतो. कादंबरीतील पात्रे, त्यांची वृत्ती, नायकाशी त्यांचा येणारा अनेक प्रकारचा संबंध, त्यांचे स्वभाव इत्यादीमुळे बनगरवाडी जीवित वाटते. यात असलेल्या व्यक्तिरेखांमध्ये

कुणीच अगदी सदगुणांचा पुतळा नसतो वा कुणीच पूर्णपणे खल वृत्तीचा नसतो. स्वार्थातून दादू बालट्याचा दुष्टपणा निर्माण झालेला असतो. ह्यात आलेली व्यक्तिरेखा हाडा-मासांची, खरीखुरी माणसेच आहेत असे वाटते. “रवींद्र ठाकूर यांच्या मते बनगरवाडीने प्रादेशिक कादंबरीचा नवा मानदंड निर्माण केला तर डॉ. रत्नाकर मंचरकरच्या मते, मराठी ग्रामीण कादंबरीतील मैलाचा दगड ठराविक अशाच तोलामोलाची ही बनगरवाडी आहे.”[३६]

‘करुणाष्टक’ या कादंबरीत पोटासाठी गावोगावी फिरत राहावे लागणाऱ्या एका कुटुंबाची कहाणी आहे. मनात घर करते ती लेखकाची ‘आई’. मनाने खूप मोठी, घरगुती औषधांची फार चांगले ज्ञान असणारी, जातपात न मानता लोकांना आपलेसे करून घेणारी, चिवटपणे मुलांचे मोठे- मोठे आजार काढणारी, एके दिवशी आई सोडूनही जाते याचे उत्कट वर्णन या कादंबरीत झालेले आहे. एकंदरीत ही जरी आत्मचरित्रात्मक कादंबरी असली तरी ‘स्त्रीप्रधान’ असल्याचे दिसून येते. याचे कारण म्हणजे ही पूर्ण कादंबरी ‘आई’ या व्यक्तिरेखाभोवती फिरत राहते व आईच या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. तिच्या सर्वगुणसंपन्नतेचे दर्शन घडते. शेवट आईचा सत्कार व नंतर तिच्या होणाऱ्या मृत्यूने होतो. पूर्ण कादंबरीत संघर्ष जाणवतो व त्यातून बाहेर पडण्यासाठी मार्ग शोधण्याचे कार्य आई पार पाडते.

‘वावटळ’ या कादंबरीत व्यंकटेश माडगूळकरांनी गांधीवधानंतर ग्रामीण भागात मुख्यतः लेखकाच्या ‘चोपडी’ या गावात व त्यांच्या मित्रांच्या ‘नांदवडी’ या गावात ब्राह्मणांची घरे लुटल्यानंतर व जाळल्यानंतर त्यांच्या एकूण मनस्थितीची व अवस्थेची अचूक मांडणी केलेली आहे. पाहिल्या प्रकरणात गांधीवध केव्हा, कुठे व कसा झाला याची बातमी सांगण्यात आली आहे. पुढे पुण्यात उसळलेली दंगल व संचारबंदी यांची माहिती आलेली असून लेखक व त्यांच्याबरोबर त्यांचे मित्र गावाकडे निघतात हे सांगण्यात आले आहे. दुसरे प्रकरण त्यांचा प्रवास स्पष्ट करते. लेखक व त्यांच्याबरोबर असलेल्या मित्रांना गावाकडे निघताना कोणकोणत्या गोष्टी सहन कराव्या लागल्या हे सांगितले आहे. त्यानंतर कशाप्रकारे ब्राह्मणेत्तर लोकांनी ब्राह्मण लोकांची घरे जाळली, लुटली याचे वर्णन केले आहे.

‘सत्तांतर’ या व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबरीतील वानर परिवारातील सत्तासंघर्ष, सत्तालोभ याचे चित्रण मानवी पातळीवरून झालेले आहे. जरी ह्या कादंबरीचे केंद्रस्थान वानर असले तरी

मानवाच्या संघर्षाचे चित्र या कादंबरीतून प्रकट झाल्यासारखे वाटते. ज्याप्रमाणे मानवाच्या ताकदवान टोळया आपल्यापेक्षा कमकुवत टोळयावर हल्ला करून त्यांना हुसकावून त्या प्रांतात आपली सत्ता स्थापना करतात हा इतिहास प्राचीन आहे. लेखकाने मोगा, लालबुड्या, व मुडा या टोळींच्या परिवाराचा, सत्तासंघर्षाचे सुरेख चित्रण यात केलेले आहे. वानराच्या परिवाराचे वागणे, राहणे, परिवार वाढविणे, संरक्षण करणे, खेळणे, संघर्ष इत्यादी बाबींचा अगदी बारीसारीक असा अभ्यास लेखकाचा असल्याचे दिसून येते.

'पुढचं पाऊल' या कादंबरीत लेखकांनी एका दलित कलावंताच्या जीवनाबद्दल मांडलेले आहे. त्याच्यावर होणारा अन्याय, त्याबद्दलची त्याची चीड, स्वप्न साकार करण्यासाठी अनेक केलेले प्रयत्न, गाव सोडून मुंबईला जाऊन प्रगतीचा मार्ग शोधण्यासाठी केलेली दलित मनाची धडपड या कादंबरीत व्यंकटेश माडगूळकर यांनी अत्यंत सुंदर पद्धतीने चित्रित केले आहे.

## ३.७ निष्कर्ष

१. या सर्व कादंबऱ्यांचा एकत्रितपणे विचार केला की कादंबरीकार माडगूळकरांचे सामर्थ्य जाणवते. त्यांच्या कादंबऱ्यांचा एकच एक विषय नसून विविधांगी विषय त्यांनी हाताळलेले आहेत.

२. सत्तांतर ही त्यांची कादंबरी प्रतिकात्मक आहे. ही पूर्ण कादंबरी प्राणीसृष्टीवर अवलंबून आहे.

३. 'बनगरवाडी' ही माणदेशी भागात राहणाऱ्या धनगरांची जीवनपद्धती दाखवणारी कादंबरी आहे. धनगर समाजाचा एक वेगळा पट बनगरवाडीच्या माध्यमातून व्यंकटेश माडगूळकरांनी मांडला आहे.

४. वावटळ, करुणाष्टक या त्यांच्या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्यातून लेखकाचा जीवनप्रवास प्रत्ययास येतो. 'सामाजिक वेध' वावटळ या कादंबरीचे लेखन करताना व्यंकटेश माडगूळकर यांनी घेतला आहे.

५. माडगूळकरांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा अतिशय साध्या, स्वभावनिष्ठ जीवन जगणाऱ्या आहेत. त्यांचे वर्णन वाचताना जणू आपल्यातलेच कोणी आहे असे वाटते.

६. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरीत येणारा निसर्ग मानवी जीवनाचाच एक भाग बनून येतो.

७. व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या कादंबऱ्यात घटना-प्रसंगानुरूप समर्पक असे वातावरण निर्माण केलेले आहे.

८. व्यंकटेश माडगूळकर यांनी निवेदनासाठी प्रमाण भाषा तर संवादासाठी बोली भाषेचा वापर केला आहे.

## संदर्भ

१. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. ११८.

२. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. ११६.

३. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. ३.

४. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. १.

५. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. १.

६. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. २.

७. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. २.

८. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. ७.

९. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. ४.

१०. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. ७.

११. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. ५५.

१२. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. २.

१३. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. २.

१४. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९८३, पृ. ७८.

१५. माडगूळकर, व्यंकटेश. “बनगरवाडी.” मौज प्रकाशन, १९८३, पृ. ७४.

१६. माडगूळकर, व्यंकटेश. “बनगरवाडी.” मौज प्रकाशन, १९८३, पृ. ८४.

१७. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. ७.

१८. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. १९.

१९. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. ३६.

२०. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. २१.

२१. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. ८६.

२२. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. ८०.

२३. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. ११.

२४. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. २१.

२५. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. १२०.

२६. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. १२५.

२७. माडगूळकर, व्यंकटेश. “वावटळ.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. ४०.

२८. माडगूळकर, व्यंकटेश. “वावटळ.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. ५५.

२९. माडगूळकर, व्यंकटेश. “वावटळ.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. १.

३०. माडगूळकर, व्यंकटेश. “सत्तांतर.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. १.

३१. माडगूळकर, व्यंकटेश. “सत्तांतर.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. ३.

३२. माडगूळकर, व्यंकटेश. “पुढचं पाऊल.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. ३.

३३. माडगूळकर, व्यंकटेश. “पुढचं पाऊल.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. २६.

३४. माडगूळकर, व्यंकटेश. "पुढचं पाऊल." मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. २४.

३५. माडगूळकर, व्यंकटेश. "पुढचं पाऊल." मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२, पृ. २.

३६. विभुते, शंकर. "आधुनिक मराठी कादंबरीतील सामाजिकता." सूर्यमुद्रा प्रकाशन, २०१५, पृ. ६३.

# प्रकरण ४

# व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन

## प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यातून दिसून येणारा संघर्ष व व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये यांचा आढावा घेण्याचे ठरविलेले आहे. मराठी साहित्यात संघर्षही तेवढाच महत्त्वाचा मानला जातो. संघर्ष म्हणत असताना दोन विरोधी पक्ष पाहिजेच असे नाही तर आपल्या सामोरे आलेली परिस्थितीसुद्धा एका प्रकारचा संघर्ष होऊ शकतो. संघर्षामुळे पात्रांच्या गुणांची पाखर वाचकांना होण्यास मदत होते. कादंबरीतील नायक व नायिका जीवनातील कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपाच्या संघर्षाला सामोरे जाताना दिसून येतात. प्रत्येक व्यक्तिला जगत असताना कशा ना कशासाठी तरी संघर्ष करावाच लागतो. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा विचार करता त्यांच्या कादंबऱ्यात संघर्ष हा कमी- जास्त प्रमाणात भरलेला दिसून येतो. कादंबरीचे महत्त्व वाढवण्यासाठी कादंबरीत थोडा फार संघर्ष असणे गरजेचे आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये जाणून घेणे तेवढेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक लेखकाची स्वतःची विशिष्ट अशी लेखनाची पद्धती असते. लेखक आपल्या लेखनाच्या माध्यमातून वाचकांचे लक्ष वेधून घेतात. लेखकाच्या लेखनाच्या शैलीमुळे, वैशिष्ट्यांमुळे कादंबरीला वेगळे रूप प्राप्त होते.

## ४.१ व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यातून दिसून येणारा संघर्ष

व्यंकटेश माडगूळकर यांची ‘बनगरवाडी’ ही कादंबरी धनगर समाजाच्या दृष्टीने श्रेष्ठ ठरलेली कलाकृती आहे. मुळात बनगरवाडी या कादंबरीत आलेला परिसर सांगली- सातारा, कोल्हापूरकडचा आहे. अशा या परिसरात पाऊस कधी लवकर येतो तर कधी पाऊसाची प्रतिक्षा करावी लागत असे. या परिसरातील लोकांना नेहमी दुष्काळाशी सामना करावा लागतो. शेकू व त्याची बायको नेहमी शेतीवर अवलंबून असतात. ते दोघेही शेतीवर प्रेम करणारे असतात. तसेच कष्टाळूही असतात. पेरणीच्या वेळी एकच बैल असतो, दुसरा बैल मिळत नाही म्हणून शेकुची बायको दुसऱ्या बाजूला स्वतःला जुंपून पेरणी

पूर्ण करते. कादंबरीतील हा संघर्ष कादंबरीची यशाची उंची गाठण्यासाठी यशस्वी ठरलेला आहे. या कादंबरीतील धनगरी लोकं आपले चरितार्थ चालवण्यासाठी आपल्या पोरांना शाळेतून काढून मेंढ्या राखण्याच्या कामाला लावतात. तसेच पोटासाठी चोरी करणारी माणसे यात पाहावयास मिळतात. आनंदा रामोशी पोटभरण्यासाठी या रानातून त्या रानातून फिरत फिरत कणसे, मिरच्या, वांगी घेऊन यायचा व केलेली चोरी कबूल करायचा. कादंबरीत बारा-तेरा वर्षांचा सत्ता नावाचा एक मुलगा आहे. त्याचा वेगळा संघर्ष दिसून येतो. तो आपले मेंढरू वाचविण्यासाठी लांडग्याची सामना करतो. त्यात मात्र त्याचा कुत्रा मारला जातो.

वावटळ या कादंबरीत गांधीजींच्या खुनानंतर झालेल्या दंगलीमुळे ग्रामीण भागातील ब्राह्मण लोकांची घरे जाळण्यात व लुटण्यात आली होती. गरीब भिक्षुक बेघर होऊन सर्वत्र पसरले. गावात एकमेकांबरोबर प्रेमाने बोलणाऱ्या, वागणाऱ्या लोकांमध्ये दुश्मनी निर्माण होते. ग्रामीण भागातल्या ब्राह्मण लोकांचा समाज हा संघर्षमय वाटतो. ‘नेहरू सरकारचा हुकूम आहे. बामण लोकांची घरदारे जाळा म्हणून, जातीयतेचा नायनाट केला पाहिजे.’ जनतेच्या अशा उद्गारावरून जातीय संघर्ष अधीक पेटलेला दिसून येतो. कादंबरीत सखाराम ब्राह्मणाच्या संशयावरून जातीवाचक काही शब्द म्हाताऱ्या माणसांच्या तोंडून निघालेले आहेत. ‘तो सखाराम ब्राह्मण ब्राह्मणांच्या पोरांचा तो पुढारी आहे. ब्राह्मण-ब्राह्मण एक होऊन राज्य आपल्या ताब्यात घेणार.’ या त्या म्हाताऱ्याच्या संवादावरून संघाविषयी असलेली वैमनस्य दिसून येते. ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर समाज यांच्यातही दिवसेंदिवस लढाई वाढत जात असल्याचे दिसून येते. काही लोकांना गाव सोडून जावे लागले. काही लोकांची नजर ब्राह्मणांच्या मालमत्तेवर असल्याची दिसून येते.

सत्तांतर या कादंबरीचे शीर्षक वाचता क्षणी लक्षात येते की यात सत्ता आहे व सत्तेसाठी करावा लागणारा संघर्षही आहे. या कादंबरीच्या सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत आपल्याला वानरांमध्ये होणारा संघर्ष पाहावयास मिळतो. मध्यप्रदेशातील एका जंगलात मुडा नावाच्या वानराची टोळी असते. त्या टोळीत एक नर, काही वानरी, व त्यांची पोरं असतात. नर पोरं जी आहेत ती जरा मोठी झाली की त्यांना टोळीतून हाकलण्यात येते. अशी हाकलून दिलेली पोरं एकत्र येऊन इतर प्रदेशात जाऊन विविध टोळ्यांवर घुसखोरी करतात व प्रमुख नराशी हाणामारी, संघर्ष करून त्या टोळीचा मालक बनण्याचा

प्रयत्न करतात. या जंगलात असलेल्या मुडाच्या टोळीत एकूण सोळा जण असतात. जंगलातील सगळया गोष्टी मुडाच्याच मालकीची असतात. जंगलात मात्र ही एकच एक अशी टोळी नसून अजून सात वानर टोळया आहेत असे लेखक सांगतात. त्यांचे सगळयांचे स्वतःचे क्षेत्र असतात. या सगळया टोळीतल्या नरांना हाकलण्यात आल्यानंतर तिथे कायम संघर्ष चालूच असतो. मुडाच्या टोळी शेजारी लालबुडाची टोळी असते. पक्ष्याची अंडी खात असताना विषारी साप चावून लालबुड्या मारतो. किती तरी दिवस जंगलात लालबुड्याचा आवाज ऐकू येत नाही हे लक्षात येताच, लालबुड्याची टोळी ताब्यात घेण्यासाठी मुडा प्रयत्न करू लागला. त्याचबरोबर मोगा वानर व त्याच्या साथीदारांना लालबुड्या नाहीसा झाल्याचे कळले तेव्हा त्यांनीही ती टोळी ताब्यात घेण्यासाठी खूप प्रयत्न केले. मुडाने मोगा लहान असताना त्याला टोळीतून हाकलून दिले होते. आता बळकट झालेला मोगा गेलेले साम्राज्य परत मिळविण्याच्या नादात मुडाच्या टोळीवर हल्ला करण्याचा प्रयत्न करतो. एका दुपारी मोगा आपल्या साथीदारांबरोबर मुडाच्या टोळीवर हल्ला करतो. म्हातारी-कोतारी, मुलं-बाळं काही न बघता त्यांना मारहाण करतो. मोगाचा एक साथीदार मुडावर तुटून पडतो. शेवटी मुडा मोगाच्या शेपटीचा चावा घेतो तेव्हा तो पळून जातो. मोगाचा पाठलाग करण्यासाठी मुडाने परत झेप घेतली. तोच मोका साधून मोगाने मुडावर हल्ला केला. अंधारी होऊन मुडा खाली कोसळतो व मरून जातो. मोगाचा विजय होतो, तरी देखील टोळीतील वानरींनी सहजपणे मोगाला स्वीकारत नाही. त्यामुळे तो टोळीतील मादींना, पोरांना मारतो. नाईलाजाने टोळी मोगाची होते. मोगा टोळीचा मालक होतो.

करुणाष्टक या कादंबरीत व्यंकटेश माडगूळकर यांनी ब्राह्मण कुटुंबाचे चित्रण केलेले आहे. कुणब्याच्या घरी ब्राह्मणांच्या पोरांनी जेवायला, खायला, प्यायला जाणे म्हणजे फार मोठा भ्रष्टाचार समजला जायचा. जाती-धर्माचा होणारा संघर्ष मानवी मनाला अस्वस्थ करणारा होता. या कादंबरीत आठ मुलांची आई पाहावयास मिळते. तिच्या व तिच्या कुटुंबाभोवती ही गोष्ट फिरताना दिसते. गावात ओढ्याला बारा महिने पाणी नसायचे. त्यामुळे पाणी मिळवण्यासाठी तेथील लोकांना ओढ्याच्या पात्रात खोल झरे काढून लाकडी पिंप बसवल्याशिवाय पर्याय नव्हता. अशी तात्पुरती विहीर करून पाळी येईल तसे तसे पाणी भरले जायचे. यात आईला फार भीतीचा धक्का बसला. ती मध्यरात्री उठून काळोखात पाणी भरण्यासाठी जायची. दादा कुटुंबाबरोबर नोकरीच्या गावी आल्यानंतर लेखकाच्या आजीला त्या गावात रमत नसे. ती एकदम गप्प झाली होती. गावातल्या लोकांचे चेहरे दिसेनासे झाल्यामुळे तिचा चेहरा

नेहमी रडवा व डोळे भीतीने घाबरलेले दिसायचे. उठता बसता कण्हत होती. आजी कुणाशी बोलत नसल्यामुळे लेखकाचे वडील तिला विचारायचे काय होतेय? तेव्हा ती त्याला सांगायची की ‘ दिगू मला आपल्या गावी जावेसे वाटते. इथे मन रमत नाही. कुठे येऊन पडले असे वाटते.’ यावरून परगावी गेल्यामुळे आजीला होणारा त्रास दिसून येतो. एकदा त्यांच्या खोलीवर भला मोठा साप येतो. तेव्हा वडील घरी नव्हते. आईने सापाबद्दल घरी सांगितल्यावर दादाच्या अंगावर शहारे येतात. विठू काका आले तेव्हा त्यांनी मांत्रिकाला बोलावले पण त्यानेही साप सापडला नाही. नंतर कुंकू, लिंबू असे मागवले ते मंतरून ते घराभोवती पेरले. विठू काकाला माहित होते की याने काही होणार नाही पण घरात कर्ता पुरुष नसल्यामुळे बायांच्या समजुतीसाठी असले उपाय करण्यास भाग पाडत होते. वडील नोकरीच्या गावी दूर असताना मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी आईवर येत होती. मुले नाना उद्योग करून आईला त्रासात घालायची. एकदा भिंतीच्या खुट्या वेंधता वेंधता लेखकाचा मोठा भाऊ हात सुटून जोराने जमिनीवर आपटतो. उजव्या डोळ्यावर जखम होते. आईने वेळेवर दगडीपाला लावून जखम बरी केली. खोच मात्र कायम राहिली. लेखकाच्या धाकट्या भावाला त्वचा रोग झालेला. तिथे त्याला खाज सुटत असे. खाजवल्यानंतर तिथे जखमा होत असे. आईने आपल्या परीने ना- ना पद्धतीचे उपचार केले, पण गुण मात्र पडत नसे. असे मुलांचे विविध प्रकारचे संकट आईसमोर उभे राही. आजी वारल्यानंतर आई व वडील यांचे सांत्वन करण्यासाठी अनेक नातेवाईक आलेले. सोलापूरहून चुलत तात्या, गावचे कुळकर्णी विनुतात्या, आजीचे भाऊ, आक्काचे सासरे अशी बरीच माणसे आली होती. ती माणसे आपापल्या घरी गेल्यावर आईला एकटं राहणे अवघट होऊ लागले. तिला अमावस्या पौर्णिमेलाच कसले तरी भास होऊ लागले. एका पौर्णिमेच्या रात्री तिच्या समोर एक अनोळखी बाई आली. याचे वर्णन पृष्ठ क्रमांक २८ वर पाहावयास मिळते. हे सगळे ऐकून थोरल्या भावाने घरी झोपणेच सोडून दिले. तो कधी शाळेत, कधी आपल्या कुंभार आळीतल्या मित्राच्या घरी, तर कधी जैन मित्राच्या माडीवर झोपायला जायचा. वडिलांनाही नोकरीत संघर्ष करावा लागत असे. ज्यावेळी त्यांना बढती मिळाली त्यावेळी त्यांना कामात अवकाश मिळत नसे. शेवटी कंटाळून त्यांनी आधीचीच नोकरी पाहिजे म्हणून लेखी अर्ज केला. नव्या घरात आल्यानंतर त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. गावात उंदीर पडू लागले, गटारात, रस्त्यावर उंदीर पडून ते कुजून घाण वास गावात पसरायला लागला. प्लेगची साथ होती. खाकेत, जांघेत गाठी यायच्या. ताप यायचा. एक- दोन चिता रोज जाळू लागल्या. शाळा बंद

पडल्या, बाजारपेठ बंद पडल्या, कार्यालये बंद पडली. शेवटी नानांच्या मळयात आंब्याच्या झाडाखाली झोपडी घालून मुलांना घेऊन आई राहू लागली. सतत पाच महिने गावात या प्लेगने धुमाकूळ घातला होता. अशाही परिस्थितीला सामोरे जाऊन या कुटुंबाने संघर्ष करून दिवस काढले आहेत. एकदा देवीच्या हारातीलरत्नाची पुडी हरवते. लेखकाचे वडील दुःखी होते कारण आलेले संकट भयानक होते. त्यांना वाटत होते की ही जर गोष्ट देवडीवरच्या राखणदारपर्यंत पोहचली तर आपल्या हातापायांना बेड्या पडतील. नेमक्या ह्याच दिवसात लेखकाच्या मोठ्या भाऊचा मॅट्रिक परीक्षेचा निकाल जाहीर होतो व तो नापास होतो. एका मागून एक संकट लेखकाच्या कुटुंबावर आलेले दिसून येते. अचानक सरकारने असा निर्णय घेतला की ज्यांना सेवेची पंचवीस वर्षे झाली, त्यांना सक्तीने पेन्शन देऊन मोकळे करायचे. अर्ध्या पगारात कसे भागवायचे असा मोठा प्रश्न वडिलांच्या पुढे निर्माण होतो. पुढे म्युनिसिपालटीत कारकून म्हणून नोकरी करायला मिळाल्यामुळे थोडीफार खर्चाची समस्या दूर होते. पुढे गांधीजींच्या खुनामुळे ब्राह्मण समाजातील लोकांची घरे जाळण्यात, लुटण्यात आली. मेहनतीने उभा केलेल्या संसाराची राखराख होते. पुन्हा घर बांधणे अशक्य होते पण लेखकाच्या मोठ्या भावाने हातभार लावून पुन्हा घर बांधले. यात लेखकाचे वडील आजारी पडले. इतके आजारी पडले की त्यांना आजारातून बाहेर पडता आले नाही. वडिलांमागे कुटुंबाची सगळी जबाबदारी आईवर येते. अशा विविध परिस्थितींना सामोरे जाऊन ह्या कुटुंबाला संघर्ष करावा लागला.

पुढचं पाऊल या कादंबरीतील मूळ गाभा हा संघर्षच आहे. कादंबरीत एका सामान्य कुटुंबाची, दलित समाजातील परिवाराची कहाणी आहे. देवाच्या कुटुंबात सुख, शांतता नसतेच. गावची तराळकी, पाटलांचे जुलूम, वर्चस्व, लोकांची कामे करून आपले पोट भरणे असे जीवन देवाला जगावे लागत असे. कादंबरीच्या सुरुवातीलाच गावात आलेल्या डॉक्टरांशी कृष्णाचा वाद होतो, डॉक्टर कृष्णाला शिव्या देतो, रागाने कृष्णा डॉक्टरवर हात उभारतो, डॉक्टरांच्या बैलाचे शिंग कृष्णाच्या कपाळाला लागून रक्तबंबाळ होते. यात कृष्णाचे वडील त्याला डॉक्टरांशी माफी मागण्यास सांगतात. या सगळया गोष्टी कृष्णा सहन करू शकला नाही. त्याला अपमान झाल्यासारखे वाटू लागले. यामुळे देवाशी वाद घालून कृष्णा कुणाला काहीच न सांगता बावऱ्याच्या सल्ल्याने गाव, घर सोडून मुंबईला जातो. यातूनच कृष्णाच्या खऱ्या संघर्षाला सुरुवात होते. मुंबईत राहणारा बावऱ्या कृष्णाला काम शोधण्यासाठी पाठवतो. कृष्णा प्रथम मामा चिपळूणकरांच्या हॉटेलवर जातो. कृष्णा ढोलकी वादक असल्याचे

समजताच मामा त्याला तमाशात कामाला लावतात. कृष्णाच्या ढोलकी वादनाने तमाशातील मोगरी प्रभावित होऊन त्याला आपल्याकडे कामाला ठेवते. त्याचा उपयोग करून घेते. त्याचेच मेहनतीचे पैसे त्यालाच देण्यासाठी नाकारते. एक दिवस त्यांच्यात भांडण होऊन ती कृष्णाला मारहाण करते व तमाशातून हाकलते. तो अडाणी असल्यामुळेच मोगरी त्याची फसवणूक करू शकली. त्यानंतर कृष्णा दुसरे काम शोधण्यासाठी बाहेर पडतो. उपास-तपास करीत कृष्णा मुंबईत दिवस घालवू लागला. नंतर पुरी, भाजी पाव खाऊन उपजीविका करू लागला. तमाशा एवढा पैसा त्याला गोदीच्या हमालीत मिळत नसे. त्यामुळे पोटाला मारून तो पैसे कमवू लागला. काही दिवसांनी गणा कृष्णाच्या शोधात मुंबईला येतो. चुकून तो मोगरीच्या जाळ्यात सापडतो. मोगरी त्याचे कान भरते. खूप वाईट वाईट त्याला सांगते. गणा तिच्यावर विश्वास ठेवतो. एके दिवशी कृष्णाची व गणाची भेट होते. गणा कृष्णाला मारतो. आपल्यासारखा गणाचा मोगरीने उपयोग करू नये म्हणून तो गणाला समजवण्याचा प्रयत्न करतो. शेवटी तेच होते. कालांतराने मोगरीचा वाईट अनुभव गणाला येतो. गणा आपल्या भावाशी माफी मागतो. बावऱ्या कृष्णाला नवीन नोकरी देतो व गणाला परत गावी पाठवितो. कृष्णा आपल्या कष्टाच्या पैशाने आपल्या बायकोला व पोरांना कपडे व मिठाई गणासोबत पाठवून देतो. विविध संघर्षमय परिस्थितीला तोंड देऊन, कृष्णा गावात मळा विकत घेण्याचे आपले स्वप्न व जिद्द पूर्ण करतो. तसेच कृष्णाच्या घरची इतर माणसेदेखील आपल्या परीने संघर्ष करताना दिसून येतात. कृष्णा घर सोडून गेल्यामुळे सगळी जबाबदारी रखमावर येते. ती सगळयांची काळजी घेते. पोट भरण्यासाठी मजुरी करते. शिळ्या भाकरीच्या बदल्यात रखमा बामणाच्या अंगणाची झाडलोट, गोठ्यातील घाण साफ करू लागते. दिवाळीच्या वेळी देवा सण मागायला जातो. तिथे त्याचा अपमान केला जातो. एक बाई देवाची फिरकी घेते. ती देवाला म्हणते, 'कृष्णा आता मनीऑर्डर पाठवत असेल, असे गावातील लोक सांगत होते.' हे ऐकताच देवाला राग येतो. त्या रागानेच तो आपल्या नातवांना मारतो. त्यात रश्शी व बिंच्या देवाकडे फटाकड्याची मागणी करतात. तेव्हाही देवा त्यांना चोप देतो व पुढे म्हणतो, 'फटाकड्या उडवणे म्हारापोराचे खेळ नव्हेत.' असे म्हणून देवा दोघांनाही घरी आणतो. रखमा कृष्णाच्या आठवणीत बेचैन होते. एक दिवस कृष्णा परत येईल या आशेवर ती जगत राहते.

## ४.२ व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये

दर एका लेखकाची स्वतःची अशी लेखनाची वैशिष्ट्ये असतात. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करताना त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये जाणून घेण्याची संधी मिळाली. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यात एकच एक विषय आलेला नसून त्यांच्या कादंबऱ्यात विविधांगी विषय आलेले आहेत हे अभ्यास करताना समजून आले आहे. माडगूळकरांच्या कादंबऱ्या आटोपशीर आहेत कारण त्यांच्या लेखनात पसारा खूप कमी असतो ही त्यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये आहे. यामुळेच त्यांच्या कादंबऱ्या लहान व आटोपशीर आहेत. त्यांच्या लिखाणाचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे माणदेश मधला निसर्ग हा निसर्ग बनगरवाडी व वावटळ या कादंबरीत जास्त प्रमाणात दिसून येतो. माडगूळकर हे माणदेशात राहणारे होते. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यात तेथील लोकांची भाषा, भावकृती, व्यक्तिवैशिष्ट्ये आढळतात. त्यांनी ज्या पद्धतीने संवाद लिहिलेले आहेत, ते वास्तवतेच्या स्तरावरील, खऱ्या खुऱ्या जीवनाचे प्रतिबिंब दर्शविणारे आहेत. “हं, हतं काय करायचा गा मास्तर? साळा चालतीय कुटं हतं? पोरं हायती कुटं वाडीत? सरकारला काय ठावं न्हाई व्हय? रिक्कामा फाजीलपणा.”[१](बनगरवाडी) तसेच त्यांच्या कादंबऱ्यात त्यांनी संतवाणीचाही उपयोग केलेला आहे. “समर्थांनी म्हटले- ‘बरे ऐसा प्रसंग झाला| झाला तो होऊन गेला| आता तरी ब्राह्मणी आपणाला| शहाणे करावे||”[२](वावटळ)

तसेच त्यांनी आपल्या कादंबऱ्यात म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर केलेला आहे. यामुळेच त्यांच्या भाषाशैलीला वेगळेपण आले आहे. ज्यावेळी आपण एखादा चित्रपट पाहत असताना आपल्या मनात पुढे काय होईल याची कुतूहल निर्माण होते, त्याचप्रमाणे माडगूळकरांच्या कादंबऱ्या वाचत असताना देखील होते. त्यांच्या कादंबरीत चित्रित झालेले बारीक सारीक तपशील वाचत असताना, आपल्या डोळ्यांसमोर ते प्रसंग, घटना उभी राहतात. माडगूळकर आपल्या लेखनाच्या माध्यमातून वाचकांचे लक्ष वेधून घेतात. माडगूळकर स्वतः चित्रकार होते याचा प्रत्यय त्यांच्या कादंबऱ्या वाचत असताना येतो. कादंबऱ्यात त्यांनी रेखाटलेली चित्रे पाहावयास मिळतात. जगत असताना आलेल्या अनुभवांचे चित्रण ते आपल्या कादंबरीत करतात. त्यामुळे कादंबरी वाचत असताना अनेक किस्से वाचकाच्या मनाला भिडतात. त्यांची लेखनशैली साधी, सरळ, सोपी, सुटसुटीत अशीच आहे. त्यांनी अगदी मोजक्या शब्दात आपल्या कादंबऱ्यातील व्यक्तिरेखा उभ्या केलेल्या असून त्यांचे स्वतःचे असे अस्तित्त्व सिद्ध केलेले आहेत.

त्यांच्या अनेक कादंबऱ्यात त्यांनी आपला 'माणदेश' चित्रित केला आहे. या प्रदेशाचे स्वरूपही वेगळे असल्याचे दिसून येते. एखाद्या कादंबरीच्या लेखनासाठी पार्श्वभूमी हवी आहे, एवढ्याच करता ते मर्यादित राहत नाही तर अत्यंत आवश्यक म्हणून त्या प्रदेशाचे चित्रण ते आपल्या कादंबरीत करतात. त्यांच्या कादंबऱ्या वाचताना कुठेच असे वाटत नाही की त्यांनी कल्पनेच्या माध्यमातून कादंबऱ्या लिहिल्या असाव्या. त्यांच्या कादंबऱ्यात त्यांनी बारीक सारीक प्रसंग मांडलेले आहेत. अनेक प्रसंग वाचताना डोळे भरल्याशिवाय राहत नाही. पुढचं पाऊल या कादंबरीतील देवाचा जेव्हा मृत्यू होतो तेव्हा वाचक अत्यंत दुःखी होतो. असे वाटते की आपल्याच परिवारातला कुणी गमावला आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा विचार केला तर त्यातून तिथल्या लोकांच्या अंतरंगाचे नेमके चित्रण प्रत्ययाला आल्याशिवाय राहवत नाही. सगळया कादंबऱ्यातील व्यक्तिरेखांच्या विचार करता त्यांच्या अंतरंगाचा शोध घेण्याचे सामर्थ्य माडगूळकरांच्या लेखनाने सिद्ध केलेले दिसून येते. व्यंकटेश माडगूळकर यांनी माणदेशचा परिसर व त्यातले मानवीनाट्य अत्यंत बारकाईने चित्रित केले आहे. त्यांनी शब्दांच्या माध्यमातून चित्रमय शैलीतून घटना आणि प्रसंगांना ते सुंदर आकार देताना दिसून येतात. त्यांच्या कादंबऱ्यात आलेल्या घटना व प्रसंग वाचताना ते डोळयांपुढे आल्याशिवाय राहत नाही. त्यानंतर त्यांचे माणसांच्या जगावरचे लक्ष उडाले व ते रंगून गेले प्राणांच्या विश्वात. याचे उदाहरण 'सत्तांतर' ही कादंबरी आहे. बऱ्याच ठिकाणी माडगूळकर हेच निवेदक होताना दिसतात.

## ४.३ समारोप

प्रस्तुत प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांतून दिसून येणारा संघर्ष व व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये यांचा आढावा घेण्यात आला आहे. दर एका व्यक्तिला जीवनात कोणत्या ना कोणत्या कारणासाठी संघर्ष करावाच लागतो. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा विचार केला तर त्यांच्या कादंबऱ्यांत विविध व्यक्तिरेखा जगत असताना संघर्ष करताना दिसून येतात. 'बनगरवाडी' या कादंबरीत शेकुची बायको, आनंदा रामोशी यांचा जीवन जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष प्रत्ययास येतो. 'वावटळ' या कादंबरीत ब्राह्मण समाजातील लोकांवर गांधी वधानंतर झालेला अत्याचार दिसून येतो. 'सत्तांतर' या कादंबरीत वानरांच्या टोळीतील संघर्ष पाहावयास मिळतो. अर्थात कादंबरीची सुरुवात व शेवट संघर्षाने झालेली दिसतात. 'करुणाष्टक' या कादंबरीत

लेखकाच्या आई, वडील, आजी व थोरल्या भावाला करावा लागणारा संघर्ष दिसून येतो. 'पुढचं पाऊल' या कादंबरीत कृष्णा गाव सोडून मुंबईला जाण्याच्या मार्गाने बाहेर पडतो तेव्हापासून संघर्षाला सुरुवात होते खरी पण गावात असताना देखील कृष्णा व त्याच्या कुटुंबाला संघर्ष करावा लागत असे. कृष्णाचा कुटुंब खालच्या जातीतील असल्यामुळे त्याच्या घरातील लोकांना सुद्धा अनेक हाल सहन करावे लागत असे. दर एका लेखकाची स्वतःची अशी लेखनाची वैशिष्ट्ये असतात. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करताना त्यांच्या त्यांच्या कादंबऱ्या लेखनाची वैशिष्ट्ये जाणून घेतली. व्यंकटेश माडगूळकर स्वतः माणदेशात राहणारे होते त्यामुळे तेथील लोकांचे जगणे, भाषा यांचा पडसाद त्यांच्या कादंबऱ्यावर उमटलेला दिसून येतो. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांशत म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर केल्यामुळे त्यांच्या भाषाशैलीला वेगळेपण आलेले आहे.

## ४.४ निष्कर्ष

१. व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी', 'वावटळ', 'करुणाष्टक', ' पुढचं पाऊल' या कादंबऱ्यात मानवी पातळीवरील विविध प्रकारचे संघर्ष पाहावयास मिळतात.

२. कादंबऱ्यात आलेल्या संघर्षाचे वर्णन वाचताना वाचकाच्या डोळयांत अश्रू आल्याशिवाय राहत नाही.

३. व्यंकटेश माडगूळकर स्वतः माणदेशात राहणारे होते. त्यामुळे तेथील लोकांचे जगणे, भाषा यांचा प्रभाव त्यांच्या कादंबऱ्यावर उमटलेला दिसून येतो.

४. 'सत्तांतर' या कादंबरीच्या माध्यमातून व्यंकटेश माडगूळकर यांनी माणसांच्या जगावरचे लक्ष काढून प्राण्यांच्या विश्वात लक्ष केंद्रित केलेले दिसून येते.

५. व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबऱ्या आटोपशीर आहेत कारण त्यांच्या लेखनात पसारा खूप कमी असतो ही त्यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये आहे. यामुळेच त्यांच्या कादंबऱ्या लहान व आटोपशीर आहेत.

६. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यातील संघर्षाचे स्वरूप सर्वसामान्य माणसांच्या पातळयांवरील असल्याचे जाणवून येते.

## संदर्भ

१. माडगूळकर, व्यंकटेश. "बनगरवाडी." मौज प्रकाशन, १९५५.

२. माडगूळकर, व्यंकटेश. "वावटळ." मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२.

३. माडगूळकर, व्यंकटेश. "सत्तांतर." मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२.

४. माडगूळकर, व्यंकटेश. "करुणाष्टक." मेहता पब्लिशिंग हाऊस, सातवी २०१२.

५. माडगूळकर, व्यंकटेश. "पुढचं पाऊल." मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२.

# प्रकरण ५

# समारोप आणि निष्कर्ष

## समारोप

'व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास' या विषयातील हे पाचवे व शेवटचे प्रकरण म्हणजे समारोप व निष्कर्ष होय.

पहिल्या प्रकरणामध्ये कादंबरी या साहित्यप्रकाराचे स्वरूप, कादंबरीची व्याख्या, कादंबरीचे घटक, कादंबरीचे प्रकार व मराठी कादंबरीचा विकास आणि वाटचाल या गोष्टींचा आढावा घेतला आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये 'व्यंकटेश माडगूळकर व्यक्ती आणि कर्तुत्व' या अंतर्गत व्यंकटेश माडगूळकर यांचा जीवन परिचय, व्यंकटेश माडगूळकर यांची साहित्यिक जडण- घडण व व्यंकटेश माडगूळकर यांचे वाङ्मयीन कर्तुत्व यांची मांडणी केलेली आहे. दि. ५ एप्रिल १९२७ रोजी माडगूळ नावाच्या खेडेगावात व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म झाला. कुणबी, महार, रामोशी, मुलाणी, सुतार अशा सवंगड्यांसोबत ते लहानचे मोठे झाले. हाताचे पंजे टाकून मासे पकडायला त्यांच्या सवंगड्यांनीच त्यांना शिकविले. भजने, कीर्तने, तमाशे यांचा आस्वाद लहानपणीच त्यांनी घेतला होता. किन्हाई या गावी वडिलांबरोबर आल्यावर भाड्याच्या घरातील खोलीत लेखकाला एक मोठी लाकडी पेटी सापडते. त्या पेटीत मिळालेली पंचतंत्र, हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या, चमत्कारिक गोष्ट, रामायण इत्यादी अनेक प्रकारची पुस्तके त्यांनी वाचून काढली. त्या काळात त्यांना वाचनाची गोडी लागली, पण आपण लेखक व्हावा असे त्यांना तेव्हा वाटले नव्हते. खर तर त्यांना चित्रकार व्हायचे होते पण ते शक्य झाले नाही. चित्रकार माडगूळकर, शेतकरी माडगूळकर, शिकारी माडगूळकर, व निसर्गप्रेमी माडगूळकर म्हणून त्यांची कीर्ती आहे. १९४६ साली त्यांनी साहित्य लेखनास सुरुवात केली होती. 'काळ्या तोंडाची' ही त्यांची पहिली कथा १९४६ साली प्रसिद्ध झाली आहे. १९४९ साली 'माणदेशी माणसं' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला व मराठीतील एक श्रेष्ठ ग्रामीण कथाकार म्हणून माडगूळकरांना मान्यता प्राप्त झाली होती.

व्यंकटेश माडगूळकर यांनी कथाबरोबर अनेक साहित्यप्रकार हाताळलेले आहेत. ‘बनगरवाडी’ ही त्यांची कादंबरी १९५४ ला ‘मौज’ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली होती. इंग्रजी, जर्मन, हिंदी, डॅनिश इत्यादी भाषांमध्ये बनगरवाडीचे अनुवाद झालेले आहेत. त्यानंतर ‘पुढचं पाऊल’ ही कादंबरी आली. पुढे ‘गावाकडील गोष्ट’, ‘हस्ताचा पाऊस’, ‘घरदार’, ‘जांभळाचे दिवस’, ‘उंबरठा’ इत्यादी कथासंग्रह व ‘बिनबियांचे झाड’ व ‘कोणाचा कुणाला मेळ नाही’ ही लोकनाट्य आली. ‘बनगरवाडी’ नंतर ‘वावटळ’, ‘छोटा जवान’, ‘कोवळे दिवस’, ‘करुणाष्टक’, ‘सत्तांतर’ इत्यादी कादंबऱ्यांनी तसेच ‘तू वेडा कुंभार’, ‘पती गेले ग काठेवाडी’, ‘सती’, ‘बिकट वाट वहिवाट’ इत्यादी नाटकांनी माडगूळकरांना प्रसिद्धी मिळवून दिली. अशा लेखकाच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करताना मी पाल्हाळीकपणा टाळला. अनेक अभ्यासकांनी खूप काही लिहिले आहेच. जे मांडायचे ते मोजके आणि मूल्यमापनात्मक मांडावे हा हेतू ठेवून मी समारोप व निष्कर्षसह एकूण पाचच प्रकरणे केली. ती खालील प्रमाणे –

प्रथम भूमिका व ऋणनिर्देश स्पष्ट करून ‘कादंबरी एक साहित्यप्रकार’, ‘व्यंकटेश माडगूळकर व्यक्ती आणि कर्तुत्व’, ‘व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा प्रत्यक्ष अभ्यास’, ‘व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन’ व ‘समारोप आणि निष्कर्ष’. शेवटी परिशिष्ट्यांत ग्रंथसूची, संदर्भसूची दिली आहेत.

संशोधनाच्या ‘कादंबरी एक साहित्यप्रकार’ या पहिल्या प्रकरणात कादंबरी या साहित्यप्रकाराचे स्वरूप, कादंबरीची व्याख्या, कादंबरीचे घटक, कादंबरीचे प्रकार, मराठी कादंबरीचा विकास आणि वाटचाल इत्यादींचा संक्षिप्त परिचय केला आहे. कॅथरीन लीव्हर, अर्नेस्ट बेकर, प्र. वा. बापट व ना. वा. गोडबोले, कुसुमावती देशपांडे, भालचंद्र नेमाडे यांच्या व्याख्या दिल्या आहेत. कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण निर्मिती, निवेदन पद्धती, भाषाशैली इत्यादी कादंबरीच्या घटकांचा समावेश केला आहे. तसेच ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, आत्मचरित्रात्मक, सामाजिक, प्रादेशिक, ग्रामीण, राजकीय इत्यादी कादंबऱ्यांच्या प्रकाराचा आढावा घेतला आहे. तसेच मराठी कादंबरीचा विकास आणि वाटचाल याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे.

‘व्यंकटेश माडगूळकर व्यक्ती आणि कर्तृत्व’ या दुसऱ्या प्रकरणामध्ये व्यंकटेश माडगूळकर यांचा जीवन परिचय, व्यंकटेश माडगूळकर यांची साहित्यिक जडण- घडण व व्यंकटेश माडगूळकर यांचे

वाङ्मयीन कर्तृत्व यांचा आढावा घेतला आहे. त्यात माडगूळकरांचा जन्म आणि बालपण, नोकरी, साहित्यिक म्हणून माडगूळकरांची ओळख करून देऊन त्यांच्या साहित्याची ओळख करून दिलेली आहे. तसेच लेखक म्हणून व्यंकटेश माडगूळकर कसे घडले याचा थोडक्यात परिचय केला आहे. त्यांच्या परिसराचा त्यांच्या साहित्यावर प्रभाव पडलेला दिसून येतो.

'व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा प्रत्यक्ष अभ्यास' या तिसऱ्या प्रकरणात माडगूळकरांच्या निवडक पाच कादंबऱ्यांचा अभ्यास केला आहे. 'बनगरवाडी', 'वावटळ', 'करुणाष्टक', 'सत्तांतर', व 'पुढचं पाऊल' या कादंबऱ्या निवडण्यात आल्या आहेत. कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, व भाषा इत्यादी घटकांच्या माध्यमातून या कादंबऱ्यांचे लिखाण केले आहेत. 'बनगरवाडी', 'वावटळ', व 'सत्तांतर' या त्यांच्या कादंबऱ्या श्रेष्ठ ठरल्या. अनेक अभ्यासकांनी 'बनगरवाडी' ह्या कादंबरीचा प्रादेशिक कादंबरी म्हणून उल्लेख केला आहे. परंतु ज्यावेळी मी त्या कादंबरीचा अभ्यास केला त्यावेळी ती मला ग्रामीण कादंबरी वाटली. याचे कारण म्हणजे या कादंबरीत एकाच गावाबद्दल मांडणी केलेली आहे. त्या गावातील लोकांचे व्यवसाय, खानपान, विचारसरणी, राहणीमान, समस्या, संघर्ष इत्यादींचा समावेश यात पाहावयास मिळतो. 'करुणाष्टक' व 'वावटळ' या दोन्ही आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या आहेत. मानवी जगाकडून प्राणीसृष्टीकडे झुकणारी त्यांची कादंबरी म्हणजे 'सत्तांतर'. 'पुढचं पाऊल' या कादंबरीत एका दलित मुलाची कहाणी आली आहे. गाव सोडून तमाशाच्या नादाने मुंबईत गेलेल्या, तेथे अनेक समस्यांना तोंड देऊन, स्वप्ने पूर्ण करणाऱ्या कृष्णाची कहाणी यात पाहायला मिळते.

चौथे प्रकरण 'व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन' हे आहे. यात 'बनगरवाडी', 'वावटळ', 'करुणाष्टक', 'सत्तांतर', 'पुढचं पाऊल' या कादंबऱ्यांतून दिसून येणाऱ्या संघर्षाचा आढावा घेतला आहे. त्याचबरोबर व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये मांडण्यात आली आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्या प्रत्येक कादंबरीत एकाहून अधिक व्यक्तिरेखा संघर्ष करताना दिसून येतात. यामुळेच पात्रांच्या गुणांची पाखर वाचकांना होण्यास मदत होते.

प्रकरण पाचवे 'समारोप आणि निष्कर्ष' असे असून या प्रकरणात एकूण प्रबंधिकेचा समारोप व निष्कर्ष मांडण्यात आले आहे.

अशाप्रकारे मी ‘व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास’ हा विषय मांडला आहे. यातील उणीवांची जाणीव मला आहे. परंतु मी हा प्रयत्न केला आहे.

# निष्कर्ष

१. कादंबरी हा आधुनिक काळात उदयाला आलेला साहित्यप्रकार आहे.

२. कथानक, व्यक्तिरेखा, भाषाशैली, वातावरण अशा घटकांतून कादंबरीचे स्वरूप निश्चित होतात. कथानक, व्यक्तिरेखा व वातावरण यांच्या बरोबरीने भाषा आणि निवेदन यांनाही कादंबरीच्या संदर्भात महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. कथासंहितेला निर्माण करणारी क्रिया निवेदन आहे.

३. कादंबरीच्या आरंभापासून ते आतापर्यंत ऐतिहासिक, सामाजिक, दलित, ग्रामीण, स्त्रीवादी इत्यादी असे विविध प्रवाह निर्माण झालेले आहेत.

४. केशवजींची 'यात्रिक क्रमण' ही कादंबरी मराठीतील पहिली कादंबरी आहे, परंतु ती भाषांतरित असल्याने मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान बाबा पद्मनजींच्या 'यमुनापर्यटन' या कादंबरीला दिला जातो.

५. सामाजिक कादंबरीपासून सुरू झालेला कादंबरी साहित्याचा प्रवाह पुढे अद्भुतरम्य कादंबऱ्यांना मिळाला. १८८५ च्या सुमारास कादंबरीने सामाजिक- ऐतिहासिक असे वेगळे वळण घेतले आहे.

६. स्वातंत्र्योत्तर काळातील कादंबरीकार मर्ढेकर व बेडेकर यांच्या लेखनाच्या माध्यमातून कादंबरी वाङ्मयाला एक नवीन रूप मिळाले आहे. त्यांच्या 'रात्रीचा दिवस' आणि 'रणांगण' या कादंबऱ्यांच्या रूपाने कादंबरी लेखनात नाविन्यता आली आहे.

७. मध्यमवर्गीय जाणिवांचा प्रभाव मराठी कादंबरीवर स्पष्टपणे दिसून येतो.

८. मराठी कादंबरीत सर्वसामान्य मानवाच्या जीवनातील प्रसंगाचे चित्रण फार उशिरा आलेले दिसते.

९. कादंबरी लेखकांची नवी पिढी उदयास आली. त्यामध्ये उध्दव शेळके, शंकर पाटील, हमीद दलवाई, आनंद यादव, रा. रं. बोराडे, ना. धों. मनोहर यांच्यासारखे अनेक लेखक निर्माण झाले आहेत.

१०. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, आत्मचरित्रपर लेखन असे अनेक साहित्यप्रकार व्यंकटेश माडगूळकर यांनी हाताळलेले आहेत. त्यांच्या अनेक पुस्तकांना पुरस्कार देखील प्राप्त झालेले आहेत.

११. कोवळे दिवस, वावटळ आणि करुणाष्टक या आत्मचरित्रपर कादंबऱ्या आहेत. बनगरवाडी आणि पुढचं पाऊल या गावगाड्याशी जवळीकता साधणाऱ्या कादंबऱ्या आहेत. सत्तांतर ही त्यांची कादंबरी प्रतिकात्मक आहे.

१२. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात माडगूळकरांनी भाग घेतला होता. त्याचा परिणाम त्यांच्या कोवळे दिवस या कादंबरीत दिसून येतो. तसेच लेखकाचे बालपण आणि स्वातंत्र्य चळवळीतील लेखकाच्या भूमिगत कार्याची माहिती देणारी ही कादंबरी आहे.

१३. ग्रामीण लोकांचे जगणे, खानपान, समस्या त्यांनी जवळून पाहिल्याने त्यांच्या साहित्यातून तेच चित्रित झालेले आहेत. माणदेशात राहणाऱ्या धनगरांची जीवनपद्धती बनगरवाडी या कादंबरीत दिसून येतात.

१४. व्यंकटेश माडगूळकर यांनी करुणाष्टक, पुढचं पाऊल, बनगरवाडी व वावटळ या कादंबऱ्यात निवेदनासाठी प्रमाणभाषा तर संवादासाठी बोली भाषेचा वापर केलेला आहे.

१५. पुढचं पाऊल या कादंबरीत सामाजिक वातावरण चित्रित केलेले आहे. या कादंबरीत नैसर्गिक वातावरणाला फारसा वाव नाही.

१६. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यांचा एकच एक विषय नसून विविध विषय त्यांनी हाताळलेले आहेत. १७. धनगर समाजाचा एक वेगळा पट बनगरवाडीच्या माध्यमातून व्यंकटेश माडगूळकर यांनी चित्रित केला आहे. बनगरवाडी ही माणदेशी भागात राहणाऱ्या धनगरांची जीवनपद्धती दाखवणारी कादंबरी आहे.

१८. करुणाष्टक आणि वावटळ या त्यांच्या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्यातून लेखकाचा जीवन प्रवास दिसून येतो. वावटळ या कादंबरीचे लेखन करीत असताना व्यंकटेश माडगूळकरांनी सामाजिक वेध घेतला आहे.

१९. सत्तांतर ही त्यांची कादंबरी पूर्णपणे प्राणीसृष्टीवर अवलंबून असून, ही त्यांची प्रतिकात्मक कादंबरी आहे.

२०. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यातील व्यक्तिरेखा अगदी साध्या, स्वभावनिष्ठ पद्धतीने जीवन जगणाऱ्या आहेत. प्रत्येक व्यक्तिरेखांना स्वतंत्र असे व्यक्तिमत्व आहेत.

२१. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरीतून प्रकट होणारा निसर्ग मानवी जीवनाचा एक भाग बनून येतो.

२२. व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनाचा विविधांगी विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

२३. व्यंकटेश माडगूळकर यांची करुणाष्टक ही कादंबरी आत्मचरित्रात्मक आहे. संपूर्ण कादंबरी आई या व्यक्तिरेखेभोवती फिरत राहते, त्यामुळे ही कादंबरी स्त्रीप्रधान असल्याचे दिसून येते.

२४. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्या वाचत असताना त्यांच्या निवेदनशैलीचेही वेगळेपण नजरेत भरते. कोणतीही निराळी भूमिका न घेता, कालानुक्रमे घडत जाणारे प्रसंग ते लिहितात.

२५. व्यंकटेश माडगूळकर यांच्या करुणाष्टक, पुढचं पाऊल, वावटळ आणि बनगरवाडी या कादंबऱ्यात मानवी स्तरावरील विविध प्रकारचे संघर्ष प्रत्ययास येतात.

२६. कादंबऱ्यात आलेल्या संघर्षाचे वर्णन वाचक वाचताना डोळयांत अश्रू भरतात. हे त्यांच्या लेखनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

२७. सत्तांतर च्या माध्यमातून माडगूळकरांनी माणसांच्या जगावरचे लक्ष काढून प्राण्यांच्या विश्वात लक्ष केंद्रित केलेले दिसून येते.

२८. व्यंकटेश माडगूळकर स्वतः माणदेशातील होते. त्यामुळे तेथील लोकांचा, निसर्गाचा, भाषेचा प्रभाव त्यांच्या कादंबऱ्यांवर उमटलेला दिसून येतो.

२९. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यातील संघर्षाचे स्वरूप सर्वसामान्य माणसांच्या स्तरावरील असल्याचे दिसून येते.

३०. व्यंकटेश माडगूळकर यांच्या लेखनात पसारा खूप कमी असतो. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या लहान आणि आटोपशीर आहेत.

३१. अनेक अभ्यासकांनी माडगूळकरांच्या बनगरवाडी ह्या कादंबरीचा प्रादेशिक कादंबरी म्हणून उल्लेख केला आहे. परंतु ह्या कादंबरीचा अभ्यास करून मी असे म्हणते की ही प्रादेशिक कादंबरी नसून ग्रामीण कादंबरी आहे.


३२. माडगूळकर यांच्या कादंबऱ्या ग्रामीण माणसाच्या संघर्षपूर्ण जगण्यावर व त्यांच्या जीवनावर, दुःखावर लक्ष केंद्रित करताना दिसतात.


# परिशिष्ट


## लेखक व्यंकटेश माडगूळकर यांचे छायाचित्र





# व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवडक कादंबऱ्यांचे मुखपृष्ठ












# व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबऱ्यातील रेखाटने











## संदर्भसूची

१. बापट, प्र. वा., गोडबोले, ना. वा. "मराठी कादंबरी-तंत्र आणि विकास." व्हीनस प्रकाशन पुणे, १९५७.

२. हस्तक, उषा. "साहित्य: अध्यापन आणि प्रकार." मौज प्रकाशन मुंबई, १९८७.

३. कुलकर्णी, मदन. "मराठी प्रादेशिक कादंबरी: तंत्र आणि स्वरूप." श्री मंगेश प्रकाशन नागपूर, १९९४.

४. बापट, प्र. वा., गोडबोले, ना. वा. "मराठी कादंबरी-तंत्र आणि विकास." व्हीनस प्रकाशन पुणे, १९५७.

५. देशपांडे, कुसुमावती. "मराठी कादंबरी." पहिले शतक मुंबई मराठी साहित्य संघ, १९७५.

६. नेमाडे, भालचंद्र. "टीकास्वयंवर." साकेत प्रकाशन औरंगाबाद, १९९०.

७. संत, जान्हवी. "कादंबरी एक वाङ्मय-प्रकार." मोघे प्रकाशन कोल्हापूर, १९७१.

८. शहा, विभा. "मराठी ऐतिहासिक कादंबरीः एक अभ्यास." मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९८.

९. कुलकर्णी, भिमराव. "मराठी कादंबरीची वाटचाल." ग्रंथागार प्रकाशन पुणे, १९७२.

१०. हस्तक, उषा. "कादंबरी आणि मराठी कादंबरी." साहित्य सेवा प्रकाशन औरंगाबाद, १९९३.

११. भास्कर, शेळके. "मराठी प्रादेशिक कादंबरी स्वरूप आणि विश्लेषण." शब्दालय प्रकाशन, २०१२.

१२. नलगे, चंद्रकुमार. "ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास." रिया पब्लिकेशन्स, २०१३.

१३. ठाकूर, रवींद्र. "मराठी कादंबरी: समाजशास्त्रीय समीक्षा." दिलीपराज प्रकाशन, २००७.

१४. "मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सातवा (भाग तिसरा)." महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, २०१०.

१५. कर्वे, स्वाती. "लघुकादंबरीचे साहित्य स्वरूप." प्रतिमा प्रकाशन, २०११.

१६. सं. हातकणंगलेकर, म. द. “व्यंकटेश माडगूळकर माणदेशी माणूस आणि कलावंत.” शब्द प्रकाशन, २०००.

१७. तारळेकर, मीरा. “भारतीय साहित्याचे निर्माते व्यंकटेश माडगूळकर.” साहित्य अकादमी नवी दिल्ली, २०१३.

१८. गंधारे, द. के. “मराठी वाङ्मय प्रकार स्वरूप संकल्पना व वाटचाल.” शब्दालय प्रकाशन, २०१७.

१९. मोराळे, महालक्ष्मी. “आत्मचरित्रात्मक कादंबरी वाङ्मयप्रकार व वाङ्मयचर्चा.” पद्मगंगा प्रकाशन, २०१०.

२०. काळुंखे, रामचंद्र. “ग्रामीण कादंबरी आकलन आणि विश्लेषण.” कैलाश पब्लिकेशन्स, २०१३.

## आधार ग्रंथ

१. माडगूळकर, व्यंकटेश. “बनगरवाडी.” मौज प्रकाशन, १९५५.

२. माडगूळकर, व्यंकटेश. “वावटळ.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२.

३. माडगूळकर, व्यंकटेश. “सत्तांतर.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२.

४. माडगूळकर, व्यंकटेश. “करुणाष्टक.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२.

५. माडगूळकर, व्यंकटेश. “पुढचं पाऊल.” मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१२.